रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८९ | अंक १०४ | पृष्ठे १० | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in




रायगड, रविवार, दि.२१ सप्टेंबर २०२५

# कृषीवल

किंमत ४ ₹

## वाळू माफियांविरोधात परिवहन विभाग सज्ज

| रायगड | प्रतिनिधी |

वाळूमाफिया राज्यात अनधिकृतपणे वाळू, गौण खनिजांचे उत्खनन करून त्याची वाहतूक करीत आहेत. अनधिकृतपणे होणाऱ्या कृत्यात सहभागी वाहनधारकांना लगाम लावण्यासाठी, परिवहन विभागाने पावले उचलली आहेत. याबाबत पहिल्या गुन्ह्यासाठी ३० दिवस, दुसऱ्या गुन्ह्यासाठी ६० दिवसांसाठी परवाना निलंबित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच वाहनास अटकाव केला जाईल. तर, तिसऱ्या गुन्ह्यासाठी थेट वाहन अटकाव करून परवाना रद्द करण्यात येणार आहे.

राज्यात मोठ्या प्रमाणात वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृतपणे उत्खनन, वापर, वाहतूक व तस्करीचे वारंवार प्रकार घडत असल्याचे निर्दर्शनास येत आहे. महसूल आणि पर्यावरणाची हानी टाळण्यासाठी, पान २ वर

# डिझेल माफियांना दणका

## शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने दोघांविरोधात कारवाई

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने डिझेल तस्करीतील सराईत गुन्हेगारांविरोधात विशेष कार्यकारी दंडाधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे यांच्याकडून प्रतिबंधक कारवाई करण्यात आली होती. मात्र आरोपींनी जामीन देण्याबाबत जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याप्रकरणी त्यांच्याविरोधात कारवाई करीत न्यायालयीन कोठडी सुनावली. पोलिसांच्या या कारवाईने डिझेल माफियांना दणका मिळाला आहे.



पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, समुद्रात डिझेल तस्करीला बंदी असतानादेखील जिल्ह्यातील काही समुद्रकिनारी मोरेश्वर नाखवा, गणेश नाखवा हे दोघेजण डिझेल तस्करी करीत होते. करोडोची लुट केली जात होती. रेवस बंदर, रेवदंडा बंदर अशा अनेक ठिकाणी यांचा हा धंदा राजरोसपणे सुरू होता. डिझेल तस्करीमुळे सागरी सुरक्षा धोक्यात येण्याची भीती निर्माण झाली होती. अखेर रायगड पोलिसांनी त्यांच्याविरोधात कारवाई केली. मांडवा सागरी, रेवदंडा पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करून लाखोंचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. या डिझेल माफियांकडून सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग होऊ नये, म्हणून भारतीय न्याय संहिता १२९ प्रमाणे रायगडचे अपर पोलीस अधीक्षक तथा विशेष कार्यकारी दंडाधिकारी अभिजीत शिवथरे यांच्याकडे प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. त्यामध्ये आरोपींना जामीन देणेबाबत आदेश दिले होते. परंतु आरोपीने जामीन देण्याबाबत जाणीवपूर्वक दिरंगाई केली. त्यांना वेळोवेळी वाजवी संधी देऊनही त्यांनी जामीन दिला नाही. तो जामीन देण्यास असमर्थ ठरल्याने त्यांच्याविरोधात अटक वॉरंट काढण्यात आले. वॉरंटची बजावणी करुन मांडवा सागरी पोलिसांनी आरोपींना तात्काळ अटक केले. त्यानंतर त्यांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले. नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार संधी देऊनही ते जामीन देऊ शकले नाही. त्यामुळे त्यांना न्यायालयीन कोठडीत पाठविण्यात आले आहे. गुन्हेगारांवर सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था भंग होऊ नये यासाठी सराईत गुन्हेगारांविरोधात कारवाई करण्यात आली असल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.

### डिझेल साठवणूक करणे पडले महागात

**बेकायदेशीररित्या डिझेल साठवणूक, वाहतूक व खरेदी केल्याप्रकरणी १८ जणांविरोधात येलो गेट पोलिसांनी कारवाई केली. अरबी समुद्रात जवाहर द्वीप परिसरात ही कारवाई शुक्रवारी पहाटेच्या सुमारास झाली. १३ लाख ३७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. त्यात तीन हजार ७५० लिटरचा डिझेलचा आणि मासेमारी बोटीचा समावेश आहे. यातील काही आरोपी रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातील असल्याची माहिती समोर येत आहे. डिझेल साठवणूक करणे तस्करांना महागात पडले आहे.**

## पाहिजेत

PILOT

गेली सात दशके औद्योगिक जगतामधील अग्रगण्य - पायलट ग्रुप, यांची इंजीनियरिंग, इंडस्ट्रियल तसेच ऑफिस ऑटोमेशन उत्पादने देशात आणि देशाबाहेर देखील प्रसिद्ध आहेत. त्यांच्या खालापूर येथील प्लॅन्टसाठी खालील पदे भरणे आहे.

- टर्नर - 2 जागा, फिटर - 3 जागा - ITI प्रशिक्षित
- मशीन ऑपरेटर - 8 जागा - अर्ध कुशल व्यक्ती अपेक्षित
- तपासणी आणि गुणवत्ता साठी - 2 जागा - डिप्लोमा होल्डर
- असेंब्ली अँड टेस्टिंग साठी - 2 जागा - डिप्लोमा होल्डर
- हेल्पर - 5 जागा

multiprintindia.com

त्वरित संपर्क साधा: **माणिक मशीनरी मैन्युफैक्चरर प्रा लि**
126 -1+2 खोपोली पेण रोड, होराळे गाव, तालुका: खालापूर, रायगड, महाराष्ट्र • ईमेल: admin@pilotindia.com +91 98208 44921

**वॉक इन इंटरव्यू दि. 24 / 09 / 2025 रोजी दुपारी 12 ते संध्याकाळी 4 पर्यंत**

## लालपरी देणार बेरोजगारांना रोजगार

### एसटी महामंडळात मिळणार नोकरी

| रायगड | प्रतिनिधी |

राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात आठ हजार नवीन बसगाड्या दाखल होणार आहेत. त्यामुळे एसटी महामंडळाला मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. यासाठी कंत्राटी पद्धतीने १७ हजार ४५० चालक व सहाय्यक पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असून येत्या २ ऑक्टोबर रोजी निविदा प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.



या भरती प्रक्रियेच्या माध्यमातून राज्यातील हजारो बेरोजगार तरुण-तरुणींना रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यांना किमान ३० हजार रुपये वेतन मिळणार आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ३०० व्या संचालक मंडळ बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार, बस पान २ वर

## ट्रॅक्टर कलंडल्याने एकाचा मृत्यू

| नेरळ | प्रतिनिधी |

कर्जत तालुक्यातील हुमगाव येथे झालेल्या अपघातात ट्रॅक्टर कलंडून झालेल्या अपघातात ट्रॅक्टर चालकाचा जागीच मृत्यू झाला. हुमगाव येथील रहिवासी किशोर बागडे यांचा ट्रॅक्टर असून या ट्रॅक्टरवर संकेत बार्शी हा चालक होता.



संकेत ट्रॅक्टर चालवत असताना स्टेरिंग फिरले असता ट्रॅक्टर नदीच्या पुलावरून कलंडून अपघात झाला. या अपघातात संकेतचा ट्रॅक्टरखाली येऊन जागीच मृत्यू झाला आहे.

## जन्म-मृत्यू दाखले रद्द होणार

### आरोग्य विभागाचे आदेश; पडताळणी करून मुदतीत प्रमाणपत्रे मिळणार

| रायगड | प्रतिनिधी |

शासनाच्या १२ मार्च २०२५ रोजीच्या निर्णयानुसार विलंबित जन्म-मृत्यू नोंदी घेण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यापूर्वी तहसीलदारांपेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी अधिकार कक्षेबाहेर जाऊन विलंबित जन्म-मृत्यू नोंदी घेण्याचे आदेश दिल्याचे निदर्शनास आले आहे.

अनेकांना बनावट दाखले वितरीत झाल्याचा संशय आहे. त्यामुळे आता एक वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतर जन्म किंवा मृत्यू दाखल्यासाठी अर्ज करून दाखले मिळविलेल्यांची प्रमाणपत्रे रद्द केली



जाणार आहेत. त्याची संपूर्ण माहिती निबंधक किंवा जिल्हा निबंधकांनी तहसीलदारांना द्यायची आहे.

केंद्राने जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ मध्ये सुधारणा केली आहे. त्यानुसार विलंबित जन्म-मृत्यू नोंदीचे आदेश देण्याचे आदेश जिल्हाधिकारी, प्रांताधिकारी व तहसीलदारांना दिले आहेत. जन्म-मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ व महाराष्ट्र जन्म आणि मृत्यू नोंदणी नियम २००० नुसार त्याच्या नोंदणीची कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार आता जन्म-मृत्यू नोंदी रद्द होतील, त्यांना पुन्हा ठरलेल्या कार्यपद्धतीनुसार पान २ वर






कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# मच्छिमारांच्या बर्फाच्या दरात घट

**दरवाढ एक ऑक्टोबरपासून**

**विविध मच्छिमार संस्थांचे प्रतिनिधी यांच्यात झालेल्या चर्चेनंतर मच्छिमारांना पुरवठा करण्यात येत असलेल्या बर्फाच्या प्रतिटनात ६५ रुपये दरवाढीचा प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे. ही दरवाढ एक ऑक्टोबरपासून लागु करण्यात येणार आहे. बर्फ पुरवठा बंद करण्याच्या मागे घेण्याच्या निर्णयामुळे मच्छिमार, व बर्फ वितरकांनीही सुटकेचा निःश्वास सोडला आहे.**

। उरण । प्रतिनिधी ।

**बर्फाच्या दरवाढीने बर्फ विक्रेते आणि मच्छिमारांमध्ये तणाव निर्माण झाला होता. मात्र चर्चेनंतर या दरवाढीत चर्चेअंती तोडगा निघाला असून टनामागे ८५ ऐवजी ६५ रुपये आकारण्यात येणार आहेत. त्यामुळे मच्छिमारांना दरवाढीत २० रुपयांचा दिलासा मिळाला आहे.**

प्रदिर्घ चर्चेनंतर बर्फाच्या प्रति टनामागे ८५ रुपये वाढीचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. बर्फाची प्रति टनामागे करण्यात आलेली ही दरवाढ एक ऑक्टोबरपासून लागु करण्यात येणार आहे.तसेच येत्या एक जुनपर्यंत तरी कोणत्याही कारणाने दरवाढ न करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती करंजा मच्छिमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी दिली आहे.

एक ऑगस्टपासून सुरू होण्यापूर्वी एक दिवस आधीच मच्छिमारांसाठी व्यापाऱ्यांनी बर्फाच्या दरात टनामागे ८० रुपयांची वाढ केली होती.त्यानंतर दिड महिन्यातच वीज दरवाढीचे कारण पुढे करीत ऑल इंडिया आईस मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे पुन्हा आणखी प्रतिटन ८५ रुपयांची वाढ करण्याची मागणी केली होती. बर्फाच्या दरवाढीवर मंगळवारी झालेल्या बैठकीत दरवाढीला मच्छिमार संस्थांनी विरोध केला होता. मात्र ऑल इंडिया आईस मॅन्युफॅक्चर असोसिएशनने विविध मच्छीमार संस्थांच्या प्रतिनिधींनी केलेला विरोध झुगारून २० सप्टेंबर पर्यंत बर्फाच्या दरवाढीचा प्रस्ताव मान्य न केल्यास मच्छिमार संस्था व बोटींचा बर्फ पुरवठा बंद करण्याचा इशारा असोसिएशनने बैठकीतच दिला होता.मात्र या दरम्यान दरवाढीचा निर्णय घेण्याचा फेरविचार करण्याची मागणी करतानाच या मासळी व्यवसायावर अवलंबून असलेल्या या महत्त्वाच्या प्रश्नावर दोन दिवसात पुन्हा तातडीने बैठक बोलाविण्याची विनंती करंजा मच्छिमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा यांनी केली होती.

या विनंतीवरून शुक्रवारी ऑल इंडिया आईस मॅन्युफॅक्चर असोसिएशन आणि विविध मच्छिमार संस्थांचे प्रतिनिधी यांची बैठक झाली. वाशी येथील मर्चट जिमखाना येथे आयोजित बैठकीत ऑल इंडिया आईस मॅन्युफॅक्चर असोसिएशनचे अध्यक्ष रसिक देसाई अन्य पदाधिकारी तसेच करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष प्रदीप नाखवा, रमेश नाखवा, चंद्रकांत कोळी, नारायण नाखवा, अमोल रोगे, बर्फ सप्लायर्स आणि विविध मच्छिमार संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते. तब्बल तीन तास चाललेल्या या बैठकीत बर्फाच्या दरवाढीवर घमासान चर्चा झाली. ऑल इंडिया आईस मॅन्युफॅक्चर असोसिएशन बर्फाच्या दरात ८५ रुपये वाढ करण्याच्या प्रस्तावावर ठाम होती. अखेर दोन्ही बाजूच्या प्रदिर्घ चर्चेनंतर बर्फाच्या प्रति टनामागे ८५ रुपये वाढीचा प्रस्ताव सर्वानुमते मान्य करण्यात आला. बर्फाची प्रति टनामागे करण्यात आलेली ही दरवाढ एक ऑक्टोबरपासून लागु करण्यात येणार आहे.तसेच येत्या एक जुनपर्यंत तरी कोणत्याही कारणाने दरवाढ न करण्याचा निर्णयही या बैठकीत घेण्यात आला असल्याची माहिती प्रदीप नाखवा यांनी दिली. बर्फ पुरवठा बंद करण्याचा निर्णय मागे घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे हजारो मच्छिमार, ऑल इंडिया आईस मॅन्युफॅक्चर असोसिएशन व बर्फ वितरकांनीही सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

# सोन्याच्या व्यापाऱ्याचा चालकच ठरला लुटारू

**■ ५.९० लाखांचे दागिने व रोख रक्कम लुटल्याचा केला बनाव**

। पनवेल । प्रतिनिधी ।

खांदा कॉलनी येथील रेल्वे ब्रीजवर दागिने व रोख रक्कम लुटीची घटना बनाव असल्याचे उघडकीस आले आहे. बी.बी.बांठिया ज्वेलर्स कंपनीत चालक म्हणुन काम करणाऱ्या शैलेश कांबळे या कर्मचाऱ्यानेच ५ लाख ९० हजार रुपये किंमतीचे दागिने व रोख रक्कमेचा अपहार करुन त्याचा बनाव रचल्याचे उघडकीस आले आहे. त्यानुसार गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाने या आरोपीला अटक केली आहे. तसेच त्याच्याकडुन दागिने व रोख रक्कम हस्तगत केले आहेत.

या प्रकरणात अटक करण्यात आलेला आरोपी शैलेश कांबळे या पनवेल मधील बी.बी. बांठिया ज्वेलर्स या सोन्याच्या व्यापाऱ्याकडे चालक म्हणुन काम करत होता. त्याला खांदा कॉलनी व कळंबोली येथील कंपनीच्या कार्यालयातून दागिने व रोख रक्कम घेऊन आणण्यासाठी पाठवण्यात आले होते. त्यानुसार शैलेश याने ५ लाख ९० हजार रुपये किंमतीचे दागिने व रोख रक्कम घेतल्यानंतर त्याने दागिने व रोख रक्कम आपल्या इलेक्ट्रीक टिव्हीएस आयक्युबच्या डिकीमध्ये लपवून ठेवले. त्यानंतर त्याने सायन पनवेल मार्गावरील खांदा कॉलनी रेल्वे ब्रीजवर पल्सर मोटारसायकलवरुन हेल्मेट घालुन आलेल्या दोघा लुटारुंनी त्याला चाकुचा धाक दाखवून त्याच्याजवळ असलेले दागिने व रोख रक्कम लुटल्याचा बनाव रचला होता. याबाबत खांदेश्वर पोलीस ठाण्यात जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर खांदेश्वर पोलिसांसह गुन्हे शाखा कक्ष-३ च्या पथकाकडुन या गुह्याचा समांतर तपास करण्यात येत होता. सहाय्यक पोलीस आयुक्त अजयकुमार लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश काळदाते यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक पवन नांद्रे, पोलीस उपनिरीक्षक अभयसिंह शिंदे व त्यांच्या पथकाने केलेल्या तपासात शैलेश कांबळे याने सांगितलेल्या घटनेत अनेक विसंगती आढळुन आल्या. तसेच घटनेच्या ठिकाणी देखील कुणीही संशयित व्यक्ती आढळुन आल्या नाहीत. त्यामुळे शैलेश कांबळे याच्यावर संशय बळावल्याने गुन्हे शाखेने शैलेशची सखोल चौकशी केली. त्यानंतर त्यानेच जबरी चोरीचा बनाव रचल्याचे कबूल करुन स्कुटीच्या डिकीमध्ये लपवून ठेवलेले दागिने पोलिसांच्या स्वाधीन केले.

# 'नेरळमधील विजेचा प्रश्न निकाली काढावा'



। नेरळ । प्रतिनिधी ।

नेरळ गावातील टेप आळी भागात कमी दाबाने वीज पुरवठा होत आहे.त्याचवेळी नेरळ गावातील काही दोन ठिकाणी वीज रोहित्र नादुरुस्त झाले आहेत. ते सर्व नादुरुस्त वीज रोहित्र बदलण्यात यावीत आणि टेप आळी भागात जास्त क्षमतेची नवीन वीज रोहित्र बसवण्यात यावीत अशी मागणी शिवसेना पक्षाने केली आहे.

नेरळ मधील वीज प्रश्नावर शिवसेना नेरळ शाखेच्या पदाधिकारी यांनी महावितरणचे सहायक अभियंता वाघ यांची भेट घेतली.शिवसेना कर्जत तालुका सचिव अंकुश दाभने, शिवसेना विभाग प्रमुख सुरेश राणे आणि जयवंत साळुंखे यांनी महावितरण कंपनीचे सहायक अभियंता आणि उप अभियंता यांची भेट घेतली.टेप आळी आणि नेरळ परिसरात राहणाऱ्या भागातील दोन्ही वीज रोहित्र ही नादुरुस्त झाली आहेत.

त्यात श्री मित्र मंडळ चौक, टेप आळी या ठिकाणी बसविण्यात आलेले विद्युतरोहक अनेक वर्षे जूने आहेत. त्यामुळे वारंवार नादुरुस्त होत आहेत. तसेच आता वीज ग्राहकांची संख्या आणि विजेची मागणी वाढल्यामुळे सध्या वापरत असलेल्या विद्युत रोहित्र यांची क्षमता कमी क्षमतेने वीज पुरवठा होत आहे.

त्यामुळे सदरील विद्युतरोहक बदलून नवीन २०० केव्हीए क्षमतेचे विद्युतरोहक बसविणे आवश्यक आहे. तरी याबाबत प्राधान्याने निर्णय होऊन तातडीने कार्यवाही व्हावी अशी मागणी शिवसेना पक्षाचे वतीने करण्यात आली.

# खारघरमध्ये सम-विषम पार्किंग

**पनवेल :** खारघर शहरातील मुख्य रस्त्यावर सम-विषम पार्किंग करण्यावा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे वाहतूक कोंडी टाळणार आहे. खारघरमधील गोखले शाळेकडून शिल्प चौकाकडे जाणारा मुख्य रस्ता, सेक्टर १९ इनटॉप सोसायटी ते पाटील रेसिडेन्सीकडे जाणारा रस्ता, सेक्टर २०मधील केसर गार्डन सोसायटी, शुभहोम सोसायटी ते ट्विन्स टॉवरकडे जाणारा रस्ता आणि सेक्टर २१मधील उन्नती सोसायटी ते नवजीवन हॉस्पिटलकडे जाणाऱ्या रस्त्यावर खारघर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जमील शेख यांनी सम-विषम पार्किंगसाठी अधिसूचना जारी केली.

# बाल विकास नागरी प्रकल्पाचा पोषण महाशपथविधी



। खोपोली । प्रतिनिधी ।

एकात्मिक बाल विकास नागरी प्रकल्प रायगड अंतर्गत खालापूर बीट मार्फत खोपोली व खालापूर मधील अंगणवाडी केंद्रांचा पोषण महा उद्घाटन कार्यक्रम खालापूर येथील आदिवासी समाज हॉलमध्ये पार पडला.या कार्यक्रमातून पोषण महाशपथविधी दिल्यानंतर गर्भवती मातेचे ओटीभरण कार्यक्रम तसेच नवीन जन्म झालेल्या बाळासाठी अंगणवाडीतील बेबी केअर किटचे वाटप व कन्या जन्माचे स्वागत करण्यात आले.

मुख्य पर्यवेक्षिका रोहिणी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रकल्पाच्या सीडीपीओ सुनिता ओव्हाळ खालापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा रोशना मोडवे, माजी नगराध्यक्षा शिवानीताई जंगम, नगरसेविका लता लोते, सुवर्णा मोरे, उज्वला निधी, सुनीता पाटील,मीनल पाटील, माजी नगराध्यक्ष तसेच चाइल्ड असोसिएशनचे प्रकाश पवार, मिथुन गुंजाळ सहाय्यक अधिकारी इनरव्हील क्लबच्या क्षमा आठवले इत्यादी मान्यवरांसह खालापूर व खोपोलीतील सेविका व मदतनीस ताई उपस्थित होत्या.

राजमाता जिजाऊ व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या प्रारंभी पोषण महाशपथविधी दिल्यानंतर गर्भवती मातेचे ओटी भरण कार्यक्रम तसेच नवीन जन्म झालेल्या बाळासाठी अंगणवाडीतील बेबी केअर किटचे वाटप व कन्या जन्माचे स्वागत करण्यात आले.

# गोखले महाविद्यालयात स्वच्छता अभियान

। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महात्मा गांधी जयंती सप्ताह निमित्ताने शासनाच्या निर्देशानुसार स्वच्छता आणि सेवा अभियाना अंतर्गत सागरी किनारा स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला.

समुद्रकिनाऱ्यावरील सुमारे दोन किलोमीटर परिसराची प्लॅस्टिक बाटल्या, प्लॅस्टिक पिशव्या व इतर कचरा संकलित करून त्याची विल्हेवाट लावण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना शासनाने दिलेली स्वच्छता व सुरक्षिततेची शपथ देण्यात आली. अत्यंत शिस्तबद्धपणे स्वयंसेवकांनी या उपक्रमात सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या स्वयंसेवक व विद्यार्थ्यांनी व स्वच्छता व सुरक्षा जनजागृतीपर पथनाट्य सादर करून श्रीवर्धन शहरात स्वच्छतेचे महत्व पटवून दिले. आणि महाविद्यालय परिसरात पिंपळ, वड, करंजी आणि लिंब या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. सामाजिक बांधिलकीची जाण व भान विद्यार्थी स्वयंसेवकांमध्ये निर्माण व्हावी व स्वच्छतेचे महत्व घरापासून ते समाजापर्यंत पोहोचावे यासाठी हे उपक्रम राबविले जातात, असे विचार प्राचार्य डॉ. श्रीनिवास जोशी यांनी व्यक्त केले. या स्वच्छता मोहिमेत उपप्राचार्य, डॉ. विवेक खरे, उपप्राचार्य, प्रा. किशोर लहारे, कार्यक्रम अधिकारी प्रा. बी. यु. पाटील डॉ. विशाल माने, प्रा. नवज्योत जावळेकर, प्रा. दिपाली पाठराबे आदी प्रयत्नशील होते.

# हितचिंतक मेळावा उत्साहात

**पनवेल :** पनवेलच्या ज्येष्ठ नागरीक संघाच्या सभागृहात वनवासी कल्याण आश्रम, महाराष्ट्र या संस्थेचा हितचिंतक मेळावा उत्साहात संपन्न झाला. या मेळाव्याला माजी पत्रकार व'ॲनलाझर या युट्यूब चॅनलचे संपादक सुशील कुळकर्णी प्रमुख वक्ता लाभले होते. या कार्यक्रमाला पनवेलमधील अनेक मान्यवर उपस्थित होते. दीप प्रज्वलन व स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. शहर अध्यक्ष सौ. अश्विनी मुळे यांनी प्रास्ताविक केले.

कुलाबा जिल्हाध्यक्ष अविनाश म्हात्रे यांनी वनवासी कल्याण आश्रम संस्था पनवेलनजीक करत असेल्या कार्याचा आढावा सादर केला. त्यानंतर एकनाथ वाघे व सुदाम पवार या चिंचवलीच्या दोन माजी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

# तळा पोलीस ठाण्यात नवरात्र उत्सव मंडळांची बैठक



। तळा । प्रतिनिधी ।

दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तळा पोलीस ठाणे येथे तालुक्यातील नवरात्रोत्सव मंडळांची बैठक पार पडली.या बैठकीत आगामी नवरात्रोत्सव शांततेत पार पडण्यासाठी तळा पोलिसांच्या वतीने सूचना देण्यात आल्या.

ज्यामध्ये सर्व नवरात्रोत्सव मंडळानी आपले सरकार पोर्टल वरून अर्ज करून, मूर्ती/प्रतिमा/घट स्थापना, स्पीकर परवानगी घेणे अनिवार्य आहे.दुर्गादेवी मूर्ती आगमन व विसर्जन विहित वेळेत व ठरवलेल्या मार्गांवरूनच करावे.दुर्गादेवी मूर्ती सुरक्षेसाठी दिवसा व रात्री किमान २ स्वयंसेवक राहतील याची व्यवस्था करावी.

उच्च न्यायालय यांचे ध्वनी प्रदूषण बाबतच्या नियमाचे तंतोतंत पालन करावे,मिरवणूक/गरबा यांना डी. जे. वाजवून नये. साऊंड सिस्टीम हा मर्यादित आवाजाचा असल्याची खात्री करावी.आपण लावलेल्या, साऊंड सिस्टीमची ध्वनी प्रदूषण मापक यंत्राद्वारे मापन होणार आहे.

मर्यादेपेक्षा जास्त आवाज असल्यास आयोजक, साऊंड मालक व चालक यावर कारवाई करण्यात येईल, मंडपाच्या बाजूला रेती व बकेट भरून ठेवाव्या.गरबाची वेळ रात्री १० वाजेपर्यंत असून त्यानंतर कटाक्षाने साऊंड सिस्टीम बंद करावी. गरबा खेळताना महिला व मुली यांची छेड काढली जाणार नाही व कोणाच्याही धार्मिक भावनांचा अवमान होणार नाही याची काळजी घ्यावी. तसेच सर्वांनी कायाद्याचे पालन करून शांततेत नवरात्रोत्सव सण साजरा करा असे आवाहन तळा पोलीस ठाण्याचे सपोनि सतीश गवई यांनी उपस्थितांना केले.याप्रसंगी तालुक्यातील नवरात्रोत्सव मंडळ पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवीन पनवेल वाहतूक शाखेच्या वतीने हेल्मेट वाटप उपक्रम

। पनवेल । प्रतिनिधी ।

रस्ते सुरक्षेच्या अनुषंगाने पटेल इंजिनीअरिंग कंपनी, खारपाडा यांच्या सौजन्याने नवी पनवेल वाहतूक शाखेत सुरक्षित प्रवासाची हमी देणारे वाहतूक पोलीस अंमलदार आणि नागरिकांना हेल्मेट वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे सुरक्षित प्रवासाचे महत्त्व अधोरेखित होत असून, वाहतूक नियमांचे पालन करण्याचा संदेश पोहोचला आहे.

कार्यक्रमाला पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक सुशांत खराटे यांनी उपस्थित राहून वाहतुकीच्या नियमांचे पालन व सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन केले. त्यांनी नागरिकांना अपघात टाळण्यासाठी हेल्मेटचा वापर अनिवार्य असल्याचे सांगितले आणि आपली सुरक्षितता आपल्या हातात आहे, असा संदेश दिला. यावेळी पटेल इंजिनीअरिंग कंपनीचे प्रोजेक्ट हेड कुलकर्णी, डेप्युटी हेड सेनगुप्ता यांच्यासह कंपनीचा स्टाफ, वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार, स्थानिक उपस्थित होते.




## पान १ वरून

# वाळू माफियांविरोधात परिवहन विभाग सज्ज

वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांवर ठोस कारवाई करण्यात येणार आहे. मोटार वाहन अधिनियम, १९८८ चे कलम ८६ मधील तरतुदीनुसार विभागीय कारवाई करण्याचा निर्णय राज्य परिवहन प्राधिकरणाने घेतला आहे.

मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ११३ चा भंग करून सकल भारक्षमतेपेक्षा अतिरिक्त वजनाच्या वाळू व इतर गौण खनिजांची वाहतूक करणाऱ्या परवानाधारकांवर विभागीय कारवाई करण्याचा निर्णय घेण्याचे अधिकार राज्य परिवहन प्राधिकरणास आहेत. या बाबी विचारात घेऊन राज्य परिवहन प्राधिकरणाने १८ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित बैठकीत वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन करून अवैधपणे वाहतूक करणाऱ्या वाहनांच्या परवान्यावर मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ८६ मधील तरतुदीनुसार विभागीय कारवाई करण्याचे निर्देश राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन प्राधिकरणांना दिले आहेत.

# जन्म-मृत्यू दाखले रद्द होणार

ऑनलाईन अर्ज करायचा आहे.

तहसीलदारांकडून त्यांना पडताळणी करून मुदतीत प्रमाणपत्रे दिली जातील, असेही आदेशातून स्पष्ट करण्यात आले आहे. एक वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतरच्या नोंदी रद्द करण्यासंदर्भातील निर्णय महसूल व वन विभाग, गृह विभाग आणि नगरविकास विभागाच्या सहमतीने सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आदेशानुसारएक वर्षापेक्षा जास्त कालावधीनंतरच्या विलंबित जन्म-मृत्यूच्या नोंदींची यादी निबंधकांनी तहसीलदारांना तातडीने द्यावी. तहसीलदारांनी त्या यादीवरून तहसीलदारांपेक्षा कमी दर्जाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या प्रमाणपत्रांची पडताळणी करून त्या नोंदी रद्द कराव्यात. त्याची माहिती जिल्हा निबंधक व स्थानिक पोलिसांना द्यावी आणि पोलिसांनी संबंधित कुटुंबियांकडून जन्म किंवा मृत्यू दाखल्याची मूळ प्रत जप्त करावी. तहसीलदारांनी रद्द केलेल्या नोंदी निबंधक व जिल्हा निबंधकांनी सीआरएस पोर्टलवरील नोंदी रद्द कराव्यात. त्या दाखल्यांचा दुरुपयोग होऊ नये म्हणून तहसीलदारांनी रद्द केलेले दाखले पोलिसांनी जप्त करावेत, असेही आदेशात नमूद आहे.

# लालपरी देणार बेरोजगारांना रोजगार

सेवा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक असलेले चालक व सहाय्यक तीन वर्षांसाठी कंत्राटी पद्धतीने घेण्याकरिता ई-निविदा प्रक्रिया अवलंबविण्यात येत आहे. ही ई-निविदा प्रक्रिया सहा प्रादेशिक विभागांमध्ये राबविण्यात येणार आहे. प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मनुष्यबळ पुरविणाऱ्या संस्थांकडून राज्य परिवहन महामंडळाला आवश्यक मनुष्यबळ वेळेत उपलब्ध होईल. कंत्राटी पद्धतीने भरती होणाऱ्या चालक व सहाय्यक उमेदवाराला सुमारे ३० हजार रुपये वेतन देण्यात येईल. याबरोबरच उमेदवारांना एसटीतर्फे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. बसची वाढती संख्या आणि त्यासाठी लागणारे मनुष्यबळ मिळाल्यानंतर प्रवाशांना अखंड, सुरक्षित व दर्जेदार बस सेवा उपलब्ध करणे शक्य होणार आहे.

# रोहा तालुक्यात धरती आभा आदी कर्मयोगी सेवा अभियानाची सुरुवात




। चणेरा । प्रतिनिधी ।

आदिवासी बांधवांचे जीवनमान उंचावून त्यांना स्वावलंबी व आत्मनिर्भर बनविण्यासाठी केंद्र शासनाने सुरू केलेल्या धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान अंतर्गत आदी कर्मयोगी कार्यक्रमाची सुरुवात रोहा तालुक्यातील चनेरा विभागातील न्हावे येथून झाली आहे.

अभियानास १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत सेवा पर्व तसेच आदि सेवा अभियान म्हणून संबोधले जाणार आहे. तर हे संपूर्ण कार्यकाम तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत असून, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यासह अध्यक्ष व समन्वयक म्हणून काम पाहत आहेत. तालुका स्तरावर गटविकास अधिकारी नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी सांभाळत आहेत. पेण येथील प्रकल्प अधिकारी धावे सहाय्यक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली विभागप्रमुख सक्रिय सहभाग घेत असून न्हावे व नवखार या गावांतून गटविकास अधिकारी रोहा शुभदा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचा शुभारंभ शुक्रवारी १९ सप्टेंबर रोजी मोठ्या उत्साही वातावरणात करण्यात आला.

१७ विभागाच्या २५ योजना आदिवासी बांधव यांच्यापर्यंत पोहोचविण्यास जिल्हाधिकारी किशन जावळे कटीबद्ध यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमासाठी मास्टर ट्रेनर नरेश झुरे, तलाठी नंदकुमार पाटील, वातावरण संस्थेचे विलास चाळके, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प प्रदिप कोळी, राहुल ऐडके, आदी कर्मयोगी अभियानात सहभागी होते.

# आंबोट गावातील ग्रामस्थांचे अनोखे आंदोलन



। नेरळ । प्रतिनिधी ।

पोलीस मित्र संघटना नवी दिल्ली भारत संघटना आणि आंबोट गौळवाडी विभागातील ग्रामस्थांनी रस्त्यावरील खड्ड्यात बसून आंदोलन केले. ग्रामस्थांच्या पाठिंब्यावर ही आंदोलन यशस्वी झाले असून बांधकाम खात्याला जाग आली नाही तर आणखी तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

छत्रपती संभाजी महाराज चौक येथे पोलीस मित्र संघटनेने आंदोलन सुरू केले आहे.या आंदोलनाला गौळवाडी आणि आंबोट गावातील ग्रामस्थांनी पाठिंबा दिल्यावर पोलिस मित्र संघटना आंबोट रस्त्यावर आंदोलन करण्यासाठी पोहचली. आंबोट गौळवाडी अंतर्गत रस्त्यावर खड्डयाचे साम्राज्य असल्यामुळे सामाजिक कार्यकर्ते मिनिष मसने यांच्या पुढाकाराने त्या विभागातील ग्रामस्थांनी खड्ड्यात बसून आंदोलन केले.

# जी.एम.वेदक कॉलेजमध्ये स्वच्छता उपक्रम उत्साहात

। तळा । प्रतिनिधी ।

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या मार्गदर्शनाखाली तसेच राष्ट्रीय सेवा योजनेच्या संकल्पनेतून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०१५ या कालावधीत राज्यभरात स्वच्छता ही सेवा अभियान राबवले जात आहे.

या अनुशंगाने जी.एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथे विशेष स्वच्छता उपक्रम घेण्यात आला. या उपक्रमात महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. शाहीना मिर्झा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले. समाजाचे आरोग्य व प्रगती ही स्वच्छतेशी थेट जोडलेली आहे, याची जाणीव विद्यार्थ्यांनी बाळगावी असे आवाहन त्यांनी केले.

## निवडक



### ‘जनता दारात, साहेब घरात’

**उरण :** उरण तालुक्यातील शासकीय कार्यालयांची दारे जनतेच्या तक्रारींनी गजबजलेली असून येथील साहेबांच्या खुर्च्या मात्र रिकाम्या आहेत. शासनाने सकाळी पावणेदहा ते सायंकाळी सव्वासहा अशी वेळ ठरवली आहे. परंतु, उरणमधील शासकीय अधिकारी व कर्मचारी हा नियम उघडपणे धाब्यावर बसवत आहेत.शासनाचे नियम पाळणे ही अधिकाऱ्यांसह कर्मचाऱ्यांची जबाबदारी असते. परंतु, उरणमध्ये ही जबाबदारी उघड उघड पायदळी तुडवली जात आहे. अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या या उर्मटपणामुळे सर्वसामान्य जनता वेठीस धरली जात आहे. त्यामुळे सर्वसामान्य जनेतेचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जातात. जनतेची कामे करण्याऐवजी आरामशीर नोकरी हीच त्यांची मानसिकता झाली आहे. येथील शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी कार्यालयात उशीरा येऊन वेळेआधिच कार्यालयातून बाहेर पडतात. ते गेले की लगेचच कर्मचाऱ्यांचा देखील पलायन मोर्चा निघतो. हा मनमानी कारभार वर्षानुवर्षे चालू आहे. हा प्रकार थांबवायचा असेल तर शासनाने तातडीने कठोर कारवाई करणे अत्यावश्यक आहे. केवळ आदेश काढून किंवा फाइल हलवून जनता समाधानी होणार नाही. उरणकरांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नका. अधिकारी-कर्मचाऱ्यांचा कारभार आवरला नाही, तर जनता आता रस्त्यावर उतरून हक्कासाठी झुंजार लढा देईल, असा गंभीर इशारा देण्यात आला आहे.



### विद्यार्थ्यांची एचआयव्ही आजारावर जनजागृती

**रसायनी :** जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग अलिबाग आणि ग्रामीण रुग्णालय चौक यांच्या संयुक्त विद्यमाने ‘इंटिसिफाईड आय ई सी कॅम्पेन’ अभियानाअंतर्गत शनिवार (दि.१९) न्यु इंग्लिश माध्यमिक विद्यालय वावरले येथे एड्स आजारावर जनजागृती कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक चांदणे आणि वर्ग शिक्षिका यांच्या उमार्गदर्शनाखाली आय.सी.टी.सी समुपदेशक अशोक लोंढे यांनी एचआयव्ही एड्स आजार होण्याची कारणे, उपचार आणि हा आजार झाल्यावर घ्यावयाची काळजी याबद्दल सखोल माहिती दिली. तसेच, प्रयोगशाळा तंत्रज्ञ विकास घुमरे यांनी एचआयव्ही एड्स प्रतिबंध २०१७ कायद्याबाबत सुद्धा माहिती देण्यात आली. तसेच, विद्यार्थ्यांना आयईसीचे वाटप करण्यात आले.

### गटविकास अधिकाऱ्यांना कार्यशाळा आयोजितक करण्याचे आदेश

**वावोशी :** अनुसूचित जाती व जमातींवरील अत्याचार प्रतिबंधक कायदा संदर्भातील तालुकास्तरीय कार्यशाळा आयोजित करण्यात गटविकास अधिकारी पंचायत समित्यांकडून झालेले दुर्लक्ष शासनाच्या नजरेस आले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा सदस्य सचिव, जिल्हा दक्षता व नियंत्रण समि ती रायगड सुनिल जाधव यांनी याबाबत कठोर भूमिका घेतली आहे. यापूर्वीच बार्टी पुणे व जिल्हा समाजकल्याण विभागाने सर्व उपविभागीय अधिकाऱ्यांना एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्याच्या स्पष्ट सूचना दिल्या होत्या. मात्र, अद्याप अनेक तालुक्यांत या कार्यशाळा पार पडल्या नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे तातडीने कार्यशाळा आयोजित करा, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा थेट इशारा गटविकास अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

# जलविद्युत प्रकल्पामुळे वनसंपदा धोक्यात

## || टोरांटविरोधात कर्जतकरांची संतापाची लाट || खासगी जमीन देण्यास स्थानिकांचा विरोध

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील दुबार भाताच्या पीक घेतल्या जाणाऱ्या जमिनीवर टोरंट कंपनीचा जलविद्युत प्रकल्प आणण्याचा घाट सरकारने घातला आहे. या प्रकल्पामुळे तेथील नैसर्गिक संपदा नष्ट होणार असून पर्यटक आणि ट्रेकर्स यांचे आवडीचे ठिकाण असलेले ढाक तसेच बाराही महिने हिरवेगार असलेले क्षेत्र लोप पावणार आहे. त्यामुळे शासनाने या प्रकल्पासाठी पुढाकार घेऊ नये, अशी मागणी स्थानिक शेतकरी वर्गातून होत आहे.

१९६० च्या दशकात राजनाला कालव्याचे पाणी कर्जत तालुक्याच्या पूर्व भागात येऊ लागले आणि तेंव्हापासून तो भाग बाराही महिने हिरवागार असतो. ४० हुन अधिक गावातील शेतकरी उन्हाळ्यात आणि पावसाळ्यात अशा दोन्ही हंगामात





शेत जमिनीतून पीक घेतात. त्यामुळे या भागातील जमिनीला कायम मागणी राहिली असून फार्म हाऊसच्या तालुक्यात या राजनाला भागातील शेतजमिनीला विशेष मागणी आहे. त्यातच पोटल, पाली, भालिवडी, कोतवाल खलाटी, आंबोट आणि ढाक या गावातील जमिनीवर जलविद्युत प्रकल्प उभारण्याची संकल्पना शासनाला सुचली आहे. टोरंट कंपनी आपला जलविद्युत प्रकल्प ३७७ हेक्टर जमिनीवर उभारणार आहे. या प्रकल्पासाठी १४४ हेक्टर जमीन हि खासगी जमीन असून ती जमीन देण्यास स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला आहे. शेतकऱ्यांना या प्रकल्पाबाबत जनसुनावणी जाहीर झाल्यावर माहिती याबाबतची माहिती मिळाली आहे. त्यात आपली दुबार पिके देणारी जमीन देण्यास शेतकरी तयार नाहीत. त्यामुळे शासनाच्या या भूमिकेबद्दल कर्जतकरांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

### मिनी माथेरान संपुष्टात

टोरंट कंपनीच्या जलविद्यूत प्रकल्पामुळे जिल्ह्यातील मिनी माथेरान म्हणून ओळखले जाणाऱ्या ढाक या गावाचे अस्तित्व संपुष्टात येणार आहे. ढाक गावात संपूर्ण डोंगर कंपनी खरेदी करणार असून त्या भागातील एका घळीमध्ये पाणी अडवून वीज निर्मितीचे स्वप्न टोरंट कंपनी पाहत आहे. काही कुटुंबाचे निवास असलेल्या ढाक गावातील जमिनीवर बाहेरच्या लोकांचा डोळा असून या ठिकाणी माथेरान सारखे पर्यटन स्थळ उभारण्याचे स्वप्न जलविद्युत प्रकल्पामुळे स्वप्नच राहणार आहे.

### असा असणार जलविद्युत प्रकल्प

साई डोंगरावर वसलेले गाव भयानक आजारामुळे स्थलांतरित झाले होते. त्याच साई डोंगर नावाने टोरंट कंपनी जलविद्यूत प्रकल्प उभारत आहे. साईडोंगर हा ३००० मेगावॅट उदंचन जलविद्युत प्रकल्प कर्जत तालुक्यातील पाली तर्फे कोतवाल खलाटी, पोटल, साईडोंगर, अंबोट, ढाक, भालिवडी या गावांमध्ये प्रस्तावित आहे. या प्रकल्पांतर्गत दोन जलाशय बांधले जाणार असून त्यातील एक साई डोंगर येथे तर दुसरा ढाक येथील डोंगरावर बांधला जाणार आहे. ऊर्ध्व जलाशय सुमारे २७ मीटर उंच धरण बांधून डोंगराच्या माथ्यावर मौजे ढाक येथे उभारण्यात येणार आहे. तर, साईडोंगर येथे ५९ मीटर उंचीचे धरण बांधून पेज नदीवर प्रस्तावित आहे.

### वन विभागाचा दुजाभाव

या प्रकल्पासाठी लागणाऱ्या एकूण जमीनीपैकी ६५ टक्के वन क्षेत्र असून खासगी जमीन क्षेत्र कमी आहे. २३३ हेकटर वन जमिनीची आवश्यक असलेल्या या प्रकल्पासाठी एक इंच देखील जमीन देण्यात आलेली नाही. असे असतानाही त्या वन जमिनीवर टोरंट कंपनीचे लोक तंबू ठोकून राहत आहेत. मात्र, सर्वसामान्य शेतकऱ्याने एक झाड तोडले किंवा वन जमिनीमध्ये जाऊन खेळले तर कारवाईचा बडगा वन विभागाकडून उभारणारा जातो. परंतु, टोरंट कंपनीवर कोणतीही कारवाई होताना दिसत नाही. त्यामुळे वन विभागाकडून दुजाभाब होत असून वन विभागाचे अधिकारी कोणाच्या दबावाखाली आहेत, असा प्रश्न स्थानिक विचारू लागले आहेत.

## घाटरस्त्यातील डांबर गेले निखळून

**| नेरळ | प्रतिनिधी |**

माथेरानमध्ये जाण्यासाठी असलेल्या एकमेव रस्त्याची दुरवस्था झाली आहे. नेरळ ते माथेरान या सात किमी लांबीच्या रस्त्यावरील डांबर निखळून गेले असून वाहनचालकांना कसरत करावी लागत आहे. दरम्यान, या घाटरस्त्याची जबाबदारी असलेले सार्वजनिक बांधकाम खात्याचे अधिकारी गायब असून खराब झालेल्या रस्त्याकडे पहायला त्यांना वेळ देखील नाही, अशी स्थिती निर्माण झाली आहे.

माथेरान हे ठिकाण मुंबईपासून अगदी जवळचे पर्यटन स्थळ आहे. नेरळ ते माथेरान हा



घाटरस्ता एकूण ९ किलोमीटर लांबीचा आहे. या रस्त्यामध्ये अनेक नागमोडी वळणे आहेत. यंदाच्या मुसळधार पावसात या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. वळणाच्या ठिकाणी जो रस्ता आहे तो देखील पूर्णपणे नादुरुस्त अवस्थेत आहे. त्यामुळे या ठिकाणी सतत अपघातांची घटना घडत असतात. त्यामुळे पर्यटकांना जीवघेणा प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम कधी होणार, असा प्रश्न येथील टॅक्सी चालक-मालक संघटना आणि माथेरानमध्ये येणारे पर्यटकांकडून उपस्थित होत आहे.

## रिक्षाचालकाचा प्रामाणिकपणा

**| उरण | प्रतिनिधी |**

जसखार गावातील एक रुग्ण उपचारासाठी उरणमधील एका रुग्णालयात आला होता. सोनोग्राफीच्या गडबडीत त्याची ४० हजार रुपयांची थैली कोठेतरी हरवली. ती थैली रिक्षात हरवल्याचा अंदाज असून ज्या रिक्षेतून आला त्याचा नाव-नंबरसुद्धा आठवत नव्हता. दरम्यान, रिक्षाचालक नंदकुमार सवंगडे यांच्या लक्षात येतातच त्यांनी रूग्ण प्रवासी त्यांची थैली विसरून गेल्याचे लक्षात आले. त्यांने ती थैली तशीच उचलली आणि थेट दवाखान्यात येऊन रुग्णाला ती परत केली.

## पराग बोरसे यांग फॅमिली पुरस्काराने सन्मानित

**| माथेरान | प्रतिनिधी |**

कर्जत येथील प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय चित्रकार पराग बोरसे यांना शुक्रवारी (दि.१९) पेस्टल सोसायटी ऑफ अमेरिका तर्फे ‘यांग फॅमीली’ हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या पुरस्काराची रक्कम १००० अमेरिकन डॉलर असून, यावर्षी २०२५ साठी हा सन्मान त्यांना मिळाला आहे. न्यूयॉर्क येथील नॅशनल आर्टस् क्लब या ऐतिहासिक वास्तूमध्ये संपन्न झालेल्या भव्य सम ारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या सोहळ्यास अमेरिकेतील ख्यातनाम कलाकार व रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी पराग



बोरसे यांच्या कलाकृतींचे सर्वांनी मनापासून कौतुक केले. भारतीय कलाविश्वासाठी ही अभिमानास्पद घटना असून, पराग बोरसे यांच्या उत्कृष्ट कलाप्रवासाला मिळालेला हा आणखी एक उज्ज्वल टप्पा आहे. त्यांचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

## इमारतीच्या तोडकामामुळे वाहतुकीवर परिणाम

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल पालिका क्षेत्रात जुनी धोकादायक इमारतींच्या पुर्नबांधणीला वेग आला आहे. येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक समोरील इमारतीचे शनिवारी (दि.२०) तोडकाम सुरू करण्यात



आले. या कामामुळे येथील मुख्य रस्त्यावर सकाळपासून मोठी वाहतूककोंडी निर्माण झाली होती. शाळकरी मुले व नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागला. सुरक्षा म्हणून पोलीस बंदोबस्त, पालिका अधिकारी व ठेकेदारांचे कर्मचारी घटनास्थळी तैनात ठेवण्यात आले होते. यावेळी पालिकेने पुर्नबांधणीसाठी ठेकेदार नेमल्याची माहिती मिळाली आहे. मात्र, रस्ते बंद केल्याने नागरिकांना होणाऱ्या गैरसोयीबाबत प्रशासनाकडे अद्याप कोणतेही ठोस उत्तर नाही.

# ताडवाडी वाड्यांना नवा दिलासा

**| वावोशी | प्रतिनिधी |**

छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियानांतर्गत सुरू असलेल्या सेवा पंधरवड्याच्या औचित्याने रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी गुरूवारी (दि.१८) कर्जत तालुक्यातील आदिवासीबहुल ताडवाडी व चाफेवाडी ग्रामसभांना भेट देत ग्रामस्थांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी विविध उपक्रमांचा शुभारंभ करत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमादरम्यान कर्जतच्या तहसील कार्यालयामार्फत नवीन शिधापत्रिका, डीबीटी, अंत्योदय व संजय गांधी निराधार योजनेचे



लाभ, जिवंत ७/१२ अंतर्गत नवीन उतारे व विविध दाखले ग्रामस्थांना वाटप करण्यात आले. ग्रामविकास विभागामार्फत आयुष्मान भारत कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले. वनविभागाने बांबूची रोपे तर कृषी विभागाने हापूस आंब्याची कलमे वाटली.

दरम्यान, ग्रामस्थांनी वाहतुकीच्या मोठ्या समस्येकडे लक्ष वेधले. गावात दिवसातून केवळ एकच बस येते, अशी व्यथा समोर मांडल्यावर जिल्हाधिकारी जावळे यांनी थेट उपवाहतूक नियंत्रकांशी संपर्क साधून सोमवारपासून नियमित बससेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले. विशेष म्हणजे जिल्हाधिकारी साहेब हे चाफेवाडीत ग्रामस्थांसोबत जमिनीवर बसूनथेट संवाद साधत होते. त्यामुळे गावात आपलेपणाचा माहोल पसरलेला पाहायला मिळाला. यावेळी जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्यासमवेत कर्जतचे तहसीलदार धनंजय जाधव, गटविकास अधिकारी सुशांत पाटील, तालुका कृषी अधिकारी राजाराम शिंदे, सह प्रकल्प अधिकारी सौ. तेजस्विनी गलांडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव आदी उपस्थित होते.

### सैनिकांना फराळ

**पनवेल :** भारत विकास परिषदेच्या पनवेल शाखेकडून गेल्या पाच वर्षांपासून ‘सैनिक हो तुमच्यासाठी’ हा उपक्रम राबविण्यात येत आहे. यंदाही हा उपक्रम अधिक मोठ्या स्वरूपात साजरा होत आहे. दिवाळीच्या आनंदात सीमेवर तैनात असलेल्या आपल्या शूर जवानांनाही सहभागी करून घेण्यासाठी या उपक्रमातून फराळ आणि मिठाईचे बॉक्स देशाच्या विविध सीमांवर पाठवले जातात.

## ग्रामीण रुग्णालय समस्यांच्या गर्तेत

**| तळा | प्रतिनिधी |**

तळा ग्रामीण रुग्णालय विविध समस्यांच्या गर्तेत सापडले असून रुग्णालयातील अपुऱ्या सुविधांमुळे तालुक्यातील रुग्णांचे हाल होत आहेत. दरम्यान, तळा शहरातील राजेंद्र अडसुळे हे शिडीवरून पाय घसरून खाली पडले व त्यांच्या पायाला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी तळा ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आले. डॉक्टांनी त्यांची तपासणी केली असता त्यांच्या पायाला फ्रॅक्चर





असल्याचे निदर्शनास आले. त्यावेळी पायाचा एक्सरे काढण्याची गरज होती. परंतु, रूग्णालयातील एक्सरे मशील बंद असल्याने त्यांना माणगाव उपजिल्हा रुग्णालयात नेण्यास सांगितले. त्यांना चालता येत नसल्याने ॲमब्युलन्सने नेण्याचे ठरविले. परंतु, ती देखील उपलब्ध नसल्याने त्यांना खासगी वाहनाने माणगावमध्ये नेण्यात आले. परंतु, त्या ठिकाणी देखील हिच परिस्थिती होती. त्यामुळे नाहिलाजास्तव त्यांना खासगी दवाखान्यात उपचार घ्यावे लागले. या सर्व धावपळीत त्यांचा प्रचंड वेळ वाया तर गेलाच परंतु आर्थिक भुर्दंड देखील पडला. त्यामुळे तळा येथील ग्रामीण रुग्णालयात सोयी-सुविधांचा अभाव असल्याने उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांची कमालीची गैरसोय होत आहे.

## ‘न्याय सारथी’चा आधार गुन्हेगारीला चाप बसण्यास मदत

# घरबसल्या करता येणार तक्रारीची नोंद

**| खोपोली | प्रतिनिधी |**

भीती मुक्त तक्रारीसाठी रायगड पोलिसांकडून आधुनिकतेची मदत घेण्यात आल्याने आता पीडितांना भयमुक्त तक्रारीसाठी ‘न्याय सारथी’चा आधार मिळणार आहे. त्यामुळे ही प्रणाली पोलीस व नागरिक यांच्यामधील एक दुवा बनली आहे. क्यूआरकोडचा वापर करून ही प्रणाली सुरू करण्यात येत असून घरबसल्या तक्रारीची नोंद करता येणार आहे, असे मत खालापूरचे पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी व्यक्त केले आहे.

रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या



नेतृत्वाखाली रायगड पोलीस आणि सिमप्लरटुडे एआय यांच्या संयुक्त विद्यमाने न्याय सारथी ही प्रणाली सुरु करण्यात आली आहे. सर्वच ठिकाणी लहान मोठे वाद विवाद होत असताना काहीजण अन्यायाने त्रस्त आणि भीती पोटी पोलीस ठाण्यामध्ये जात तक्रार देण्यास पुढे येत नाहीत. तसेच, काहींना तक्रार कशा पद्धतीने द्यायची याची माहिती नसते. त्याचा परिणाम गुन्हेगार अधिक बळावून भविष्यात गंभीर परिणाम करण्याची शक्यता आहे. त्यामुळे अन्यायग्रस्तांना न्याय देण्यासाठी रायगड पोलिसांनी या प्रणालीच्या माध्यमातून क्यूआरकोडची निर्मिती करत आधुनिक युगातील टेक्नॉलॉजी मदत घेतली आहे. ‘न्याय सारथी’ प्रणाली सुरु करत नागरिकांची तक्रार कायदेशीर पद्धतीने व वेळेत पोलिसांकडे पोहोचविणे शक्य होणार आहे. त्यामुळे गुन्हेगाराला वेळीच चाप बसण्यास मदत होणार असल्याने रायगड पोलिसांच्या या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

कृषीवल
गणेश दर्शन स्पर्धा २०२५



सर्व विजेत्यांचे हार्दिक अभिनंदन

: प्रायोजक :
आरडीसीसी बँक
सहप्रवास प्रगतीचा
ISO 9001 - 2015 BANK

दिनांक : २९-०८-२०२५
प्रथम क्रमांक - अनिकेत पाटील-म्हात्रोळी,सारळ
द्वितीय क्रमांक - त्रिंबक वि. कुंटे-कुंठ्याचीगोठी
तृतीय क्रमांक - महादेव रामचंद्र दसवते-माणगांव

दिनांक : ३०-०८-२०२५
प्रथम क्रमांक - पांडुरंग घरत - लोणेरे-थळ
द्वितीय क्रमांक -संतोष र. खडतर - माणगांव
तृतीय क्रमांक - नागवेकर परिवार-अलिबाग

दिनांक : ३१-०८-२०२५
प्रथम क्रमांक - संतोष तुरे- मेढेखार अलिबाग
द्वितीय क्रमांक - रोशन शिवराम म्हसकर- पनवेल
तृतीय क्रमांक - सचिन अरुण माळी- तुडाल

दिनांक : १-०९-२०२५
प्रथम क्रमांक - ईश्वरी योगेश वावेकर- मेढेखार
द्वितीय क्रमांक -परेश प्रमोद घरत - कुरुळ
तृतीय क्रमांक - कल्पेश माळी- मुरुड

दिनांक : २-०९-२०२५
प्रथम क्रमांक - योगेश प्रकाश वार्डे- रांजणपाडा
द्वितीय क्रमांक - मोहन पाटील- सागाव अलिबाग
तृतीय क्रमांक - ह.बा. ठाकूर- चिरनेर, उरण

दिनांक : ३-०९-२०२५
प्रथम क्रमांक - रमेश बा. धुमाळ, नांगरवाडी
द्वितीय क्रमांक - तुषार गजानन कवळे - आवास
तृतीय क्रमांक - अनिल वर्तक- वरसोली

दिनांक- ४-०९-२०२५
प्रथम क्रमांक - गणेश तांदळेकर- माणगांव
द्वितीय क्रमांक - काशिनाथ पाटील - नागाव
तृतीय क्रमांक - किशोर नाईक -बोरगाव पेण

दिनांक - ५-०९-२०२५
प्रथम क्रमांक - संकेत साईनाथ घरत - थळपालथी
द्वितीय क्रमांक - निखिल नायसाठे- मुरुड
तृतीय क्रमांक - राजेंद्र पाटील - दिवीपारंगी

दिनांक - ६-०९-२०२५
प्रथम क्रमांक - गजानन पुळेकर- मुरुड
द्वितीय क्रमांक - वसंत धर्मा घरत- वरसोली
तृतीय क्रमांक - शिवाज्ञा शिवलकर- अलिबाग

विजेत्यांनी आपले बक्षीस २६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत दु. १२ ते सायं. ५ या कालावधीत कृषीवल कार्यालयातून येऊन घेऊन जाणे.

टीप : विजेत्यांनी येताना आपले फोटो असलेले ओळखपत्र सोबत घेऊन येणे.

पत्ता : कृषीवल कार्यालय, वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०

# महाड शहरात चिकनगुनियाची साथ

## महाड नगरपरिषदेकडून तातडीने फवारणी




**| महाड | प्रतिनिधी |**

**महाड शहराच्या चवदार तळे व परिसरामध्ये मागील काही दिवसापासून चिकन गुनियाचे रुग्ण मोठ्या प्रमाणात आढळून आल्याचे वृत्त समजतात महाड नगर परिषदेच्या आरोग्य विभागाकडून तातडीने परिसरात स्वच्छता मोहीम हाती घेण्यात आली. या विभागाचे प्रमुख रोहित भोईर यांनी दिली आहे. मात्र, ही साथ संपूर्ण शहरभर पसरण्याची शक्यता नागरिकांकडून व्यक्त केली जात असताना नगरपालिका मात्र बघ्याची भूमिका घेत असल्याने महाड शहर काही दिवसात चिकनगुनिया शहर म्हणून ओळखले जाईल अशी शंका निर्माण होत आहे.**

चवदार तळे परिसरातील अनेक इमारतीमध्ये, प्रत्येक घरात दोन ते तीन नागरिक चिकनगुनियाच्या आजाराने त्रस्त झाले असून चिकनगुनिया साथी संदर्भात नगरपरिषदेला अशा पद्धतीची माहिती प्राप्त झाली नसल्याचे सांगण्यात आले आहे. मात्र, अत्यावश्यक असणारी उपाययोजना बुधवारपासूनच तातडीने अमलात आणण्यात आली आहे

शहरातील प्रसिद्ध असणाऱ्या ऐतिहासिक चवदार तळे व डोंगरे पूल या परिसरामध्ये आवश्यक फवारणी मोहीम व धुराची यंत्रणांनी या परिसरात सर्व इमारती तसेच घरांच्या परिसरामध्ये फवारणी नगरपरिषदेकडून करण्यात आली. मात्र, खासगी वैद्यकीय तपासणी लॅबमध्ये याबाबतचे रुग्ण आढळले असताना व शहरातील खासगी वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे उपचारासाठी नागरिक जात असल्याने याबाबतची नेमकी वस्तुस्थिती व रुग्णांची आकडेवारी देखील खासगी वैद्यकीय अधिकारी नगरपालिकेकडे उपलब्ध नसल्याने शहरात मोठ्या प्रमाणावर याची लागण होण्यास सुरुवात झाली आहे

यासंदर्भात नगरपरिषदेकडून शहराच्या विविध भागांमध्ये याबाबतची विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. शहरात साधारणता १५ ऑगस्टनंतर चिकनगुनियाचे रुग्ण आढळण्यास सुरुवात झाली असताना देखील याची खबरदारी आरोग्य विभागाने घेतली नसल्याने त्याचा फैलाव आता संपूर्ण शहरात पसरण्यास सुरुवात झाली आहे. याबाबत नगरपालिकेने संपूर्ण शहरात स्वच्छता मोहीम राबवण्यासाठी मोहीम राबवत असली तरी भाजीपाल्या विक्रेत्यांकडून मोठ्या प्रमाणावर नाल्यामध्ये टाकण्यात येणारा कचरा शहरातील टायरवाले निकामी टायर ठेवत असल्याने त्यामध्ये डासांची होणारी उत्पत्ती होते. जागोजागी असणारे चायनीज सेंटरमुळे गोंगावणाऱ्या माशा व त्या ठिकाणी असणारी अस्वच्छता यामुळे मोठ्या प्रमाणावर डासांची उत्पत्ती होत आहे. महाड नगर परिषदेच्या अंतर्गत असणाऱ्या आकाशगंगा सहकारी गृहनिर्माण संस्थेने सन २०२० मध्ये त्यांच्या संस्थेच्या बाजूला असणाऱ्या मोकळ्या जागेमध्ये मोठ्या प्रमाणावर जंगली झुडपे व त्या ठिकाणी असणाऱ्या खड्ड्यात सांडपाणी साठत आहे. त्यामुळे डासांचा प्रादुर्भाव निर्माण होत आहे. तसेच त्या ठिकाणी असणाऱ्या एका विहिरीमध्ये मोठ्या प्रमाणावर डासांची उत्पत्ती निर्माण होते. या विहिरीतील घाण स्वच्छ करून घेण्याची सूचना नगर परिषदेच्या आरोग्य विभागाला दिली होती. मात्र पाच वर्ष उलटली तरी कारवाई शून्यतेमुळे नगर परिषदेचा कारभार सुस्त अवस्थेत असल्याचे पाहण्यास मिळत आहे.

### रुग्णांची माहिती घेण्याचे आवाहन

**संबंधित रुग्णांनी तसेच डॉक्टरांनी या संदर्भात नगर परिषदेची संपर्क साधून रुग्णांच्या संख्येबाबत माहिती द्यावी असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाकडून करण्यात आले आहे.**

# जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते दाखले वाटप

**| माणगाव | प्रतिनिधी |**



देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आदी कर्मयोगी अभियानाचे उद्घाटन जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते माणगाव तालुक्यातील तासगाव आदिवासीवाडीत बुधवार (दि.१७) रोजी करण्यात आले. यावेळी आयुष्यमान भारतकार्ड १५, जातीचे दाखले २७, जीवंत सातबारा वाटप १५, आभाकार्ड २० अशा विविध योजनांचे ७७ दाखले यावेळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

या उपक्रमास जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, तहसीलदार दशरथ काळे, गट विकास अधिकारी शुभदा पाटील, निवासी नायब तहसीलदार विपुल दुमे, मंडळ अधिकारी अर्जुन जमखंडी, तासगाव तलाठी मारुती चाटे, निजामपूर तलाठी भोजरंगे, कौशल वाघमारे, योगेश शिर्के, घाडगे, तसेच ग्रामपंचायतीचे सदस्य, सामाजिक कार्यकर्ते व सर्व विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. यावेळी उपस्थित ग्रामस्थांना जातीचे दाखले, जीवंत सातबारा, आयुष्यमान भारतकार्ड यांसह विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले.

# रिक्षाच्या धडकेने नागरिक जखमी

**पनवेल :** गोल्ड पॅलेस ज्वेलर्स पनवेल येथे रिक्षाचालकाने जोरदार धडक दिल्याने एक ७२ वर्षीय ज्येष्ठ नागरिक गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे. रिक्षा क्र. एमएच ४६ बीडी २६१६ वरील चालकाने रस्त्याच्या परीस्थितीकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगाने त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर झाले आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# स्मार्ट मीटर बसवण्यास विरोध

**| गडब | प्रतिनिधी |**

ग्रुप ग्रामपंचायत काराव हद्दीत गडब पंचक्रोशीत स्मार्ट मीटर बसवण्यास युवा संघटनेचा व गडब ग्रामस्थांचा तीव्र विरोध असल्याबाबतचे निवेदन विद्युत वितरण कंपनीचे पेण विभागाचे अधिक्षक अभियंता यांना देण्यात आले. मीटर ग्राहकांची समंती आसल्या शिवाय नवीन स्मार्ट मिटर बसविण्यात येऊ नये असे मुख्यमंत्र्यांचे आदेश आसताना देखिल कार्यालयातर्फे जुने मीटर बदलले जात आहेत. सर्वसामान्य वीज ग्राहक वाढीव दराने येणारे बीजबिल भरत आहेत. जुने मीटर बदलण्याची कोणतीही तक्रार नसताना तसेच नवीन मीटरची मागणी नसताना महावितरण कंपनीकडून नवीन स्मार्ट मिटर बसविले जात आहेत ते त्वरीत थांबवावेत. गडब येथे कायम स्वरुपी वायरमन नेमावा, नादुरुस्त विद्युततारा, झुकलेलेपोल बदलण्यात यावेत आदी मागण्याचे निवेदन आदर्श युवा संघटना गडब यांनी महाविरतरण कंपनीला दिले आहे. यावेळी संघटनेचे संचालक के. पी. पाटील, अध्यक्ष के. जी. म्हात्रे, दिलिप पाटील, संजय चवरकर आदीसह संघटनेचे पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# नवदुर्गांचा होणार सन्मान

**पनवेल :** शारदीय नवरात्र उत्सवाचे औचित्य साधून क्रांतिज्योत महिला विकास फाऊंडेशन महाराष्ट्र राज्यतर्फे पनवेल कार्यक्षेत्रातील ९ दुर्गांचा महासन्मान व स्त्री शक्तीचा जागर करण्यात येत आहे. नवरात्रीच्या नऊ दिवशी नवदुर्गेचा सन्मान करण्यात येणार असून यामधे पनवेल कार्यक्षेत्रातील महाराष्ट्र शासन, पोलीस प्रशासन,पालिका प्रशासन, तसेच कला, क्रीडा, राजकिय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकार अशा ९ क्षेत्रातील नामवंत स्रीशक्तीचा सन्मान करणार आहोत अशी माहीती क्रांतिज्योत महिला विकास फाऊंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा रुपाली शिंदे यांनी दिली. या उपक्रमासाठी नाव नोंदणीसाठी ८६५२४१४३४३, ७४००४०४३४२, ९२२४२०९१८८ या क्रमांकावर संपर्क करण्याचे आवाहन शिंदे यांनी केले आहे.

# सकल मराठा समाजातर्फे नक्कल प्रतीची मागणी

**| माणगाव | प्रतिनिधी |**



महाराष्ट्र शासनाने दि. २ सप्टेंबर २०२५ रोजी काढलेल्या जीआर नुसार संपूर्ण महाराष्ट्रासह रायगड जिल्ह्यात अंमलबजावणी व्हावी तसेच तहसील कार्यालयातील गाव नमुना १४ मधील जन्म, मृत्यू नोंदी तसेच इतर कागदपत्रामधून आढळून आलेल्या कुणबी, मराठा-कुणबी, कुणबी-मराठा नोंदीची नक्कल प्रत मिळावी यासाठी जिल्हाधिकारी किशन जावळे, राजिप मुख्यकार्यकारी अधिकारी नेहा भोसले, माणगाव उपविभागीय अधिकारी डॉ. संदीप सानप, माणगाव तहसीलदार दशरथ काळे यांच्या उपस्थितीत सकल मराठा समाजातर्फे मागणी करण्यात आली. यावेळी माणगाव तालुका सकल मराठा समाजाचे प्रतिनिधी राजू मोरे, संजोग मानकर, शिवाजी घाग, शंकर पवार, विश्वास खानविलकर, प्रताप सावंत, संजय घाग, उत्तम जाधव आदी उपस्थित होते.

# तरुणी बेपत्ता

**पनवेल :** पनवेल तालुक्यातील भाताण येथून एक १८ वर्षीय तरुणी पोटदुखीच्या गोळया आणण्यासाठी मेडीकलमध्ये जाते असे सांगून घरून निघून गेली व परत घरी न आल्याने ती बेपत्ता झाल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सदर तरुणीबाबत कोणाला काही माहिती असल्यास संपर्क करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. वैष्णवी देऊळगावकर असे या तरुणीचे नाव असून उंची ५ फुट ३ इंच, रंग गोरा, नाक सरळ, अंगाने मध्यम आहे. तसेच तिने अंगात निळ्या रंगाचा कुर्ता, निळ्या रंगाची लेगीज, आशी रंगाची ओढणी आहे. सदर तरुणीबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल पोलीस ठाणे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पंचायतराजसाठी ग्रामसभेचे आयोजन



**| पाली | प्रतिनिधी |**

राज्य सरकारतर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यान राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर ग्रुप ग्रामपंचायत राबगाव यांच्या वतीने विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते.

एकजुटीचे सूत्र अमलात आणले तर ग्रामपंचायतीमधील गाव-वाड्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल असे प्रतिपादन सरपंच स्नेहा भोईर यांनी केले.

राबगाव ग्रामपंचायत संधीचा उपयोग करून गाव आणि वाड्यांचा विकास शिखरावर नेण्यासाठी सज्ज झाली आहे. या अभियानातील नियोजनासाठी ग्रामसभा घेतली. तहसील कार्यालयाकडून सेवा पंधरवडा हा कार्यक्रम देखील राबविण्यात आला. या कार्यक्रमासाठी तहसील कार्यालयातून नायब तहसीलदार भारत फुलपागारे यांनी नागरिकांना मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, सर्व सदस्य, तलाठी, अंगणवाडी सेविका, अशा कार्यकर्ते, शिक्षक, आरोग्य विभागाचे कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

# पाषाणे ग्रामपंचायतीत सीसीटीव्हीची मागणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्याचे शेवटचे टोक असलेल्या पाषाणे ग्रामपंचायतीमध्ये मोठ्या प्रमाणावर नागरीकरण वाढले आहे. या भागात बाहेरून येणाऱ्या लोकांची संख्या मोठी असून अनुचित प्रकार घडण्याच्या शक्यता आहे.तसेच स्थानिकांच्या सुरक्षेचा प्रश्न लक्षात घेऊन सीसीटीव्ही मागणी करणारे निवेदन ग्रामपंचायत प्रशासनाला देण्यात आले.

पाषाणेमध्ये असलेल्या सर्व गावातील आदिवासी वाडीतील प्रवेशद्वारामध्ये, अंगणवाडी, शाळा तसेच मुख्य रस्त्यावर, सर्वधर्मीय धार्मिक स्थळे आणि प्रेक्षणीय स्थळांवर सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी उत्तम पालांडे यांनी निवेदनाद्वारे मागणी केली आहे

मागील हप्त्यामध्ये विराट ग्रीन बूड येथील सोसायटी मधील दुकानातून चोरांनी एका महिलेच्या गळ्यातून एकतोळे सोन्याची चैन चोरीस नेली, तसेच मागील काही वर्षात आपल्या गावातून काही शेतकरी परिवाराची जनावरे चोरीला गेली आहेत. पण मागील काही चोरीच्या घटनामुळे त्यांना न्याय न मिळाल्यामुळे शेतकरी वर्ग उदासीन झाला झाला असल्याने पाषाणेमधील सर्व गावातील आदिवासीवाडीत सीसीटीव्ही यंत्रणा बसविण्यासाठी मागणी जोर धरत आहे.

**मागील पाच दशकापासूनची परंपरा कोणत्याही प्रकारचा मोबदला ठरलेला नाही**

# शहाळ्याच्या देवीच्या मुखवट्यांना मागणी

**| उरण | प्रतिनिधी |**

**नवरात्रोत्सवाला सोमवार (दि.२२) सप्टेंबरपासून सुरुवात होत असून यानिमित्ताने सार्वजनिक तसेच घरगुती स्वरूपात घट स्थापनेसाठी तालुक्यातील उरण नागावमधील गजाजन नाईक यांच्या कडील मागील पाच दशकापासून नारळाच्या शाहळ्याचे देवीचे मुखवटे बनविण्याची परंपरा चालू आहे.**



नागावमधील ८३ वर्षीय वयाचे गजानन नाईक हे गेल्या ४० वर्षांपासून देवीची सेवा म्हणून हे नारळाच्या शाहाळ्या पासून तयार करीत आहेत. त्यांना चित्रकलेची आवड होती. त्यामुळे कला येत असल्याने मित्रांनी त्यांच्याकडून असे मुखवटे तयार करून घेण्यास सुरुवात केली. अशा प्रकारच्या मागणी नंतर त्यातूनच ही परंपरा सुरू झाल्याचे ते आवर्जून सांगतात. हे मुखवटे तयार करण्यासाठी नवरात्रोत्सवाच्या दहा दिवस अगोदरपासून तयारी करावी लागते. शहाळे साफ करून त्याला आकार देऊन सुंदर, आकर्षक पेंटिंग केले जातात.

पूर्वी ५० ते ६० मुखवटे बनवीत असत परंतु कोरोना नंतर हे काम कमी त्यांनी केले आहे. सध्या दरवर्षी किमान २५ ते ३० मुखवटे ते याही वयात करतात. हे काम ते कलेचे एक साधक म्हणून करीत आहेत. शाहळ्या बरोबरच धातूच्या मुखवट्यांना रंगविण्याचे काम ते करतात. यासाठीचे कोणत्याही प्रकारचे दर ठरविण्यात आलेले नसून देवीचे भक्त व कलेची जाण ठेवून जो मोबदला देतील तो ते घेत आहेत.

त्यांची ही परंपरा पुढे नेण्याचे काम अशीच प्रकारची कलेची जाण व छंद असलेला नातू हर्षवर्धन पवार या नातवाकडे त्यांनी सोपवली आहे. याकामी नातू त्यांना मदत करीत आहे. त्यामुळे नवरात्रोत्सवासाठी शाहळ्याचे मुखवटे तयार केले जाणार असल्याचा आशावाद व्यक्त करण्यात येत आहे. बाजारातही तयार मुखवटे विक्रीसाठी आलेले आहेत. मात्र, तरीही परंपरेने नारळाच्या शाहाळ्यापासून तयार केलेल्या मुखवट्यानाही पसंती दिली जात आहे.

### जिल्ह्यात भाविकांकडून मागणी

**मुखवट्यांना जिल्ह्यातील उरण, फुंडे, नवीन शेवा, डोंगरी, ठाणे, नवी मुंबईसह अलिबाग, पेण आणि पनवेल तालुक्यातील भाविकांकडून मागणी आहे. उरणच्या नागावमध्ये दोन ठिकाणी ही कला परंपरेने जपली जात आहे.**

## निवडक



### वाजेकर महाविद्यालयातर्फे स्वच्छता मोहीम

**उरण :** राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना फुंडे कॉलेज व के. डी. एस. कॉलेज, यु. ई. एस. महाविद्यालय सागर विचार मंच, कंदळवन फाऊंडेशन सेल रायगड, नागरी संरक्षण सेवा दल उरण फ्रेंड्स ऑफ नेचर यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार (दि.२०) सप्टेंबर रोजी उरण येथील नागाव समुद्र किनाऱ्यांची स्वछता करण्यात आली. यावेळी ३०० विद्यार्थी उपस्थित होते. नागरी सेवादल फ्रेंड्स ऑफ नेचर व इतर सामाजिक संस्थेचे १०० व्यक्ती कांदळवन संरक्षण दलाचे २५ जवान, नरेंद्र गायकवाड, म्हातवली ग्रामपंचायतीचे सदस्यांनी उपस्थित राहून समुद्र किनारा स्वच्छता करण्यात आली. कचरा संकलनासाठी निकेतन रमेश ठाकूर, प्रा. राम गोसावी, प्रा. बळीराम पवार कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना, फुंडे कॉलेज, महाविद्यालयातील सकाळ सत्रातील कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

### रुक्मिणी शिंदे यांचे निधन

**धाटाव :** रोहा तालुक्यातील खांब देवकान्हे विभागातील रुक्मिणी विठोबा शिंदे यांचे वयाच्या ९० व्या वर्षी नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले आहे. यांच्या निधनामुळे समाजात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली, दीर, जावा, पुतणे, पुतणी, सुना, नातवंडे पतवंडे असा मोठा शिंदे परिवार आहे. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच त्यांच्या अंत विधीसाठी विविध समाजातील सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, राजकीय क्षेत्रातील असंख्ये मान्यवरांनी त्यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन करत त्यांना श्रद्धांजली वाहिली. तसेच दशक्रिया विधी बुधवारी २४ सप्टेंबर तर उत्तरकार्य तेरावे शनिवारी २७ सप्टेंबर रोजी त्यांच्या निवासस्थानी मौजे चिल्हे येथे होणार आहेत.





### आगार परिसरात टपऱ्यांचा विळखा

**म्हसळा :** म्हसळा नगर पंचायती मार्फत स्वच्छता ही सेवा पंधरवडा मोहीम राबविण्यात येत असली तरी म्हसळा शहराचा नाका अधिकृत टपरीधारकांनी बकाल केला आहे. म्हसळा नगराचा दिघी नाका, एसटी स्थानक परिसर, ग्रामीण रुग्णालय आणि नव्याने बांधण्यात येणारे पोलीस ठाणे प्रशासकीय इमारत संरक्षण भिंतीला लागूनच शासकीय जागेत खासगी टपरी धारकांनी, हातगाडी, झोपडे बांधून ठिय्या मांडला आहे. अशाने म्हसळा शहराचे बकालपण वाढले आहे. हिच परस्थिती मुख्य राजीप शाळा नंबर १ आणि मुख्य बाजार पेठेत आहे.अशामुळे नागरिकांनी हमरस्त्यावर मार्ग काढणे जिकिरीचे झाले आहे.अनेक वेळा तक्रार करूनही म्हसळा नगर पंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे समोर येत आहे. टपरी धारकांनी हमरस्त्याला वेडल्याने एसटी बस पार्किंग करणे, रूग्णवाहिका, स्कूल बस अन्य वाहनांना मार्ग काढणे, बाजार पेठेत येणाऱ्या ग्राहकांना खरेदी विक्री करण्यासाठी मोठे जिकिरीचे होऊन बसले आहे. टपरी धारकांचा हम रस्त्यावर विळखा झाला असल्याने ट्रॅफिक जॅम समस्या निर्माण होत असुन रस्त्यावर रोजच कचऱ्याचा ढीग साचत असल्याचे दिसून येत आहे. स्वच्छ म्हसळा सुंदर म्हसळा हे ब्रिद फक्त कागदावर उतरून नगर पंचायत प्रशासनाने जनतेच्या समस्याकडे दुर्लक्ष केले आहे.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- सर्वप्रकारचे आजार, लठ्ठपणा, संतानप्राप्ती, व्यसनमुक्ती, विवाह/सोनेतारण बिनव्याजी/लाखस दर महा ५०००/- घरबसल्या पिढ्यांपिढ्या लाखो कमविण्याची डॉ.नथुराम शिडू (नागोठणा-पोयनाड)रायगड ७५०७१६६०१५
- हॉस्पिटलमध्ये काम करण्यास हवे आहेत. १) नर्स ANM/GNM २) नर्स Private Nursing Course. ३) मुले/मुली १२ वी पास. ४) X-Ray साठी मुले, ५) मावशी/आयाबाई, ६) रिसेप्शनिस्ट. आधारकार्ड व अनुभव असल्यास प्रमाणपत्र आणावे. अंजली हॉस्पिटल अलिबाग, ७७४५०५००२५, ९११९५६५०२२, ९३२१३०३९३८
- जुन्या चांगल्या कंडिशनच्या वापरत्या मोटर साईकल कम स्कुटर योग्य भावात विकत मिळतील. दुकान कामासाठी मुलगा पाहिजे. योग्य वेतन मिळेल. मो. ९१४६९२३३९५, ७६६६४६६८६६
- भारत पेट्रोल पंप चेंढरे अलिबाग बायपास येथे कामासाठी मुले पाहिजेत. ७४४७४०४४११/९४२३८५४८७०
- पाहिजेत : अलिबागमधील नामांकित ऑफिसकरीता पदवीधर मुलगा/मुलगी भरणे आहे. संपर्क : ९९२३७५०५४९, ९४२२३८३०९९
- वरसोली मोक्याची जागी चालू आईस्क्रिम पार्लर आणि केकचे दुकान योग्य भाड्याने देणे आहे. संपर्क :९४२३३७७४२२
- कन्स्ट्रक्शन ऑफीस कामाकरिता अनुभवी अकाऊंटंट महिला/मुलगी पाहिजे. अनुभव २ ते ३ वर्षे शैक्षणिक पात्रता बी.कॉम, टायपिंग व बेसीक कॉम्प्युटर पगार रु. १००००/- ते १२०००/- संपर्क- मु. नांदाईपाडा, पो. झिराड, ता.अलिबाग, जि.रायगड, मोबाईल नं. ८९८३०९३३५३.
- अलिबागमधील आर्किटेक्ट ऑफिसकरीता ऑटोकेड ड्राफ्टसमन 3d डेवलपर, इंटीरियर डिझाइनर पाहिजे. मोबाईल नंबर ९९७०३९१६९७
- श्री सिद्धीविनायकज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरीधंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण, अलिबाग फोन नं. ९९६०४५६९८६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

### २१ सप्टेंबर

१) श्रीम.प्रगती चिंतामण वर्तक
वेश्वी, अलिबाग
२१-९-१९४३

२) श्री.मनोहर कृष्ण भगत
समर्थनगर, अलिबाग,
२१-०९-१९४९

३) श्री.विलास हरिभाऊ गंभीर
अलिबाग, २१-०९-१९५१

४)श्री.श्रीकृष्ण भिमाजी थळे
गोंधळपाडा, अलिबाग
दि.२१-०९-१९४९

५)श्रीम.सुप्रिया सुरेश पाटोळे
वरसोली, अलिबाग
दि.२१-०९-१९५१

६)श्री.राजन बाळकृष्ण नाईक
मु.वरसोली, अलिबाग
दि.२१-०९-१९५४

## बोधकथा
## संत एकनाथ महाराज

दासोपंत या नावाचे पुरुष होऊन गेले. ते नाथांना समकालीन होते.ते फार मोठे दत्त भक्त होते. त्यांची साधना एवढी मोठी होती की स्वतः भगवान श्री दत्त त्यांच्याबरोबर सोंगट्याचा डाव खेळायला बसत असत.केवढे हे ऐश्वर्य!!श्री नाथांच्या घरी फाल्गुन वैद्य षष्ठीला श्री जनार्दन स्वामींचा पुण्यतिथी उत्सव होता. एकनाथ महाराज जातीने दासोपंतांच्याकडे आमंत्रण देण्यासाठी गेले होते. त्यावेळी श्री दासोपंत आणि श्रीदत्त सोंगट्या खेळत होते. श्री नाथांनी दासोपंतांच्या घराच्या पायऱ्या चढताच भगवान श्री दत्त अदृश्य झाले. त्याचवेळी श्री एकनाथ घरात शिरले. श्री नाथांना पाहताच श्री दासोपंत मोठ्याने म्हणाले, किती रे दुर्दैवी माणूस तू! हा बघ पट. मी आणि भगवान श्री दत्त आता सोंगट्या खेळत होतो, तू घरात शिरलास आणि ते अदृश्य झाले. श्रीनाथ अत्यंत लीनतेने म्हणाले, खरे आहे. माझ्याकडे वद्य षष्ठीला श्री जनार्दन स्वामींचे पुण्यस्मरण आहे म्हणून मी आपल्याला बोलवायला आलो आहे. आपल्याला आता होय नाही करता येणार नाही. मी दुर्दैवी आहे. म्हणून आपल्यासारख्या संतांनी माझ्याकडे येऊन माझ्या उद्धाराचा मार्ग मला दाखविलाच पाहिजे. हे संतांचे ब्रीद आहे. हे दोघेही सत्पुरुष एकमेकांच्या परिचयाचे च होते. फाल्गुन वद्य षष्ठी या दिवशी श्री दासोपंत पैठणला श्री एकनाथ महाराजांच्या घरी गेले. श्री नाथांच्या वाड्याजवळ येताच दिंडी दरवाजासमोर भालदाराच्या वेषात प्रत्यक्ष श्री दत्ताचे दर्शन झाले. अनन्यगतिक अशा श्रीदासोपंतांनी भगवान दत्तांना विचारले देवाधिदेवा! आपण स्वतः इथे? आणि या वेषात ? भगवान श्री दत्त म्हणाले, अरे दिंडी दरवाजातून तू आत डोकावून पहा. भगवान श्रीकृष्ण पाणी भरतो आहे. मालकाकडे आज कार्य आहे. आश्चर्याने स्तंभित झालेले दासोपंत म्हणाले देवा, श्री एकनाथ माझ्याकडे आले होते तेव्हा आपण अदृश्य का झालात? भगवान श्रीदत्त म्हणाले, अरे मालकांसमोर कसे खेळायचे?

### सद्‌गुरू स्वामी बोध

या सगळ्या मोठ्या लोकांच्या गोष्टी. मोठ्या रम्य कथा. याचा अर्थ एवढाच की अशा तऱ्हेचे भाग्यवान देह वाटेवर पडले नाहीत. ते इतके स्वस्त नाहीत. ते मागून मिळत नाही. त्यासाठी अमापपुण्य आणि साधूंची संगती जन्मोजन्मी असावी लागते. म्हणून आपण एक क्षणभरही हरिनामाशिवाय घालवू नये.

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

# रेबीज लसीचा तुडवडा

## ● रुग्ण माणगाव रुग्णालयात दाखल



**| महाड | प्रतिनिधी |**

महाड तालुक्यातील कुर्ला गायकरवाडीमधील एका पिसाळलेल्या कुत्र्याने गावातील अनेक लोकांना जखमी केल्या असून त्यापैकी तीन गंभीर रुग्णांना महाड ग्रामीण रुग्णालयात प्रतिबंधात्मक रेबीज लस उपलब्ध नसल्याने या रुग्णांना माणगाव ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.

महाड ग्रामीण रुग्णालयाचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. पिसाळलेल्या कुत्र्याने कुर्ला गायकरवाडी गावातील धोंडू तांबडे सनी खेडेकर व मालती पवार व अन्य एका व्यक्तीला गंभीर दुखापत केली आहे.

कुर्ला गायकरवाडीतील पिसाळलेल्या कुत्र्याने चावा घेतल्याने गंभीर जखमी झालेल्या रुग्णांना महाड ग्रामीण रुग्णालयात शरगाव गावचे सरपंच सोमनाथ ओझर्डे यांनी दाखल केले. मात्र, महाड ग्रामीण रुग्णालयात आणल्यानंतर त्या ठिकाणी प्रतिबंधात्मक रेबीज लस उपलब्ध नसल्याने अखेर महाडपासून ३० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या. माणगाव ग्रामीण रुग्णालयात शनिवारी पहाटे तीनच्या सुमारास नेण्यात आले.

या प्रकाराबाबत तीव्र संताप व्यक्त केला जात असून केवळ रुग्णालयाच्या इमारती बांधण्याचे काम काढायचे व प्रत्यक्षात वैद्यकीय अधिकारी व औषध उपचाराचा साठा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करायचे असे प्रकार चालू असून आरोग्य यंत्रणा सलाईनवर गेल्याचे चित्र यानिमित्ताने अधोरेखित होत आहे.

वैद्यकीय अधिकारी यांना विचारणा केली असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी असे सांगितले की पिसाळलेल्या कुत्र्याच्या अँटी रेबीज सीरमची लस महाड रूग्णालयात आयसीयू कक्ष नसल्यामुळे आम्हाला ठेवता येत नाही.

> “ पिसाळलेल्या कुत्र्याच्या अँटी रेबीज सीरमची लस महाड रूग्णालयात आयसीयू कक्ष नसल्यामुळे आम्हाला ठेवता येत नाही परंतु जर रुग्णांना द्यायची झाली तर आम्ही अलिबाग, माणगाव, पेण या ठिकाणी पाठवण्याची व्यवस्था करतो.
> –डॉ शंतनु डोईफोडे
> महाड वैद्यकीय अधिकारी ”

## उरण येथे सागरी स्वच्छता अभियान



**| उरण | प्रतिनिधी |**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालय, वीर वाजेकर कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय फुंडे व उरण एज्युकेशन सोसायटीचे महाविद्यालय उरण, यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने सागर स्वच्छता अभियान आयोजित केले होते. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी संपूर्ण सागर किनारा परिसर स्वच्छ केला. किनाऱ्यावर असलेल्या विविध कॅरीबॅग, पाणी बॉटल्स, इतर केरकचरा विद्यार्थ्यांनी जमा केला व नागाव ग्रामपंचायत कधी सुपूर्द केला. एकूण जवळपास ३००० किलो कचरा जमा केला. व स्वच्छतेचा संदेश व पर्यावरण रक्षणाचा संदेश समाजाला दिला गेला.

या स्वच्छता मोहिमेत सागर सीमा मंच रायगड विभाग, नागरी संरक्षण दल, उरण यांनीही सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या मनात स्वच्छतेची जाणीव निर्माण व्हावी व सागर किनारा स्वच्छतेचे महत्व विद्यार्थ्यांना समजावे या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन. प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे, प्रा. डॉ. राम गोसावी, प्रा. रेश्मा बंगारे, प्रा. दिपु यादव आदींनी यशस्वीतेसाठी मेहनत घेतली.

## कोलाड ते सुतारवाडी रस्त्यावर खड्डे



**| सुतारवाडी | प्रतिनिधी |**

कोलाडपासून सुतारवाडी या दहा किमी अंतराच्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे जून महिन्यापासून पडले आहेत.

सुतारवाडी नाक्यावर तर रस्त्याच्या बाजूला आणि मधोमध मोठे खड्डे पडलेले आहेत. गणपती पूर्वी जागोजागी पडलेले खड्डे बुजविले जातील अशी अपेक्षा हजारो प्रवाशांनी केली होती.

मात्र, ती अपेक्षा फोल ठरली आहे. रात्रंदिवस या ठिकाणाहून हजारो लहान मोठी वाहन त्याचप्रमाणे अवजड सामान घेऊन जाणारे ट्रेलर धावत असतात. दिवाळी सणापूर्वी तरी कोलाड ते सुतारवाडी मार्गावरील पडलेले खड्डे बुजविले जातील काय असा प्रश्न हजारो प्रवाशांना पडलेला आहे.

## उद्‌बोधन कार्यशाळा

तळे : तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील सहभागी स्वयंसेवकासाठीची उद्‌बोधन कार्यशाळा शनिवार (दि.१३) सप्टेंबर रोजी संपन्न झाली. या कार्यशाळेस प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. तुळशीदास मोकल उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. दत्ता कुंटेवाड यांनी केले. कार्यशाळेचे निवेदन प्रा. भरत चाळके यांनी केले. या कार्यक्रमास प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता झाला खुला

**| माणगाव | प्रतिनिधी |**

माणगाव तालुक्यातील मांगवली आदिवासीवाडीतील स्मशानभूमीचा रस्ता अखेर मोकळा झाला आहे. छत्रपती महाराजस्व अभियान अंतर्गत सेवा पंधरवाडा या उपक्रमात शासनाने आदिवासी बांधवांच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीची पूर्तता केली आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त हे अभियान राबविले आहे.

आदिवासीवाडीतील ग्रामस्थांना गेली अनेक वर्षे स्मशानभूमीकडे जाण्यासाठी केवळ पायवाट होती. मृतांचे अंत्यसंस्कार करण्यासाठी दूरवरच्या कठीण पायवाटेने जावे लागत असल्याने ग्रामस्थांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत होता.



शासनाच्या नवीन धोरणांतर्गत या पायवाटेला विकास कार्यक्रमात समाविष्ट करून रस्ता मोठा करून खुला करण्यात आला. १७ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या हस्ते फित कापून तर राजिपच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून रस्त्याचे उद्‌घाटन करण्यात आले. यावेळी माणगाव उपविभागीय अधिकारी डॉ. संदीपान सानप, तेजस्विनी गलांडे, दशरथ काळे, विपुल ढुमे, अर्जुन जमखंडी, गणेश विटेकर, प्रियांका सत्तेरे, शुभांगी कमलाकर, प्रतीक्षा डामसे, सुवर्णा सकपाळ, मंगेश पवार, माई पवार, आदेश तेटगुरे, बाबू पाखुर्डे उपस्थित होते.

# साप्ताहिक राशिभविष्य २१ ते २७ सप्टेंबर २०२५

**ज्योतिषी : मिलिंद पाटील, सारळ-अलिबाग**
**मोबा.९४०४७९१७९८**

### प्रलोभनापासून दूर राहा

**मेष :** राशीधारकांना जोडीदाराकडून प्रेमाचा वर्षाव होईल. इतरांना मदत करण्यात पुढाकार घ्या. नोकरदारांनी कामावर व्यवस्थित लक्ष देणे गरजेचे आहे. लहानशी चूक ही त्रासदायक ठरू शकते. मित्रवर्गांकडून दिलासा मिळेल. घरून काम करताना जागरूक राहा. साथीदाराशी प्रेमसंबंधांने वागणे हितकारक राहील. त्यांच्या मनाचा विचार करून वागा. प्रलोभनापासून दूर राहा. विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. आर्थिकबाजू ठीक राहील. आपणास येणाऱ्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी ज्येष्ठांचे मार्गदर्शन मोलाचे ठरू शकते. दुसऱ्यांना दोष देण्यापेक्षा आपण आपले आत्मपरीक्षण करणे योग्य. हाती घेतलेले काम पूर्ण करण्यासाठी चिकाटीने प्रयत्न करण्यासाठी तयारी ठेवा. आपल्या बोलण्याने इतरांची मने दुखावणार नाहीत, याची दक्षता घ्या. सकारात्मक विचार करून मानसिकता चांगली ठेवण्याचा प्रयत्न करा. **महिलांना :** कुटुंबासाठी व मुलांसाठी अधिक वेळ देऊन त्यांची काळजी घ्यावी. आपल्या प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. नियमित व्यायाम, खाण्यापिण्याची पथ्ये पाळा. विशेषतः उष्णतेच्या विकारापासून सावध राहा. **शुभदिनांक :** २१,२३.

### वादाचे प्रसंग टाळा

**वृषभ :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपली मानसिकता बिघडणार नाही याची दक्षता घ्या. घरगुती वादविवादाचे प्रसंग कटाक्षाने टाळा. सर्वांशी जुळवून घ्या. सर्व बाबतीत आर्थिक बाजू लक्षात घेऊन हिशोबी राहण्याचा प्रयत्न करा. जागेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आदरयुक्त वागणे कायम ठेवल्यास त्याचा उयोग होईल. नव्या ओळखींचा लाभ घेता येईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. कलाकारांना त्यांच्या अंगभूत कलागुणांना चांगला वाव मिळेल. दुसऱ्याच्या मताने कोणतेही काम करू नका सल्ला फक्त आपल्याच माणसाचा घ्या. थोडे काम थोडा आराम हे धोरण लांब ठेवणे हिताचे आहे. या सप्ताहाचा शेवटचा कालावधी आपल्यासाठी संमिश्र घटनांचा ठरणार आहे. आपल्या कामाचा ताण थोडा हलका होईल. **महिलांना :** कुटुंबातील वातावरण आनंदी राहील. दाम्पत्य जीवनात छोट्या-छोट्या कुरबुरी होतील. पण त्या आपण अलगद सोडूव् शकाल. आपण संयम राखल्यास आपली बरीच कामे पूर्ण होतील. पण घाई केलीत तर हातात धुपाटणे येईल. **शुभदिनांक :** २४,२५.

### भावनांना आवर घाला

**मिथुन :** राशीसाठी या सप्ताहाचे बेजबाबदारपणे कोणतेही कृत्य करू नका. प्रत्येक पाऊल विचार पूर्वक उचला. इतरांमधील दोष काढण्याचे कटाक्षाने टाळावे. आपल्या भावनांना आवर घालून जबाबदारपणे वागण्याचा प्रयत्न कराव. आपल्या बोलण्यावर योग्य नियंत्रण ठेवल्यास आपल्याबद्दल गैरसमज होण्याचे प्रसंग टाळू शकाल. अनावश्यक खर्च टाळावा. त्यामुळे खर्चावर नियंत्रण राहील, आर्थिक बाबतीत तज्ज्ञांच्या सल्ल्यानेच व्यवहार करावेत. जेणेकरून ज्याचा योग्य परतावा आपणास मिळू शकेल. प्रकृतीची पथ्ये पाळा. आपण थोरामोठ्यांच्या विचारांचे स्मरण करा. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने प्रथमपासून अनावश्यक खर्च टाळावा. साहसीवृत्ती कटाक्षाने टाळा. नोकरादारांना दिलासा मिळेल. बौद्धिकक्षेत्राला वाव मिळेल. आपली बलस्थाने कोणती याचा मागोवा घ्या, म्हणजे त्यांचा भावी काळासाठी उपयोग करता येईल. **महिलांना :** कोणतीही गोष्ट विचार पूर्वक करा बेजबाबदार वागून आपण हास्यपद होऊ शकता त्यामुळे लहान बाबतीत ही आपले पाऊल घसरू देऊ नका. वाट पाहण्यास शिका. **शुभदिनांक :**२६,२७.

### आत्मविश्वासात वाढ करा

**कर्क :** राशीधारकास या आठवड्यात शेवटचा कालावधीचा आपल्यासाठी उत्तम जाणार आहे. हे जरी असले तरी आततायीपणा हानीकारक ठरू शकतो. कोणतीही घाई करू नका, विचार पूर्वक प्रत्येक गोष्ट करा. बौद्धिक चातुऱ्याच्या जोरावर वेगवेगळे लाभ मिळतील. मान, सन्मान, ख्याती वाढेल. आत्मविश्वासात वाढ होईल. व्यवहार कौशल्यामुळे फायदा होईल. पालकांच्या आरोग्याची काळजी घ्यावी लागेल. नवे विचार, संकल्पनांची रुजवण होईल. आगामी आठवड्यात आपल्या प्रामाणिकपणाचा फायदा होईल. आपली विनम्र वृत्ती कायम ठेवा. घरण्यातील जुने वाद संपुष्टात येतील यासाठी आपण प्रयत्न करणे आपल्या हिताचे आहे. आपल्या गुणांमुळे लोकप्रियतेत वाढ होईल. प्राचीन ग्रंथांचे वाचन कराल. सुखात वृद्धी होईल. आठवडाभर आनंदात राहाल. श्वासासंबंधी आजार बळावण्याची शक्यता आहे. कंबर, पाठ आणि मानेचे दुखणे बळावू शकते. औषध उपचार वेळेवर करणे हिताचे आहे. विचार करूनच पाऊले उचला. **महिलांना :** थोड निराश झाल्या सारखे वाटेल, घाबरण्यासारखे काहीही नसेल उगाचच घेतलेल्या ताणामुळे त्रास होऊ शकतो. **शुभदिनांक :** २१,२७.

### रागावर नियंत्रण ठेवा

**सिंह** : राशीसाठी या आठवड्यात चिंतन-मनन लाभदायक ठरेल. भविष्याची चिंता सतावेल. अनावश्यक खर्च होतील. रागावर नियंत्रण ठेवा. आगामी आठवड्याचा काळ उत्तम असेल. प्रतिष्ठा वाढेल. प्रतिकूल परिस्थिती केलेल्या कामांमुळे वरिष्ठ अधिकारी आपले कौतुक करतील. आपल्या कार्यक्षेत्रातील आपला प्रभाव वाढता राहील. नवीन ओळखीतून अचंबित करणारी वार्ता समजेल. भीतीदायक स्वप्ने पडण्याची शक्यता. जोडीदाराबद्दलचे प्रेम वाढेल. आर्थिक धोका पत्करू नका. भौतिक गोष्टींचा आनंद घ्याल. व्यवसायातील निर्णय ठामपणे घ्या. गोडधोड खाण्याचा योग आहे घरात एखादे शुभ कार्य ठरणार आहे. खर्चावर नियंत्रण ठेवणे गरचेचे आहे आपल्यासाठी आगामी आठवडा एकदम अनुकूल असेल. मित्रांच्या सहकार्याने अनेक कामे हातावेगळी कराल. समर्थकांच्या संख्येत वाढ होईल. भावंडांकडून शुभवार्ता मिळण्याची शक्यता आहे. **महिलांनाः** आपल्या कामाचे कौतुक होणार आहे. एखादे महत्वाचे कागदपत्र हरवू शकते त्या बाबत काळजी घ्या. **शुभदिनांक :** २२,२६.

### समस्यांचे निराकरण करा

**कन्या :** राशीसाठी या आठवड्यात एखाद्या गोष्टीप्रतीचे आकर्षण वाढीस लागेल. तरुणांनी आपल्या आयुष्यात प्रेमाचे आगमन होण्याची शक्यता राहील. आपल्या स्वभावातील गोडवा कायम ठेवा. आपल्या व्यक्तिमत्त्वातील एखादा नवा पैलू उजेडात येईल. यामुळे आपले नाव चांगलेच चमकणार आहे. आचरण उत्तम ठेवा. धर्म आणि अध्यात्मातील आवड वाढेल. परोपकार कराल. हाती घेतलेल्या कामात यश मिळेल. पद, प्रतिष्ठेचा मार्ग प्रशस्त होईल. संगीत, ललित कलांमध्ये विशेष रस प्राप्त होईल. समर्थक आणि विरोधक वाढतील. आठवड्यात जोडीदाराशी वाद घालू नयेत. रागावर नियंत्रण ठेवा. या आठवड्यात आपल्या कार्यक्षेत्रात आपल्याला कठोर परिश्रम करावे लागतील. कोणत्याही प्रकारच्या वादात पडू नये. व्यवसाय, उद्योगात डोळे बंद विश्वास ठेऊ नका. उदार मनाने एखाद्याला मदत कराल. आपल्या कष्टाची, परिश्रमांची जाहिरात करू नका. चातुर्याने समस्यांचे निराकरण करा. एखाद्याला योग्य सल्ला द्या. **महिलानाः** महिलांना शेतीच्या कामात लाभ संभवतो आहे जमीन जुमल्याचे व्यवहार पूर्ण करू शकाल एखादी गोस्त आपल्या नावावर होणे असेल तर या सप्ताहात त्याला यश मिळेल. **शुभदिनांक :** २३,२५

### सदाचरणावर भर द्या

**तुळ :** राशीसाठी या सप्ताहात बुद्धी चातुऱ्यात वाढ होणाऱ्या घटना घडतील. आपल्या हातून काही कामे सहज होणार आहेत त्यामुळे या गोष्टीचा फायदा कसा घेता येईल हे पाहणे फायद्याचे ठरेल. राहुची वक्री दृष्टी असल्याने समस्या येतील. सदाचरणावर भर द्यावा. धाडस वाढेल. आपले विरोधक परास्त होतील. खुल्या मनाने मदत करावी. वादविवादात विजयी व्हाल. संशोधन क्षेत्रात असलेल्या व्यक्तींना विशेष लाभ प्राप्त होईल. अवाक्याबाहेरच्या कामांमध्ये लक्ष घालू नका. आठवडा आपल्यासाठी अत्यंत शुभ असणार आहे. शक्ती आणि सामर्थ्य यात वाढ होईल. वक्तृत्व क्षमता वाढेल. शांत राहून कामे हाताळावीत. परदेशातील व्यक्तींशी संपर्क होईल. अनावश्यक खर्चात वाढ होईल. अहंकारामुळे नुकसान होऊ शकते. लॉकडाऊन असले तरी कामे सुरूच राहतील. कौतुक आणि प्रशंसा झाल्याने मन प्रसन्न राहील. कामाचा वेग वाढल्याने दमछाक होणार नाही याची काळजी घ्या. **महिलांना :**आपल्या गुणांमुळे लाभ होईल. हितशत्रू त्यांच्याच जाळ्यात अडकून परास्त होतील. त्यामुळे त्यांची भीती मनात ठेऊ नका. ध्यान करणे हिताचे ठरेल. **शुभदिनांक :**२४,२७.

### आरोग्याची काळजी घ्या

**वृश्चिक :** राशीसाठी या सप्ताहात प्रभावशाली लोकांशी संपर्क होईल. त्यामुळे हा आठवडा उत्साह वाढवणारा सिद्ध होईल. सहज सुलभ व्यवहार करण्यास वाव रहाणार आहे. विरोधकांचे काहीच चालणार नाही. त्यांची अवस्था वाईट होऊ शकणार आहे. कौटुंबिक वातावरण उत्तम राहील. निरर्थक गोष्टी मनात घर करून राहतील. वादविवाद टाळावेत. आरोग्याची काळजी घेणे हिताचे ठरेल. सांधेदुखी बळावेल. एखाद्या गोष्टीत सावधगिरी बाळगावी, अन्यथा निराधार आरोप होतील. या आठवड्यात नेहमीपेक्षा अधिक श्रम पडतील. त्यामुळे विश्रांती देखील गरजेची असणार आहे. रक्तदाब आणि मधुमेहाचे आजार डोके वर काढतील. विरोधक प्रभावहीन ठरतील. तरीही वाद घालू नका. व्यायाम करणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांसाठी आगामी आठवडा प्रतिकूल ठरेल. त्यांनी अभ्यास करणे गरजेचे राहील. मेहनतीला न्याय मिळू शकेल. परोपकार आणि उदारता यात वाढ होईल. **महिलांना :** घरातील अडगळ बाहेर काढून टाकण्यामुळे मोकळेपणा अनुभवाल, आपल्याला धनलाभ होऊ शकतो लॉटरी घेण्यास हरकत नाही पण आपण आपल्या बोलण्यावर मात्र योग्य नियंत्रण ठेवा. **शुभदिनांक-** २३,२६.

### चिंता करू नका

**धनु :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान आपण संयम व जिद्द यांचा योग्य वापर केल्यास आपले ध्येय गाठू शकाल. खर्चाचे प्रमाण वाढणार असल्याने वेळीच अनावश्यक खर्च टाळा. नोकरदारांना मोठा दिलासा मिळू शकेल. आर्थिक बाजू ठीक ठेवता येईल. प्रकृतीबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये व मोसमी आजारापासून सावध राहा. वरिष्ठांशी व सहकाऱ्यांशी बोलताना सावधपणे वागावे. हितशत्रूंबद्दल चिंता करू नका, त्यांना गप्प बसवू शकाल. आवश्यक तेव्हा आपल्या बुद्धिकौशल्याचा उपयोग करा. आपण काळ, काम व वेग यांचे योग्य गणित सांभाळल्यास हा आठवडा चांगला घालवू शकाल. कलात्मक आनंद देणाऱ्या कामात गुंतवून घेतल्यास त्याचा आनंद घेऊ शकाल. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. आपल्या अहंकारावर मुरड घातल्यास हितकारक ठरू शकेल. नोकरदारांना दिलासा मिळेल, हाती घेतलेल्या कामांचा निपटारा करा. **महिलांना :** उपवास करताना फळ आहार घेणे आपल्याला फायद्याचे आहे. किमती वस्तूची खरेदी करू शकाल घरात महत्वाची वस्तु येईल. **शुभदिनांक :** २४,२७.

### विचारपूर्वक निर्णय घ्या

**मकर :** राशीसाठी या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आर्थिक बाजू ठीक राहील. मुलांना प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करावा. आपण प्रत्येक कार्यात शांतता बाळगून, विचारपूर्वक वागून निर्णय घेतल्यास हा सप्ताह तुमच्या दृष्टीने चांगला जाईल. नोकरदारांना मोठा दिलासा मिळेल. वरिष्ठांची मर्जी राखता येईल. आर्थिक व्यवहारात मात्र गुंतून जाणार नाही याची दक्षता घ्या. नको त्या प्रलोभनात अडकून जाऊ नका. बौद्धिक क्षेत्राला उत्तम वाव मिळेल. प्रकृतीबाबत आपण चालढकलपणा न करता पथ्ये पाळा. नियमित व्यायाम करा, आपण अध्ययनातील क्षेत्रात कठोर परिश्रम व सातत्य अंमलात आणल्यास आपल्या यशाचा आलेख उंचावू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मिळते-जुळते घेण्याचे धोरण स्वीकारल्यास उत्तम राहील. वादाचे प्रसंग उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्या. राजकीय क्षेत्रात वर्चस्व राहू शकेल. काही भाग्यवंतांना दोनाचे चार हात होण्याची संधी मिळू शकेल, निर्णय मात्र विचारपूर्वक घ्यावा. **महिलांना :** मनसिक स्थिति अस्थिर होण्याची शक्यता आहे त्यामुळे प्रार्थना आपल्याला साथ देऊ शकेल विचारपूर्वक केलेली कृती फायदा देणारी असेल. **शुभदिनांक :** २५,२६.

### खाण्यापिण्याची पथ्ये सांभाळा

**कुंभ :** राशीसाठी आपले या सप्ताहाचे ग्रहमान पाहता आपण प्रत्येक बाबतीत सांभाळून वागल्यास आणि तशी कृती केल्यास हा आठवडा आपणास सर्व दृष्टीने चांगला जाऊ शकेल आणि हाती घेतलेल्या कामात यश मिळवू शकाल. आवडीच्या क्षेत्रात अधिक लक्ष दिल्यास त्याचा लाभ व आनंद मिळू शकेल. प्रकृती स्वास्थ्याबाबत अधिक दक्ष राहा, विशेषतः खाण्यापिण्याची पथ्ये व उष्णतेचे विकार यापासून सावध राहा. सरकारी नियमांचे पालन करा. मुलांबरोबर अधिक वेळ घालवाल. त्यांच्या अध्ययनात लक्ष घाला. कलाक्षेत्राला प्रोत्साहन मिळेल. आपण सर्व बाबतीत व कार्यक्षेत्रात शांततेने परिस्थिती हाताळल्यास आपणास अपेक्षित यश मिळू शकेल. आपणास प्रोत्साहित करणाऱ्या घटकांना जाणून घ्या व मग त्यांचा अवलंब करा. नोकरदारांना दिलासा मिळेल. विद्यार्थीवर्गाला अध्ययनात यशाची अपेक्षा ठेवू शकाल. आर्थिक बाजू ठीक राहील. शेतीविषयक कामकाजांना चालना मिळेल. **महिलांना :** मनात असलेली मनीषा आता पूर्ण होऊ शकेल. कलावधी चांगला आहे त्यासाठी मनापासून प्रयत्न होणे गरजेचे आहे. **शुभदिनांक :** २६,२७.

### कौटुंबिक वावविवाद टाळा

**मीन** : राशीसाठी या सप्ताहात आपण मुलांशी सामजंस्याने वागणे हितकारक ठरू शकेल. त्यामुळे घरातील वातावरण आनंदी राहील, नसीबाची साथ नसली तरीही चिकाटीने आपण आपले काम पूर्ण करू शकाल. नोकरदारांनी वरिष्ठांशी मित्रत्व राखावे. नको त्या प्रलोभनात अडकू नका. कौटुंबिक वातावरण बिघडणार नाही याची खबरदारी घ्या. मुलांनी अभ्यासाकडे अधिक लक्ष द्यावे. नाहीतर विसरभोळेपणा अभ्यासास मारक ठरू शकतो. वादाचे प्रसंग कटाक्षाने टाळावेत. आपण आपल्या कामाबाबत अथवा महत्त्वाच्या गोष्टींची गुप्तता पाळल्यास हा आठवडा चांगला जाईल. मालमत्तेसंबंधी वादाचे प्रसंग उद्भवण्याची शक्यता आहे, तेव्हा ते सामंजस्याने सोडवा. कौटुंबिक वावविवाद टाळा. नोकरदारांना दिलासा मिळेल. आप्तेष्टांशी चांगले संबंध राहतील. कितीही राग आला तरी शांततेच धोरण ठेवणे आपल्याला हितकारक आहे, आपण जोडीदाराच्या दैनंदिन समस्या सोडविण्याचा प्रयत्न करा. **महिलांना :** मनातील साचलेले विचार दूर सारले तर कामातील प्रगती वेगात होईल मुलांची प्रगती सुखावह ठरणारी असेल. **शुभदिनांक :** २१,२३.

# आदिशक्तीच्या जागर सोहळ्यासाठी उरण सज्ज

## ● चिरनेर गावात साकारणार साडेतीन शक्तीपीठांचा देखावा

। उरण । प्रतिनिधी ।

देशभर आदिशक्तीचा जागर सोमवार २२ सप्टेंबरपासून सुरु होत आहे. उरणमध्ये तीन्ही पोलीस ठाण्याच्या हद्दीत ८५ सार्वजनिक मंडळ, खासगी ८७ मुर्ती आणि गावोगावच्या ग्रामदैवता बरोबर कुलदैवत ठिकाणी सुमारे १०० च्या वर घटांची स्थापना करण्यात येणार आहे. नऊ दिवस चालणाऱ्या या नवरात्रौत्सवाची विशेषता तरूणाईला उत्सुकता लागून राहिलेली असून उरणातील मंदिरे, बाजारपेठा सज्ज झाल्या आहेत. तर चिरनेर गावातील कलानगरातील मुर्तीकार श्री दुर्गादेवीच्या मुर्ती घडविण्यासाठी मग्न झाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.



उरण परिसरात आई जगदंबेची अनेक मंदीरे आहेत.त्यापैकी करंजा येथील द्रोणागिरी देवी, उरण शहरातील उरणावती देवी, डोंगरीची अंबादेवी, नविन शेव्यामधील शांतेवरी देवी, जसखार येथील रत्नेवरी देवी, फुंडे येथील घुरबा देवी, चिरनेरच्या इंद्रायणीच्या डोंगरमाथ्यावर विराजमान असलेली आणि मोरा येथील एकवीरा देवी, पिरवाडी येथील मागीण देवी, डोंगरी येथील अंबादेवी अशा देवीच्या मंदीरात नवरात्रौ उत्सव दरम्यान देवीचा जागर केला जातो. नवसाला पावणारी, भक्तांच्या हाकेला धावणारी, भक्तांचे मनोरथ पुर्ण करणाऱ्या या देवींवर उरणकरांची अपार श्रध्दा आहे. या श्रध्देमुळे नवरात्री उत्सव काळात परिसरातील विविध देवींच्या मंदिरात भावकांची गर्दी असते. त्यामुळे तालुक्यातील सर्व मंदिरात नवरात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरू असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## प्लॅन्टस् ॲण्ड फ्लॉवर्स डे साजरा

। उरण । प्रतिनिधी ।

यु. ई. एस. स्कूल, ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स अण्ड कॉमर्स ॲण्ड कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीमध्ये प्लॅन्टस् ण्ड फ्लॉवर्स डे उत्साहात साजरा करण्यात आला. प्लॅन्टस् ॲण्ड फ्लॉवर्स डे चे उद्‌घाटन सुर्यवंशी यांच्या हस्ते झाले. यावेळी चंद्रकांत ठक्कर, मिलिंद पाडगांवकर, राजेंद्र भानुशाली, अपूर्वा ठाकूर, प्रभारी प्रा., ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, समन्वयक, सिनिअर कॉलेजच्या विभाग प्रमुख, माध्यमिक, प्राथमिक व पूर्व प्राथमिक विभागातील पर्यवेक्षिका व पी.टी.ए. सदस्य तसेच प्लॅन्टस्ण्ड फ्लॉवर्स डेच्या इंचार्ज शिक्षिका, शिक्षक आणि विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

# ‘कारवाई करायची असेल सर्वांवर करा’



। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।

श्रीवर्धनमध्ये मासेमारी हा प्रमुख व्यवसाय असून बाजारपेठेत मासे विक्री करणाऱ्या मच्छिमार महिलांवर नगरपरिषद प्रशासन कारवाई करत असल्याने संताप व्यक्त होत आहे.

शहरात प्रशस्त मासळी बाजार नसल्याने महिलांना उन्हा-पावसात रस्त्यावर बसून मासे विक्री करावी लागते. अशा परिस्थितीत महिलांना जाणूनबुजून त्रास दिला जात असल्याचा आरोप करण्यात येतो. याआधी एका दुकानदराने दुकानासमोर मासे विक्री करणाऱ्या महिलांना हाकलण्यासाठी पाण्याचा फवारा मारल्याची घटना घडली होती. तक्रारीनंतर त्या दुकानदाऱ्यावर कारवाई देखील झाली होती.

सदर ठिकाणी भाजी बाजार व मासळी बाजाराचे आरक्षण असले तरी अतिक्रमणामुळे महिलांना जागा मिळत नाही. त्यामुळे विक्री वाढली की काही महिलांना रस्त्यावर बसावे लागते. यावर प्रशासन कारवाई करत असले तरी भाजीपाला विक्रेत्यांकडून दुकानाबाहेर रस्त्यावर क्रेट लावले जातात. मात्र, त्यांच्यावर कारवाई होत नाही, अशी खंत व्यक्त करण्यात आली. याबाबत तवसाळकर यांनी स्पष्ट इशारा दिला की, बाजारपेठेत कारवाई करायची असेल तर सर्वांवर समान करा. कोणाच्या दबावाखाली येऊन फक्त मच्छिमार महिलांवर कारवाई केली गेली तर संघटना ठामपणे त्यांच्या पाठीशी उभी राहील.

# कर्करोग मुक्तीसाठी विविध उपक्रमाचे नियोजन

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुका आगरी समाज संघटनेच्या पुढाकाराने खास महिलांसाठी कर्करोग तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात तब्बल २४५ महिला रुग्णांची तपासणी करण्यात आली. दरम्यान तालुक्यातील सर्व जाती धर्माच्या महिलांची या शिबिराला उपस्थिती होती. कर्करोग मुक्तीसाठी कर्जत तालुका आगरी समाज संघटना आणि रोटरी क्लब तालुक्यात अभियान राबविण्याचा निर्णय घेण्यात आला होता.



नेरळ येथील आगरी समाज हॉल येथे महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे यांनी केले होते.

यावेळी डॉ. रुपेश सोनावळे, डॉ. निकिता गुरव, डॉ. कोमल तुपसागर, डॉ. अनुराधा नारायण, डॉ. वैशाली चौधरी, डॉ. तनुजा पिंगळे, डॉ. अनिता शहाजी, डॉ. दिव्या शिंदे, डॉ. ओमकार पोटे, डॉ. सिद्धी मोरे, समाधान पाटील, डॉ. स्वाती, डॉ. रघुराम, निशा जैस्वाल, डॉ. आरती पोकळे, डॉ. भाग्यश्री सानप, प्रशांत दिवटे, डॉ. कृपाली सोनावळे, डॉ. नीलम सोनिग्रा राजश्री, शिल्पा यांनी रुग्णांची तपासणी केली.

यावेळीरोटरीक्लबऑफदेवनारचे चेअरमन कणन, जैसल जेक्सी, झंकार गडकरी, गुंजन जैन, नलिनी कणन, डॉ. रघु, डॉ. चौधरी, निशा, तनुजा, अर्जुन तरे, रेखा हिरेमठ, अक्षय हिसाळके, भगवान धुळे, शिवाजी कराळे, जितेंद्र गवळी, भूषण पेमारे, सूर्यकांत चंचे, मनोहर हजारे, रामचंद्र खरमरे, मनिषा दळवी, किशोर घारे, संतोष धुळे, विजय म्हसकर, अविनाश भगत, शिवराम बदे, विजय कोंडीलकर, बाजीराव दळवी आदी उपस्थित होते.

शिबिराला सुरेश टोकरे, सावळाराम जाधव, नितीन कांदळगावकर, महेश विरले, ॲड. रंजना धुळे, मंदा म्हात्रे, नम्रता कांदळगावकर, अंकुश शेळके, मिलिंद विरले, ज्ञानेश्वर साळोखे, लोंगले आदीने भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# रत्नागिरी जिल्ह्यात संततधार पाऊस

**रत्नागिरी :** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून संततधार पावसाने हजेरी लावली आहे. कुठे रिमझिम, तर कुठे मुसळधार अशा स्वरूपात पाऊस कोसळत असून, गुरुवारी एकूण सरासरी २६.२४ मि.मी. पावसाची नोंद झाली. मध्यरात्रीपासून गुहागर, रत्नागिरी, लांजा व दापोली तालुक्यांत मुसळधार पाऊस पडला, तर इतर काही तालुक्यांत पावसाची रिपरिप सुरू होती. मागील दीड महिन्यापासून पावसाने विश्रांती घेतल्याने जिल्ह्यात उकाड्याचे वातावरण होते. रस्त्यांवर धुळीचे साम्राज्य निर्माण झाले होते. मात्र, १६ सप्टेंबर रोजी हवामान खात्याने ऑरेंज अलर्ट जाहीर केल्यानंतर पावसाने पुन्हा दमदार हजेरी लावली. त्यानंतर दोन दिवस यलो अलर्ट राहिला. गुरुवारी सकाळपासून संध्याकाळपर्यंत पावसाची झोडपाझोड सुरूच राहिली. या पावसामुळे काही भागात भात, नाचणीसह खरीप पिकांना बळ मिळाले असले, तरी काही ठिकाणी पिकांवर फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे. फळबागांवरही हलका परिणाम होण्याचा अंदाज कृषी विभागाने व्यक्त केला आहे.पुढील काही दिवस जिल्ह्यात विजांचा कडकडाट, ढगांचा गडगडाट यांसह मुसळधार परतीचा पाऊस होणार असल्याचा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला आहे. नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. रत्नागिरी जिल्ह्यात परतीच्या पावसाची जोरदार चाहूल लागली आहे.


**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा

**खुली ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडच्या वतीने, वरिष्ठ क्षेत्रीय अभियंता, रत्नागिरी खालील कामांसाठी खुली ई-निविदा आमंत्रित करीत आहेत.

**क्र. सं.: 1. कामाचे नाव**: वरिष्ठ आरईएन/रत्नागिरी विभागांतर्गत 8 टर्नआउट पूर्ण नूतनीकरण (बदली). **निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-17ए, (दुसरा कॉल) (14 दिवसांचा अल्पकालीन सूचना कालावधी), दिनांक 19.09.2025. अंदाजे किंमत**: रु. 63,82,825/-. **ईएमडी**: रु. 1,27,700/-. **निविदा ऑनलाइन सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 03.10.2025 दुपारी 15:00 वाजेपर्यंत.

**क्र. सं.: 2. कामाचे नाव**: वरिष्ठ आरईएन/रत्नागिरी विभागांतर्गत 6 टर्नआउट पूर्ण नूतनीकरण. **निविदा सूचना क्रमांक: केआर-आरएन-डब्ल्यू-2025-20ए, (दुसरा कॉल) (14 दिवसांचा अल्पकालीन सूचना कालावधी), दिनांक 19.09.2025. अंदाजे किंमत**: रु. 66,83,307/-. **ईएमडी**: रु. 1,33,700/-. **ऑनलाइन निविदा सादर करण्याची अंतिम तारीख आणि वेळ**: 03.10.2025 दुपारी 15.00 वाजेपर्यंत.

अधिक माहितीसाठी प्रादेशिक रेल्वे व्यवस्थापक कार्यालय, एमआयडीसी क्षेत्र, मिरजोले, रत्नागिरी येथे संपर्क साधा. (वेबसाइट: **https://www.ireps.gov.in**)


## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील निवासी सदनिका आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री.मोहन रामचंद्र पाटील व सौ.मंजुळा मोहन पाटील, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू निवासी सदनिका ही निर्वेध असल्याचा भरवसा सदनिकेच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ.स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू निवासी सदनिका ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड**

मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील सिटी स.नं. ६४३, के ६४३/१, ६४३/१, ६४३/२, ६४४ के/१, ६४४, ६४४/१ (सर्व्हे नं. १६८, हि.नं. १७) या बिनशेती मिळकतीवर बांधण्यात आलेली त्रिमुर्ती प्लाझा बिल्डींग मधील ए विंग या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्रमांक २०२, क्षेत्र १०५५ चौ. फुट बिल्टअप, (कारपेट क्षेत्र ७८२ चौ. फुट) (अलिबाग नगरपरिषद नविन मालमत्ता क्र. ALB000003691 व जुना मालमत्ता क्र.Z1MKT003716) या निवासी सदनिकेबाबत.

दिनांक : २०/०९/२०२५
अशिलांची सही

**ॲड. आशिष अशोक बाणे**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता : शॉप नं.६, रजनी नारायण कॉम्लेक्स
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ८००७०७२६६९

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीप्रमाणे नमुद मौजे अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड येथील निवासी सदनिका आमचे अशिल यांनी विद्यमान मालक श्री. मोहन रामचंद्र पाटील व सौ. मंजुळा मोहन पाटील, यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू निवासी सदनिका ही निर्वेध असल्याचा भरवसा सदनिकेच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू निवासी सदनिका ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तदनंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड**

मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायाड येथील अलिबाग नगरपरिषद हद्दीतील सिटी स.नं. १००१/१ए, १००१/१बी२, १००१/१-बी१-बी, के १००१/१ एकुण क्षेत्र १६९८.४ आर.चौ.मी. या बिनशेती मिळकतीवर आलेल्या ''रजनी नारायण'' सहकारी गृहनिर्माण संस्था अलिबाग मधील या इमारतीमधील तिसऱ्या मजल्यावरील निवासी सदनिका क्र. TF1, क्षेत्र ६७० चौ. फुट सुपर बिल्टअप, कारपेट क्षेत्र (६२.२६ चौ.मी.,) (अलिबाग नगरपरिषद नविन मालमत्ता क्र. ALB000001741 व जुना मालमत्ता क्र.Z1MKT001743) या निवासी सदनिकेबाबत.

दिनांक २०/०९/२०२५
अशिलांची सही

**ॲड.आशिष अशोक बाणे**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता: शॉप नं.६, रजनी नारायण कॉम्लेक्स
जे.एस.एम कॉलेज जवळ, अलिबाग-रायगड
मोबा. ८००७०७२६६९

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिशीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूद दप्तरी वर्णन केलेली शेतजमिनीची मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे. महुरे, ता.तळा, जि.रायगड.**

| नाव | भूमापन नं | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री.संदिप अमृत कुराडे | ३०२ | ० | ०-८३.५०<br>०-१७.५० | ०=४३ |
| | | एकुण | १-०१.०० | |
| | ३०४ | ० | ०-८८.५०<br>०-१२.५० | ०=४३ |
| | | एकुण | १-०१.०० | |

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकतीचे वरीलप्रमाणेचे खरेदीचा व्यवहार पूर्ण करु व मालकी हक्काचा दाखला देण्याची तजविज करु व सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल,
दि.२१/०९/२०२५

**(हर्षद सुधाकर शेट्टी)**
वकील.
पत्ता : १०४, आदित्य विहार को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, महात्मा फुले मार्ग, पनवेल ४१० २०६, जि. रायगड. फोन नं. २७४६ ६४१५ व ९७६८६७३१७२

## शुद्धीपत्रक

दि.२०/०९/२०२५ रोजी प्रसिद्ध झालेल्या वर्तमानपत्रात पान क्र.६ वर ॲड.योगेश का.देशमुख यांची जाहीर नोटीस प्रसिद्ध झाली आहे. त्यामध्ये जाहिरात ता.२०/०७/२०२५ असे छापण्यात आले आहे. तरी ते तसे न वाचता ता.२०/०९/२०२५ असे वाचण्यात यावे.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली जमीन मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक हानिफ गुलाम महमद पटेल यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मौजे वारे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १४४ | ८/अ/२ | ०-४१-०० | ०-२० |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचाही कुळ वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुलअखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० (दहा) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. २१/०९/२०२५

खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना कळविण्यात येते की आमचे अशिल नोंदणीकृत खरेदीखताद्वारे मौजे पाथरज, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील अचल मालमत्ता, जी श्रीमती जान्हवी उल्हास कंदलगावकर यांच्या मालकीची आहे, खरेदी करण्याचा प्रस्ताव करीत आहेत. सदर मालमत्तेचा तपशील असा आहे. गट क्र.१३, हिस्सा क्र.५ (० हे.३४ आर.८० गु.), गट क्र.१४, हिस्सा क्र.२ (० हे.१७ आर,५०गु.), गट क्र.१६ (हिस्सा नाही-१ हे.३५ आर.०० गु.), गट क्र.१८, हिस्सा क्र.१, (५ हे.८६ आर.००गु.) गट क्र.२३, हिस्सा क्र.१(२ हे. ५० आर.५५गु.), हिस्सा क्र.५ (० हे.२९ आर. ०० गु.) हिस्सा क्र.६ (० हे.०९ आर.०० गु.), हिस्सा क्र.७ (० हे.४५ आर.०० गु.), हिस्सा क्र.८ (० हे. १४ आर.०० गु.), हिस्सा क्र.९ (० हे.४३ आर.००गु), तसेच गट क्र.२५, हिस्सा क्र.१ (३ हे. ०३ आर. ५० गु.), हिस्सा क्र.४ (० हे. ०३ आर.२० गु.) आणि हिस्सा क्र.६ (० हे. ०४ आर.०५ गु.).

**तंदगभुत : सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा**

तरी वरील मिळकतीबाबत इतर कोणीही व्यक्तीचा/व्यक्तींचा याखालील मालमत्ता किंवा तिच्या कोणत्याही भागासंदर्भात वारसा, विक्री, गहाणवट, भार, कर्ज, नियुक्त सुविधाधिकार, विनिमय, धारणाधिकार, परवाना, शिर्षक दस्तऐवज ठेव करून, तारण, भेट, वहिवाट, ताबा, साठेकरार, विभाजन, कुळ, उप-कुळ, भाड्याने देणे, परवानगी आणि परवाना, भाडेपट्टी, उप-भाडेपट्टी, कोणत्याही न्यासाअंतर्गत शिर्षकाचे हस्तांतरण किंवा फायदेशीर हित देखभाल, मृत्यूपत्र, उत्तराधिकार, कौटुंबिक व्यवस्था/तडजोड, करार, भागीदारी खटला कोणत्याही न्यायालयाचा, न्यायाधिकरणाचा प्राधिकरणाचा आणि/किंवा मंचाची विक्री, न्यायालयाचा आदेश, हुकुम, मागणी, संपादन किंवा कसाही ऋणभार किंवा इतर कोणताही अधिकार किंवा कोणताही स्वरूपाचा कोणताही दावा हिस्सा हक्क, शिर्षक हितसंबंध, लाभ आक्षेप आणि/किंवा मागणी असल्यास त्यांनी अधोस्वाक्षरीदारांना खाली दिलेल्या पत्त्यावर आणि ई-मेलवर सदर सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून २१ दिवसांच्या कालावधीत कागदोपत्री पुराव्यासहीत लिखित स्वरूपात कळविणे आवश्यक आहे, असे करण्यात अयशस्वी झाल्यास, अशा व्यक्तींचा/संस्थेचा असा हिस्सा शिर्षक हक्क, हितसंबंध, लाभ दावा, मागणी किंवा आक्षेप, इत्यादी जर असेल तर, दुर्लक्ष केले जाईल आणि ते माफ केले गेले आहेत आणि सोडुन दिले गेले आहेत आणि ते आमच्या अशिलांवर बंधनकारक नाहीत असे मानले जाईल.

स्थळ :
तारीख :

सही/-
**ॲड.दिपाली राहुल शिंदे**
श्री.साई सावली, २ रा मजला सिविल कोर्ट कर्जतच्या विरूद्ध, तालुका कर्जत
जिल्हा रायगड. मो.नं.+९१ ९०११७१६००१
drshinde2010@gmail.com

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली बिनशेती जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडुन कायमची खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांनी कोणत्याही व्यक्तीबरोबर तोंडी अथवा लेखी करार केलेला असल्यास तसेच या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदीव्यवहार पुर्ण करतील. मुदतबाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे तिवरे, ता. कर्जत जि. रायगड येथील बिनशेती जमीन मिळकत:-**

| सर्व्हे नं./प्लॉट नं | क्षेत्र | आकारणी | |
|---|---|---|---|
| | आर.चौ.मी- से.मी. | रुपये | पैसे |
| २/४/अ/३ | २-८५-०० | २८ | ५० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता :- ए विंग, फ्लॅट नं. ४, पहिला मजला, गणेश अर्पाटमेंट, कर्जत नगरपालिका कार्यालयाशेजारी, ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१ ई मेल:-nileshmundhe029@gmail.com

सही / -
**ॲड. निलेश दामु मुंढे**
दिनांक :- २१/०९/२०२५
मो. नं. ८४४६८६९६७१

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे पूर्वाश्रमींचे (विवाहापूर्वीचे) नाव पुष्पलता अनंत घरत असे होते. विवाहानंतर त्यात बदल होऊन ते विशाखा विजय दळवी (विवाहानंतर रा. बहिरोळे, पो. मापगांव, ता. अलिबाग, जि. रायगड, महाराष्ट्र राज्य) असे झाले आहे. विवाहानंतरचे नाव दैनंदिन व कायदेशीर व्यवहारात वापरीत आहे.

अलिबाग
नोंदणी क्र.१२१९/२५
नोंदणी दिनांक : १९/०६/२०२५

सही /-
**विशाखा विजय दळवी**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे शिलार, ता.कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहेत, या मिळकतींचे मालक रमेश खंडू दळवी, यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे क्रमांक/ भुमापन क्रमांक | क्षेत्रफळ हे.आर.पॉ. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|
| १२/१ | ०३-१८-०० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी रमेश खंडू दळवी यांचे मालकीचे ०२-९५-०० हे.आर.पॉ. | १-३८ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- २१ सप्टेंबर २०२५

**ॲड. शरद आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता-सदनिका नंबर ०२, तळमजला, बी विंग,
विहंग को.ऑ.हौ.सो.लि. कोतवालनगर कर्जत
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो.नं.९५२७२८२५२५

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमच्या अशिल सौ.कल्पना राजेंद्र बोडके, रा.कर्जत, राज महेल बंगला, रूम नं. ३१६-२, सरकारी हॉस्पिटल जवळ, विठ्ठल नगर, ता. कर्जत, रायगड, ४१०२०१, यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली जमिन मिळकत, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :** मौजे सावळे, ता.कर्जत, जि.रायगड, येथील जमिन मिळकत

| स.नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रू.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| ८/४/अ | ०.४३.०० | ०.३७ | श्री.प्रसन्न बाळु दगडे, वैगेरे. |

यापैकी श्री.प्रसन्न बाळु दगडे यांच्या नावे असलेले ०.२१.५० हे.आर.पॉ.क्षेत्र.

वरील वर्णनाच्या शेतजमिन मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, कुळ, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन होणाऱ्या ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- २१/०९/२०२५.

सही / -
**ॲड. उषा जे. कांबळे.**
कर्जत, ''पुष्प विमल'' निवास,
नानामास्तरनगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खाली वर्णन केलेली फ्लॅट मिळकत तिचे मालक सौ.सरीता संजय वाघमारे, रा.प्रभात अपार्टमेंट, रूम नं.३ पहिला मजला, सुनिल चिक्की शेजारी ता.कर्जत, जि.रायगड यांचेकडुन कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

मौजे कर्जत, ता.कर्जत, जि.रायगड येथील सि.स.नं.१६२अ/१ ते १६२अ/७ यावरील प्रभात को.ऑप.हौ.सो.मधील मयुर (प्रभात अपार्टमेंट) अपार्टमेंट मधील फ्लॅट नं.४, पहिला मजला, क्षेत्र ५५९ चौ. फुट सुपर बिल्टअप.

सदर मिळकतीचा कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे समजुन वरील मिळकतींचा व्यवहार पुर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

दि. २१/९/२०२५

**ॲड. कैलास गणपत मोरे**
बी.एल.एस, एल.एल.बी
प्रभात अपार्टमेंट, रूम नं.४, दुसरा मजला,
सुनिल चिक्कीजवळ, ता.कर्जत, जि.रायगड
मो.नं.९९६०८३८१६४/९०२८५०८४९६

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**


**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# दिनवेध

## राशीभविष्य

- **मेष** : प्रापंचिक समस्या हैराण करतील. मनाविरूध्द घटना संभवतात. विद्यार्थ्यांना अडचणी येऊ शकतात.
- **वृषभ** : व्यवहारात पुरेशी काळजी घ्यावी. नव्या ओळखींचा लाभ घ्यावा. कारकिर्दीला नवी दिशा मिळेल.
- **मिथुन** : इतरांच्या टीकेकडे दुर्लक्ष करा. सरकारी कामं विलंबानं होतील. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **कर्क** : नोकरीत वरिष्ठांशी मतभेद संभवतात. भावंडांशी वाद-विवाद टाळावेत. प्रकृतीस त्रास होऊ शकेल.
- **सिंह** : हितशत्रूंचय कारवाया थंडावतील. आत्मविश्वास वाढीस लागेल. यांत्रिक क्षेत्रात विशेष प्रगती होईल.
- **कन्या** : कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. सकारात्मक दृष्टीकोन महत्त्वाचा ठरेल. आर्थिक समाधान लाभेल.
- **तूळ** : महत्त्वाचे प्रश्न मार्गी लागतील. व्यवसायात उत्कर्षाच्या संधी लाभतील. मनातले विचार कृतीत येतील.
- **वृश्चिक** : निश्चयपूर्वक वाटचाल सुरू ठेवावी. गृहसजावटीच्या क्षेत्रात अनुकूलता राहील. बाकी चिंता नसावी.
- **धनु** : कलाकारांचा उत्साह वाढेल. एका वेळी एकाच कार्यावर लक्ष केंद्रीत करावं. धरसोड हिताची नाही.
- **मकर** : जुनी येणी पुन्हा रखडतील. प्रक्रिया उद्योगात अनूकलता राहील. इतरांचा सल्ला विचारानं घ्यावा.
- **कुंभ** : आर्थिक उत्कर्षाचे योग आहेत. ग्रहमानाची विशेष अनुकूलता राहील. व्यक्तिमत्त्वाचा विकास होईल.
- **मीन** : स्वमताचा आग्रह टाळायला हवा. अपघात तसंच चोरीबाबत काळजी घ्या. प्रियजनांचा सहवास लाभेल.

## दिनविशेष

### २१ सप्टेंबर

**१९९५ :** गणपती दूध पित असल्याच्या दाव्याने देशभर खळबळ माजली.
**२०१३ :** बेदरकारपणे बस चालवून नऊजणांचा बळी घेणाऱ्या संतोष मानेच्या शिक्षेवर नव्याने सुनावणी घेण्याचा मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश.
**२०१४ :** घुसखोरी करून चीनने चुमार परिसरात सात तंबू ठोकल्याचं उघड.
**२०१७ :** माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी आमदारकी आणि पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देत काँग्रेसला रामराम ठोकला.

## आरोग्यमंत्र

### कॅल्शियमची गरज...



शरीरातील हाडांचा आणि दातांचा बहुतांश भाग हा कॅल्शियमने बनलेला असतो. त्यामुळे वाढीच्या वयात मुलांना पुरेसं कॅल्शियम मिळायला हवं. स्त्रिया आणि वृद्ध यांनाही आपल्या हाडांच्या मजबुतीसाठी कॅल्शियमची गरज असते. शिवाय कितीतरी जीवघेणे आजार पुरेसे कॅल्शियम शरीरात असले तर टाळता येतात. शरीरात असलेल्या कॅल्शियमच्या ९९ टक्के भाग हाडांमध्ये आणि उरलेला १ टक्का भाग हा रक्त स्नायू आणि मज्जातंतूमध्ये आढळतो. हाडांच्या आणि दातांच्या निर्मितीसाठी कॅल्शियमची गरज असते. गर्भाची नीट वाढ होण्यासाठी मातेदवारे गर्भाला कॅल्शियमचा पुरेसा पुरवठा होणे आवश्यक आहे. रक्त गोठण्याच्या प्रक्रियेमध्ये कॅल्शियम महत्वाची भूमिका बजावते. जखम भरुन येण्यासाठी कॅल्शियमची शरीराला गरज असते. बाळासाठी दूधनिर्मितीची जी प्रक्रिया आईच्या शरीरात घडत असते त्यासाठीही कॅल्शियमची आवश्यकता असते. स्नायूंच्या योग्य लवचिकतेसाठी आणि त्यांची कार्ये नीट चालण्यासाठी कॅल्शियम अत्यंत आवश्यक आहे. कॅल्शियमचा योग्य पुरवठा होत नसेल तर वाढत्या वयाबरोबर हाडं ठिसूळ होऊ लागतात. स्नायूंना कंप सुटतो. मुलींमध्ये मासिक पाळीचे प्रॉब्लेम्स निर्माण होऊ शकतात. त्यामुळे शरीराच्या सर्व कार्यांसाठी आवश्यक कॅल्शियम पुरेशा प्रमाणात शरीरात जायला हवं. सर्वसाधारणपणे सहा महिन्यांपेक्षा कमी वयाच्या मुलांना ४०० मिलीग्रॅम कॅल्शियमची तर सहा महिने ते एक वर्षापर्यंतच्या बाळांना ८०० मिलिग्रॅम कॅल्शियमची गरज असते. ती गरज पुरवली जाणं महत्वाचं असतं.

## टेक फन

### पीसीवर स्मार्टफोनचा कंट्रोल?

* आता क्रोम रिमोट डेस्कटॉप आयकॉनवर क्लिक करून ते ओपन करा.
* आता पीसीच्या माय कॉम्प्युटर ऑप्शनमध्ये जाऊन गेट स्टार्टेड हा ऑप्शन निवडा.
* यानंतर क्रोम रिमोट एक्सटेंशन आपोआप इन्स्टॉल होईल.
* आता क्रोम रिमोट डेस्कटॉप एक्सटेंशनवर जाऊन एनेबल रिमोट कनेक्शन ऑप्शनवर क्लिक करा.
* यानंतर तुम्हाला पिन तयार करावा लागेल.
* आपल्या स्मार्टफोनमध्ये क्रोम रिमोट डेस्कटॉप ॲपवर जा. यानंतर कॉम्प्युटरवर टॅप करा.
* इथे पिन क्रमांक टाकावा लागेल. आता तुम्ही या सेवेचा लाभ घेऊ शकता.

## ॲक्सेसरीज

### बेल्टने खुलवा लूक!

सध्या बाजारात विविध आकारांच्या, रंगांच्या, डिझाइनच्या बेल्टची चलती आहे. हा बेल्ट फक्त पँटवर नाही तर विविध प्रकारच्या पेहरावांवर तुम्ही वापरू शकता. अर्थात बेल्ट अधिक खुलून दिसण्यासाठी तुमच्या शरीरयष्टीनुसार त्याची निवड करायला हवी.

* पिअर शेप महिलांनी बेल्टसोबत क्लब करता येतील अशा पेहरावांची निवड करायला हवी. पिअर शेप असलेल्या महिला स्लिंकी बेल्ट वापरू शकतात. या बेल्टमुळे तुम्हाला स्लिम इफेक्ट मिळतो. * कमी उंचीच्या महिला अँकल लेंथ स्ट्राईप गाउन घातल्यावर उंच दिसू शकता. या गाउनसोबत तुम्ही स्कीन बेल्ट वापरा. * ॲपल शेप असलेल्या महिलांनी मोठ्या आकाराचा बेल्ट वापरायला हवा. हा बेल्ट वेस्टर्न आउटफिट्ससोबतच भारतीय पेहरावावरही शोभून दिसतो. * बारीक महिलांनी हाय वेस्ट मेटालिक बेल्ट वापरायला हवा. हा बेल्ट तुम्हाला स्टायलिश लूक देईल. मग काय मैत्रिणींनो, ट्रेंडी बेल्टचा वापर करून तुम्ही तुमचा लूक खुलवू शकता.

## पंचांग

**रविवार, २१ सप्टेंबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, भाद्रपद कृ. १५, नक्षत्र : पू. फाल्गुनी, चंद्रराशी : सिंह, योग : शुभ, सूर्योदय : ६.२९, सूर्यास्त : ६.३४

## फॉरवर्डस

पाग़ल हों जानें क़े भीं गज़ब फ़ायदे हैं ज़नाब...

लोग़ पत्थर तों उठातें हैं मग़र ऊँगली नहीं...!

## वेगळ्या वाटा

कॉमर्स शाखेतल्या विद्यार्थ्यांचा बराच गोंधळ उडतो. त्यांच्यापुढे सीए, सीएस, बीए इन इकोनॉमिक्स, बीबीए आणि बीकॉम यापैकी कशाची निवड करायची असा पेच निर्माण होतो. याबाबतचं मार्गदर्शन...

* बीबीए म्हणजे बॅचलर इन बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन. उद्योग क्षेत्रात करीअर करायचं असेल तर हा अभ्यासक्रम उपयुक्त ठरू शकतो. हा अभ्यासक्रम पूर्ण करून तुम्ही एमएनसी, बीपीओ, केपीओ, फायनान्स, बँकिंग, एचआरसारख्या क्षेत्रांमध्ये करीअर करू शकता. मॅनेजमेंटच्या क्षेत्रात जाणाऱ्या विद्यार्थ्यांनी हा अभ्यासक्रम निवडावा. (क्रमश:)

## करिअरवाटा

### अपयशाची साखळी तोडताना...



अपयश ही यशाची पहिली पायरी असली तरी सातत्याने अपयश येत गेल्यास नकारात्मक मानसिकता तयार होते. परिणामी कार्यक्षमता असूनही कामात यश मिळत नाही. अशा वेळी मनाची मशागत करायला हवी. हे करताना सर्वप्रथम आजवर वाट्याला आलेलं अपयश दूर ठेवून नव्या उमेदीने कामाला लागावं. भविष्यात योजनांचा विचार करावा. तो करताना संभाव्य अडचणी जाणून त्या दूर करण्याचे मार्गही नजरेसमोर आणावे. यामुळे उत्साह दुणावेल तसंच अपयश शक्यता कमी होईल. चुकांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सहकाऱ्यांची मदत मिळेल का, याची तपासणी करावी. दिलेलं काम वेळेत पूर्ण होणं शक्य नसेल तर वरिष्ठ वा सहकाऱ्यांना वस्तुस्थिती कथन करावी. आयत्या वेळी काही चाकोरीबाहेरची कामं करावी लागली तर त्याचाही उल्लेख करावा. प्रयत्न करूनही अमूक एक काम व्यवस्थित जमत नसेल तर तसं स्पष्ट सांगावं. त्यामुळे समोरच्या व्यक्तीचा अपेक्षाभंग होणार नाही आणि वेळही वाया जात नाही. कार्यालयात अंतर्गत राजकारण खेळलं जाण्याचीही शक्यता असते. त्याला बळी न पडण्याची दक्षता घ्यावी. 'आपलं काम आणि आपण' हा उत्तम पर्याय असला तरी सहकाऱ्यांशी संपर्क तोडू नये.

## खेचाखेची

### नवी पिढी


फाटलेले कपडे रफू करून वापरणारी पिढी मागे पडली आहे.
.
.
.
आणि आता...
.
.
.
चांगले शिवलेले कपडे फाडून वापरणारी पिढी आली आहे.

## वेगळं काही

स्टोन फिश हा जगातला सर्वात विषारी सजीव आहे. हा मासा एखाद्या दगडासारखाच दिसतो. त्यामुळे त्यावर पाय ठेवला तर हा मासा शरीरातून विष बाहेर टाकतो. या विषामुळे माणसाचा मृत्यू होऊ शकतो. या माश्यावर जेवढं वजन पडतं तेवढ्या प्रमाणात तो विष बाहेर टाकतो. हे विष इतकं वाईट असतं की त्यावर पाय जरी पडला तरी पाय कापून टाकण्याची वेळ येऊ शकते. आपल्या निष्काळजीपणामुळे मृत्यूही ओढवू शकतो. पाय पडल्यावर हा मासा अवघ्या ०.५ सेकंदात शरीरात विष बाहेर टाकतो. या जगात चित्रविचित्र जीवांची कमतरता नाही. प्रत्येक वेळी नव्या सजीवांचा, प्रजातींचा शोध लागत असतो. त्यामुळे अशा सजीवांपासून आपण सावध राहायला हवं.

## स्मार्ट टिप्स

### टवटवीत त्वचेसाठी...



त्वचेचं सौंदर्य आणि आरोग्य जपण्यासाठी काही उपाय करणं आणि उपायांमध्ये सातत्य राखणं गरजेचं असतं. उदाहरणार्थ त्वचेवर वाढत्या वयाचा, आहाराचा आणि हार्मोन्समधल्या बदलाचा परिणाम होत असतो. हा परिणाम कमी करून त्वचेचं आरोग्य जपण्यासाठी काही गोष्टी करायला हव्यात. याहेतूने सर्वप्रथम हार्मोन्सचं संतुलन टिकवून ठेवायला हवं. हार्मोन्सच्या असंतुलनामुळे त्वचा तेलकट होणं, निस्तेज दिसणं आदी समस्या उद्‌भवतात. पण योग्य आहार घेऊन आणि व्यायाम करून आपण त्वचेचा तजेला टिकवू शकतो. आहारात साखरेचं प्रमाण वाढलं तर चेहरा काळवंडलेला आणि सुरकुतलेला दिसू शकतो. हे टाळण्यासाठी आहारातली साखर कमी करायला हवी. पोषक आहार घ्यावा. त्वचेचं सौंदर्य आणि आरोग्य जपण्यासाठी खाण्यापिण्याकडे विशेष लक्ष द्यावं. उदाहरणार्थ अतिरिक्त पोषणमूल्य मिळवण्यासाठी सुका मेवा, दही, ताक, ताजी फळं यांचा आहारात समावेश असावा. सुक्या मेव्यात प्रथिनं आणि हेल्दी फॅट्स असतात. यामुळे शक्ती मिळते खेरीज त्वचा टवटवीत राहण्यास मदत होते. फळांचं सेवन तसंच फ्रूट फेशियलमुळे त्वचेचं सौंदर्य अबाधित राहण्यास मदत होते.

## सुडोकू ७


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ९ | | | | ४ | |
| ५ | ३ | | | | ४ | | | |
| | | | | | ७ | २ | १ | |
| | | ४ | | | १ | ५ | | |
| २ | | | ६ | | ८ | | | ७ |
| | | ७ | ५ | | | ८ | | |
| | १ | ६ | ३ | | | | | |
| | | | ४ | | | | ३ | १ |
| | ४ | | | | ५ | | | |

टीप -
* या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ x ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.
* आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.
* अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू ६ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | २ | ७ | ८ | ३ | ९ | ४ | १ | ६ |
| ४ | ८ | ६ | २ | ५ | १ | ९ | ३ | ७ |
| ९ | १ | ३ | ६ | ७ | ४ | ५ | ८ | २ |
| ६ | ५ | १ | ९ | ४ | ७ | ३ | २ | ८ |
| ८ | ९ | ४ | १ | २ | ३ | ६ | ७ | ५ |
| ७ | ३ | २ | ५ | ८ | ६ | १ | ४ | ९ |
| २ | ७ | ९ | ४ | १ | ५ | ८ | ६ | ३ |
| १ | ६ | ८ | ३ | ९ | २ | ७ | ५ | ४ |
| ३ | ४ | ५ | ७ | ६ | ८ | २ | ९ | १ |

## शब्दकोडे क्रमांक ७




**आडवे शब्द :-**
१) राजपुत्र सलीमची प्रेयसी
५) रो.ह.यो.चे विस्तृत नाव
११) थर,पडदा
१२) सिंह
१४) तांदळाचा पदार्थ
१५) दृष्टी
१७) हलाहल पचविणाऱ्या शंकराचे नाव
२०) आधाराने वाढणाऱ्या वनस्पतीचा प्रकार
२२) कागद, कापड याचे कातरून ठेवलेले तुकडे
२४) उत्तम सोने
२६) एक मिश्र धातू
२७) उदा.हिरा,माणिक,पाचू इ,प्रकार.
२८) अर्धांगवायु होणे
३१) वंदनाचा एक प्रकार
३४) बाजार
३६) ताडाच्या झाडाचा ताजा रस
३७) च्या साठी
३८) मनाचा ओढा
३९) मदतनीस
४०) दारुचा एक प्रकार
४१) चंद्राची कड
४३) जव,एक बारीक धान्य
४५) बगळा
४६) देवांचे शत्रू
४८) पवित्र
४९) पृथ्वी
५१) चांदणी
५२) माझा
५३) जास्तीत जास्त
५४) उसनवार
५६) पुष्ठ,जाडा.स्थूल
५७) यशदायक
५८) गडबड,गोंधळ, आरडाओरड
५९) देशी दारू पिण्यास मिळण्याची जागा
६२) भविष्यकथनाचा एक प्रकार
६४) एक चतुर्थांश भाग
६५) इमारतीचा मूळ आधार
६६) पोरका
७०) दागदागिने
७१) सूर्यपुत्री,यमुना नदीचे एक नाव
७२) चंदन उगाळण्याचा दगड
७४) जमिनीचा सत्वांश,
७६) नरमांजर
७७) लिंबू पाण्याचे पेय
७९) वाळलेली खजुराची बी
८१) सिनेमाला मराठी शब्द
८४) मन,विचार,हेतू
८६) खोटा,रिकामा,निरर्थक (भावना)
८७) बांगला देशाचे नाणे
८८) लोणी
८९) वेडा (हिं)
९०) मेहरबानी,पांग

**उभे शब्द:-**
१) घरातील शत्रू (वा.प्र)
२) दाढी व शेंडी असलेले फळ
३) शंकराला आवडणारे कडक आवरणाचे गोल गरगरीत फळ
४) नम्र, वाकलेला
५) प्रतिदिनी
६) गर्भ,मधला भाग
७) अर्धा शेर
८) मासा
९) योजना करणारा
१०) अटीची भाषा
१३) एखाद्याकडून कष्ट,काम करवून घेणे
१६) वेळेचा कमीतकमी भाग,पळ
१८) केसांचा भांग पाडण्याचे दातेरी साधन
१९) समुद्र
२१) आग्रा येथील जगप्रसिद्ध वास्तू
२३) रत्ने गुंफलेली माळ
२४) विहिरीचा एक प्रकार
२५) विषमच्या विरुद्ध
२९) मडके
३०) शिक्षक
३२) ढीग
३३) थडगे
३५) घोड्याची गाडी
४१) दोन मैल
४२) एक गड्डा भाजी
४४) उत्पन्नाचा आळीपाळीने उपभोग घेणे
४७) माफी मागणे
४८) इसब,खरुज यासारखे त्वचारोग
५०) लहान
५१) घाई, त्वरा
५२) निर्बुद्ध
५३) पराकाष्ठा,अतिरेक,अनर्थ
५४) वाहून नेणे
५५) पृथ्वी भोवतीचे हवेचे आच्छादन,परिस्थिती
५६) लाथ
६०) दास्यत्व
६१) सावली
६३) सप्तपातलातील तिसरे पाताळ
६५) पाप,अधम कृत्य
६६) शेवट,नाश
६७) भीतीने होणारा कंप
६८) प्रयत्न
६९) कौशल्य
७३) हाताने कापड तयार करण्याचे साधन
७५) मंत्रीमंडळ
७६) बोलणारा,बोलण्याची आवड असलेला
७८) चेहऱ्यावरील तेज
७९) विशेष
८०) केस रंगविण्याचा पदार्थ
८१) अंगुली
८२) हजार शेराचे वजन
८३) नवीच्या विरुद्ध
८५) ** दमयंती

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर



आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७


# आयुर्वेद दिन... आधी समजून घ्या!

**आयुर्वेद हे भारतातील प्राचीन आरोग्यशास्त्र आहे. ते भारतीयांच्या जीवनशैलीत प्रकर्षाने आढळून येते. पण म्हणून ते कसेही वाकवता येते, ही धारणा घातक आहे. हल्ली अनेकजण आयुर्वेदावर बिनधास्त टिप्पणी करतात. आपल्याकडे राष्ट्रीय आयुर्वेद दिन साजरा होतो, पण त्यामुळे शास्त्रीय संकल्पना स्पष्ट झाल्या आहेत का, याबाबत शंकाच आहे. यंदापासून आयुर्वेद दिन २३ सप्टेंबर ला जाहीर झाला आहे. त्यानिमित्ताने...**



**डॉ. साधना कुलकर्णी**

दर वर्षी धनत्रयोदशीला धन्वंतरी जयंती असते. त्याच दिवशी मोदी सरकारने राष्ट्रीय आयुर्वेद दिन साजरा करण्याची परंपरा सुरू केली. यंदा या परंपरेचे दहावे वर्ष आहे. मात्र या वर्षापासून २३ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय आयुर्वेद दिन साजरा केला जाणार आहे. या वर्षीची 'आयुर्वेद जन जन के लिये, पृथ्वी के कल्याण के लिये' ही संकल्पना वाचली आणि पोटात गोळा आला. २०२६ व्या वर्षातले आयुर्वेदाचे भविष्य आजच दिसू लागले. येवले चहा, गुळाचा चहा, प्रेमाचा चहा या लायनीत मला 'आयुर्वेदिक चहाचे दुकान' दिसायला लागले. येथे चुलीवरचे जेवण मिळेल या चालीवर येथे आयुर्वेदिक भोजन मिळेल, अशी पाटी दिसू लागली. कपड्यांच्या दुकानात 'आयुर्वेदिक टॉवेल, रुमाल, चादरींचा एक नवीन विभाग दिसला. आर्युमॉल नावाचा एक शॉपिंग मॉल दिसला. त्यात सगळ्या वस्तू आयुर्वेदिक होत्या. आयुर्जल नावाच्या पाण्याच्या बाटल्यांची उतरंड दिसली. हॉटेलच्या मेन्यूकार्डवर व्हेज, नॉनव्हेज पदार्थांबरोबर आयुर्वेदिक पदार्थांची यादी दिसली. या भयकारक स्वप्नरंजनात दंग झाले असताना एका पेशंटने तंद्री मोडली. आठ दिवसांपासून पोट दुखतंय, जेवायची इच्छा होत नाही. थकवा येतोय. दोन दिवस शेजारच्या डॉक्टरांची औषधं घेतली पण ती ॲलोपथी औषधं मला सहनच होत नाहीत. माझा त्रास तसाच सुरू आहे. काल सरळ सोनोग्राफीच करून टाकली. माझा रिपोर्ट बघा. आणि आता मी आयुर्वेदिक औषधेच घेणार आहे, कारण त्याचे काहीही साईड इफेक्ट्स नसतात...

पेशंटचं हे निर्णायक बोलणं ऐकून माझ्या स्वप्नरंजनाला आजकालच्या पेशंटच्या विद्वत्तेचे अजून धुमारे फुटले. म्हणजे आयुर्वेदिक बाजारपेठेतून माझं स्वप्न पेशंटच्या समजुतीकडे वळलं.

ॲलोपॅथी औषधं सहन होत नाहीत, हे कुणी ठरवलं ?

पोट दुखलं तर लगेच सोनोग्राफी करून टाकली, हे कुणी सांगितलं?

आयुर्वेदिक औषधांचे साईड इफेक्ट नसतात, कोण म्हणतं असं?

मला गुडघ्यांचं ऑपरेशन करायचं नाही. त्यापेक्षा मी आयुर्वेदिक औषधं घेणार, हा कुणाचा निर्णय?

मुलांना भविष्यात कोणतेही आजार होऊ नये म्हणून रोज त्यांना गुळवेल सत्व मधाबरोबर देणार. हा नेमका कुणाचा सल्ला?

असे अनेक गैरसमज डोक्यात फिट्ट बसवून, त्याला प्रमाण मानून आजचा समाज वागत असतो. चरकसंहितेत एक श्लोक आहे- शस्त्र, शास्त्र आणि पाणी हे कुणाच्या हातात/पात्रात आहे, त्यानुसार त्यांची गुणवत्ता सिद्ध होत असते.

आयुर्वेद-जन जन के लिए, पृथ्वीके कल्याण के लिए ही संकल्पना ऐकून मला धडकी भरली, याचं कारण हा श्लोक. कारण सध्या आयुर्वेद हा बाजारपेठेच्या, जाहिरातदारांच्या, औषध उत्पादकांच्या आणि काही अंशी पेशंटच्या हातात आहे. कोणत्याही सौंदयाप्रसाधनात, तेलात, पेयात औषधी वनस्पती असली की ती वस्तू आयुर्वेदिक असते असा प्रचंड गैरसमज समाजात रुढ झाला आहे. हर्बल आणि आयुर्वेदिक यात सगळेच गल्लत करतात. त्यात आपलं व्हॉट्स अप विद्यापीठ आणि गुगलाचार्य आयुर्वेदाबद्दल चुकीच्या माहितीचा रतीब घालत असतात. त्यामुळे आयुर्वेद हे महान शास्त्र निष्कारण हास्यास्पद आणि चुकीचं ठरवलं जातं. मी स्वतः आयुर्वेदशास्त्राची शिक्षक आहे, त्यामुळे शास्त्राबद्दल चुकीच्या धारणा झालेल्या बघून वाईट वाटतं. त्यात दर वर्षी राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त वेगवेगळ्या संकल्पना समाजासमोर येतात त्यामुळे खरा आयुर्वेद सम ोर आणायचा असेल तर आयुर्वेद शिक्षकांनीच पुढाकार घेतला पाहिजे. किंबहुना, शिक्षक म्हणून आपली ती जबाबदारी आहे, असं मला आवर्जून वाटतं.

आज आयुर्वेदक्षेत्रात आधुनिक वैज्ञानिक संशोधन पद्धतीने किती तरी नवनवीन शोध लागत आहेत, पण ते समाजासमोर येत नाहीत. आयुर्वेद आणि ॲलोपथीची नेहमी तुलना केली जाते. दोन्हीही शास्त्रे आरोग्याशी संबंधित असली तरी सांख्यिकीशास्त्राच्या नियमानुसार तुलना कोणाची केली जाते?... ज्यात साम्य आणि सारखे गुण असतात. साधं आहे, गुलाब आणि मोगरा, आंबा आणि पेरुची तुलना होऊ शकत नाही. आयुर्वेदशास्त्राचा पाया, वैचारिक बैठक, मांडणी, काळ, पार्श्वभूमी हे आणि अनेक घटक हे ॲलोपॅथीपेक्षा पूर्णतः वेगळे आहेत. दोन्हीही शास्त्रे आपापल्या ठिकाणी उत्कृष्ट, योग्य आहेत. दोन्हीही शास्त्रांची बलस्थाने आहेत तशा मर्यादाही आहेत. पण तरीसुद्धा तुमच्या आयुर्वे दात डिलीव्हरी होते का हो, तुमच्या आयुर्वे दात थायरॉइड आहे का हो, तुम्ही फक्त नाडीच बघा आणि औषध द्या, आयुर्वेदात कुठे ब्लड इन्व्हेस्टिगेशन्स असतात... अशा खुळचट प्रश्नांचे बॉल आमच्यासमोर नेहमीच आदळत असतात. मग तो बॉल विराट कोहलीसारखा सीमापार टोलवायचा की सोडून द्यायचा हे प्रसंगानुसार ठरवायचं, हा मी माझ्यापुरता नियम केला आहे. आयुष्याचा वेद तो 'आयुर्वेद'. वेद हा शब्द 'विद्' या संस्कृत शब्दापासून तयार झाला आहे. विद् म्हणजे जाणणे किंवा ज्ञान होणे असा आहे. म्हणजेच आयुचे ज्ञान ज्यामुळे होते तो आयुर्वेद...

आणि आयु म्हणजे काय, तर शरीर इंद्रिय सत्व आत्मा संयोगः। अर्थात देह, इंद्रिये, सत्व म्हणजे मन आणि आत्मा यांचा संयोग म्हणजे आयु. थोडक्यात, रक्त-मांस-हाडे यांनी तयार झालेल्या देहाचा इंद्रिय, मानसिक आणि अध्यात्मिक स्तरावर विचार केला आहे, हे या शास्त्राचे एक वैशिष्ट्य आहे. दुसरे महत्त्वाचे म्हणजे आयुर्वेदशास्त्रात न्याय, वैषेशिक, सांख्य, योग या प्राचीन भारतीय दर्शन शास्त्रांचे संदर्भ आजही प्रमाण मानले जातात. आयुर्वेदशास्त्रावर जुनाट आणि कालबाह्यतेचा शिक्का मारून टीका केली जाते. आता संहितांमध्ये ज्या काळाचे वर्णन आहे, तो काळ पाच ते सात हजार वर्षांपूर्वीचा असावा हा अंदाज आहे. त्यामुळे त्यातील जनसमाजाचे वर्णन जुनाट असणारच. पण भारतीय ऋषी परंपरेप्रमाणेच आयुर्वेदालाही अत्यंत ओजस्वी अशी ऋषी परंपरा आहे. आचार्य चरक, सुश्रुत, वाग्भट, चक्रपाणी, माधव, नागार्जुन.... ही या परंपरेतील काही नावे. या विद्वानांनी लिहून ठेवलेले सिद्धांत आजही तंतोतंत लागू पडतात हे त्रिकालाबाधित सत्य नाकारता येत नाही. म्हणूनच आज आयुर्वेद आणि आयुर्वेद शास्त्र या दोन्ही वेगवेगळया संज्ञा आहेत हे समजून घेणं गरजेचं आहे. वास्तव हे आहे की आज आयुर्वेद हा परवलीचा शब्द झाला आहे. कोणीही या शब्दाचा सहज वापर करतात. पण संहितेतील सिद्धांतांचा संदर्भ देऊन आयुर्वेद हा शब्द वापरला जातो तेव्हा ते आयुर्वेद शास्त्र म्हटले जाते.

आमच्या शास्त्रात एक पध्दत कायम आचरणात आणली जाते. ती म्हणजे कोणत्याही सैद्धांतिक लिखाणाला संहितेचा, संहितेतील स्थानाचा, श्लोकांचा संदर्भ देणे आवश्यक असते. त्यामुळे त्या लिखाणाला अधिकृतता येत असते. म्हणजे उठसूठ वापरल्या जाणाऱ्या आयुर्वेद या शब्दात आणि आयुर्वेदशास्त्रात जमीन-अस्मानाचा फरक आहे. आयुर्वेदशास्त्र हे केवळ औषधी वनस्पती नाही, तर जगण्याचं, आचरणाचं शास्त्र आहे. आयुर्वेद एक विचारधारा आहे, एक वृत्ती आहे, एक जीवनशैली आहे. डायबेटीसचे अनेक पेशंट येतात आणि आम्ही आयुर्वेदिक औषधे घेतो आहे असं सांगतात. आयुर्वेदिक औषधे म्हणजे काय, तर सकाळी उठून अर्धा कप कारल्याचा आणि कडुलिंबाचा रस उपाशीपोटी घेणे. आता हा अत्यंत चुकीचा आणि घातक असा उपाय कुणी तरी कुणाला तरी सांगितलेला असतो आणि व्हॉट्सअप वरून तो रीतसर पाझरतो. 'अहो, कारलं आणि कडुलिंब रोजच्या वापरातलं. यांनी काय दुष्परिणाम होणार?' अशी अनेकांची भूमिका असते आणि त्यामुळे गुण आला नाही की आयुर्वेद शास्त्राच्या ना- वाने बोटं मोडली जातात. मनाने औषधं घेणे आणि दुसऱ्यालाही ती अधिकाराने घ्यायला सांगणे ही भारतीय समाजाची खोड आहे आणि त्यातही आयुर्वेद औषधं काय केव्हाही, कशीही कुठेही आणि कितीही घ्यावीत, या विचाराला असलेली समाजमान्यता अत्यंत घातक आहे.

एकदा राजस्थानमध्ये फिरताना चित्तौडगडच्या किल्ल्याजवळ एक हस्तकलेचं दुकान होतं. तिथे गेल्यावर दुकानदार आयुर्वेदिक साडी दाखवत होता. आता ती साडी सीताफळांच्या सालीपासून तयार केलेल्या धाग्यांनी विणली होती. म्हणजे आयुर्वेदिकच की हो! मग ओघानेच आयुर्वेदिक चादर, आयुर्वेदिक दुलई असणं क्रमप्राप्तच होतं... ही दुलई पांघरली की ब्लडप्रेशर, संधिवात, निद्रानाश, डायबेटीस नाहीसे होतात म्हणे. (असं असतं तर आम्ही दवाखान्याऐवजी कापडाची दुकानंच काढली नसती का? मी तर बाई, आयुर्वेदिक पैठणीच तयार केली असती!) जय आयुर्वेद... असं म्हणून मी हात जोडले आणि दुकानातून बाहेर पडले. आज आयुर्वेदातील कालबाह्य संकल्पना वगळून गरज असलेल्या सैद्धांतिक मुद्द्यांवर भर देण्याची गरज आहे. आयुर्वेदाच्या नावावर होणारी फसवणूक, गोरखधंदा यापासून सावध राहण्याची गरज आहे. तरच 'आयुर्वेद जन जन के लिये, पृथ्वी के कल्याण के लिये' ही संकल्पना प्रत्यक्षात येईल. **

# 'कावळा आणि म्हाळ (महालय)'

**धनंजय शेटये**

अगदी लहानपणापासून आपण कावळ्याच्या गोष्टी ऐकून कावळा किती बुद्धीमान आहे यांचा अंदाज घेतला आहे. कर्णकर्कश आवाज कंटाळवाणा वाटत असला तरी तो कावळ्याचा आवाज सकाळी सकाळी ऐकू आला तर शुभ संकेत मानले जातात. पै-पाहुणे आर्थिक सुबत्ता दारी येण्याचे संकेत मानले जातात. पण तरीही अशा या कावळ्याला कोणी कधी घरी पिंजऱ्यात पाळल्याचे ऐकिवात नाही. आम्ही लहानपणी भुईमुगाच्या शेतीची राखणी करतांना कावळ्याच्या बंदोबस्तासाठी पत्र्याचा ढोल बडवत असू तरी तेवढ्यापुरता लपून बसणारा कावळा शेताची नासधूस करतच असायचा. तरी त्याची मडक्यात दगड टाकून पाणी पिण्यासाठीची युक्ती नेहमीच प्रेरणा देऊन जायची. कावळ्याची नजर अतिशय चपळ असायची मारण्यासाठी दगड उचलण्यासाठी हात जरी उगारला तरी त्या कावळ्याला लगेच समजायचे. कावळा अतिशय सावध पक्षी आहे.

कावळा हा आपल्या दैनंदिन जीवनात दिसणारा एक परिचित पक्षी असून भारतीय संस्कृतीत त्याला विशेष धार्मिक विधीत विशेष स्थान आहे.

कावळे शहरांमध्ये, खेड्यांमध्ये आणि जंगलांच्या कडेला सुद्धा राहतात.

माणसांच्या जवळ वास्तव्य ठेवण्यास प्राधान्य देतात.

झाडांवर, विद्युत खांबांवर, घराच्या छपरांवर सहज दिसतात.

त्याच्या आहारामुळे तो 'निसर्गाचा सफाई कामगार' म्हणूनही ओळखला जातो.

कावळा अत्यंत बुद्धिमान पक्षी मानला जातो. समूहात राहतो आणि इतर कावळ्यांबरोबर संवाद साधतो.

संकटाच्या वेळी एकमेकांना इशारा देतो.

पितृपक्षात कावळ्याला अन्न देणे हे पितरांच्या तृप्तीसाठी महत्त्वाचे मानले जाते.

असा समज आहे की, कावळ्याच्या रूपात आपले पितर अन्न स्विकारतात.

कावळा अन्नाला स्पर्श करताच तो पितरांपर्यंत पोहोचल्याचे मानले जाते.

यमराजाचा दूत मानल्यामुळेही कावळ्याला विशेष स्थान आहे.

अन्नाच्या शोधात कचऱ्याची नासधूस करतात. काहीवेळा छोटे पक्षी आणि त्यांची अंडी खाण्यामुळे जैवविविधतेला धोका निर्माण होतो.

मोठ्या शहरांमध्ये कावळ्यांची संख्या खूप वाढल्याने संतुलन बिघडू शकते.

कावळ्यांच्या निरीक्षणावरून हवामानाचा अंदाज बांधण्याची प्रथा ग्रामीण भागात आहे.

काही ठिकाणी कावळ्याच्या ओरडण्याला शुभ/अशुभ मानले जाते.जसे की पाहुणे येणार, बातमी येणार वगैरे.

कावळा हा केवळ एक पक्षी नाही, तर आपल्या समाजाचा, संस्कृतीचा आणि निसर्गाचा एक अविभाज्य भाग आहे. तो बुद्धिमत्ता, जागरूकता, आणि सामाजिक वर्तनाचे प्रतीक मानला जातो. पितृपक्षात त्याचे विशेष महत्त्व असून, तो पूर्वजांच्या आत्म्यांचे प्रतीक म्हणून पूजला जातो.

पिंडदान करताना वाट पाहायला लावणारा कावळा मच्छी साफ करताना माशांची तुकडी अलगद पळवून नेणारा तो कावळा आठवायचा. एखादे वेळी

कावळ्यांची जोडी (जुवाळ) जर कुणाच्या डोक्यावर पडली तर त्या माणसाच्या मृत्यूची बातमी सांगून ते दुःख व्यक्त करण्याची प्रथा काही प्रांतात आजही अस्तित्वात आहे. जेणेकरुन त्या व्यक्तीच्या आयुष्यात येणारे संकट टळुन जाण्यासाठी ही प्रथा करतात. काळाच्या ओघात विज्ञानाचा प्रसार जरी झपाट्याने होत असला तरी अंधश्रद्धेची पाळेमुळे खोलवर रुजलेली असल्याने काही गोष्टी बदलायला वेळ लागेल.पण कावळ्याच्या रुपाने निसर्गाच्या सान्निध्यात जर साफसफाई करणाऱ्या पक्ष्यांचे संरक्षण संवर्धन जतन होत असेल तर पितृपक्षासाठीच नाही तर आयुष्यभर पशूपक्ष्यांच्या रक्षणासाठी हे असे धार्मिक विधी होत असतील तर पर्यावरण संतुलन आणि संवर्धनकरणाऱ्या या धार्मिक विधींना अनन्यसाधारण महत्त्व आहे. पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज आहे ती जर अशा संस्कृती परंपरा रितीरिवाज यातुन जतन होत असेल तर योग्यच आहे.



**महालय श्राद्ध पितृपक्षाचे ऋण**

भारतीय संस्कृती ही श्रद्धा, कृतज्ञता आणि ऋणानुबंधांवर आधारित आहे. प्रत्येक व्यक्तीवर तीन ऋण असतात. देवऋण, ऋषिऋण आणि पितृऋण. यातील पितृऋण हे आपल्या जन्मदात्यांविषयी आणि पूर्वजांविषयी असलेले आपले नैतिक कर्तव्य दर्शवते. या पितृऋणाची आठवण करून देणारा काळ म्हणजे पितृपक्ष किंवा महालय श्राद्ध.

पितृपक्ष हा भाद्रपद पौर्णिमापासून सुरू होतो आणि आश्विन अमावास्यापर्यंत (सुमारे १५ दिवस) चालतो. या काळात असे मानले जाते की आपल्या पूर्वजांचे आत्मे पृथ्वीवर आपल्या वंशजांच्या भेटीस येतात. म्हणून या काळात त्यांच्यासाठी श्राद्ध, तर्पण, पिंडदान यासारख्या विधींना विशेष महत्त्व असते.

आपल्याला जन्म देणारे, वाढवणारे, संस्कार करणारे, आपले पूर्वज यांच्यामुळे आपण आज या पृथ्वीवर आहोत. त्यांच्या त्यागामुळे आपले अस्तित्व आहे. म्हणून त्यांच्या स्मरणार्थ, त्यांच्या आत्म्याच्या शांतीसाठी जे काही केले जाते, ते म्हणजे पितृऋणाची परतफेड. महालय श्राद्ध म्हणजे श्रद्धेने केलेले अर्पण. 'श्राद्ध' हा शब्दच 'श्रद्धा' या शब्दापासून तयार झाला आहे. श्राद्ध विधी केल्याने पितरांना तृप्ती लाभते आणि त्यांच्या आशीर्वादाने घरात सुख-शांती, समृद्धी येते, असे शास्त्र सांगते. हा काळ आत्मचिंतनाचा, नम्रतेचा आणि पूर्वजांप्रती कृतज्ञतेचा असतो.

पिंड म्हणजे तांदळाच्या लाडवांसारखा गोळा. तो पूर्वजांच्या आत्म्यास अर्पण केला जातो. पाण्यात तीळ, दूध, मध टाकून त्या पाण्याचे अर्पण केले जाते.

ब्राह्मणांना जेवण देणे आणि दक्षिणा देणे. अन्न, वस्त्र, धनाचे दान गरजूंपर्यंत पोहोचवणे.

गरूड पुराण, महाभारत यांसारख्या धर्मग्रंथांमध्ये पितृपक्षाचे मोठे महत्त्व सांगितले गेले आहे. विशेषतः आश्विन अमावास्या (सर्वपित्री अमावास्या) ही सर्व पितरांसाठी श्राद्ध करण्याचा दिवस मानला जातो. ज्या पितरांचे श्राद्ध माहीत नसेल, त्यांचेही या दिवशी स्मरण करतात.

**आधुनिक काळात पितृपक्ष**

आजच्या धावपळीच्या जीवनात पूर्वजांचे स्मरण करणे, त्यांच्यासाठी काही विधी करणे हे विसरले जात आहे. पण पितृपक्ष आपल्याला आपल्या मूळांशी, आपल्या अस्तित्वाच्या स्रोतांशी जोडण्याची संधी देतो. हे केवळ धार्मिक कर्मकांड नाही. महालय श्राद्ध म्हणजे आपल्या पितरांप्रती आदर, प्रेम आणि कृतज्ञतेचे प्रकटीकरण. **

# बाजारातून फेरफटका मारताना...

बाजारपेठेतून फेरफटका मारत असताना मुंबई-पुणे सारख्या शहरांमध्ये काही गोष्टी प्रकर्षाने निदर्शनास येतात त्या म्हणजे इथे आपल्या मातीत मराठी व्यापाऱ्यांचा टक्का अगदीच नगण्य. अन्य व्यापाऱ्यांनीच बाजारपेठ फुलून गेलेली दिसते. फार क्वचित मराठी विक्रेते दिसतात. त्यातही एखाद्या मराठी विक्रेत्याकडून एखादी वस्तू विकत घ्यायची म्हटलं तर तो मराठी विक्रेता एखाद्या वस्तूचं वजन अशा प्रकारे करतो जणू काही सोन्याचं वजन करत आहे. जरा सुद्धा माप ढळू देत नाही. तेच एखाद्या परप्रांतीयाकडून घ्यायला गेलं तर मात्र माप ढळतं मिळतं.

आपण एखाद्या मराठी विक्रेत्याकडून वीस रुपयाची वस्तू घेतली आणि आपण त्याला शंभर रुपये देऊन केले तर तो असे काही चिडचिड आणि बडबड करतो जणू काही त्याला संपूर्ण आयुष्याचा कंटाळा आलेला आहे. ती शंभर रुपयाची नोट घेऊन आजूबाजूच्या तीन चार दुकानांमध्ये ती नोट सुट्टी करण्याचा केविलवाणा प्रयत्न करताना दिसतो. उलट पक्षी एखाद्या परप्रांतीयाकडे गेले आणि त्याच्याकडे सुट्टे नसले तरी तो म्हणतो अरे कल दे देना. कोनसा हम भाग के जा रहे है. म्हणजे तो या मातीला किती चिकटून बसलाय पहा. एखाद्या मराठी विक्रेत्याच्या गाडीवरून दोन चार भुईमुगाच्या शेंगा उचलल्या किंवा वाटाण्याच्या दोन शेंगा उचलल्या तर लगेच ठेवा ठेवा म्हणून खेकसतात. तुमच्यासारखे असेच चार पाच जण आले तर आम्ही तर भिकेला लागू असे खडे बोल सुनावले जातात. तेच परक्याकडून घेतलं तर अरे खाओ ना साहब खाके देखो फिर ले लो असे म्हणतात. असे चित्र नेहमी पाहायला मिळते. हे परप्रांतीय विक्रेते आवाज देऊन देऊन ग्राहकांना जवळ बोलावतात. उलट पक्षी मराठी विक्रेते मी कशाला बोलवू. तुला गरज असेल तर ये अशा अविर्भावात बसलेले दिसतात. हे परप्रांतीय विक्रेते रात्री उशिरापर्यंत विक्री करत असतात. जणू काही ते फक्त इथे पैसा कमवण्यासाठीच आलेले आहेत. मराठी विक्रेते मात्र नऊच्या आत घरात पोहोचलेले असतात. ग्राहकांची नस या परप्रांतीयांनी बरोबर ओळखलेली दिसते.

दररोज संसारात लागणाऱ्या वस्तू, खाऊच्या वस्तू, शोभेच्या वस्तू, आणि गरजेच्या वस्तूच विकतात. वरून अगदी मोक्याची जागा पकडून ठेवणार. आणि ऋतुमानानुसार त्यात बदलही करणार. असे काही त्यांचे गुण मराठी विक्रेत्यांपेक्षा त्यांना वेगळं करतात. आमच्या परेल भोईवाडा मार्केटमध्ये एका यूपी वाल्याचा भाजीपाल्याचा धंदा आहे. त्याच्याकडे सगळ्या प्रकारच्या भाज्या असतात. त्याच्याकडे भरपूर गर्दी असते. मापामध्ये जास्तीचा आलेला माल त्याने कधीही उचलून परत आपल्या पाटीत ठेवला नाही जास्त तर जास्त ग्राहकांच्या पिशवीत टाकून देतो. एखाद्याने पाचशेची नोट काढली तरी चिडचिड करत नाही कल दे देना म्हणतो. कायमच त्याच्याकडे गर्दी असते. त्याच्याच थोड्याशा दूर अंतरावर आजूबाजूला थोडे



**निलेश साठे**

फार मराठी विक्रेते आहेत पण त्यांच्याकडे कधीच अशी गर्दी पाहायला मिळत नाही. बाजारातून फेरफटका मारत असताना हे चित्र पुन्हा पुन्हा पाहायला मिळतं. मग नक्की चुकतंय कुठं. असेही काही मराठी विक्रेते आहेत जे आपला माल थोडा चढ्या भावाने विकतात आणि दुसऱ्यांना नावे ठेवतात की त्याच्याकडे माल चांगला मिळत नाही म्हणून. आपण मराठी मराठी म्हणून मराठी विक्रेत्यांकडून एखादी वस्तू विकत घ्यायला जावं तर अशा काही समस्यांचा सामना करावा लागतो. मराठी विक्रेत्यांनी कुठेतरी मानसिकता बदलावी असं मनापासून वाटतं. फार दुःख होतं इतर लोक कमवतात आणि आपले मात्र जेमतेम राहतात. गोड बोललं तर ग्राहकांशी जिव्हाळ्याचे संबंध तयार होतात. आणि तेच व्यवसाय वृद्धीसाठी महत्त्वाचं आहे. या जिव्हाळ्यातूनच आपला दूधवाला आपला भाजीवाला आपला मच्छीवाला आपला इस्त्रीवाला आपला टेलर आपला किराणा वाला हे व्यावसायिक अतूट नातं तयार झालं आहे. काही मराठी व्यावसायिकांना हे फार चांगल्या प्रकारे जमलेलं आहे. काहीजण मात्र जमवून घेण्याचा प्रयत्न सुद्धा करत नाहीत याचं फार दुःख होतं. पैसा पुढची गोष्ट आहे. आधी माणसं जपा. माणसं जपली की पैसा आपोआप येईल. साधा नियम आहे. उत्तम सेवेतूनच चांगला मेवा मिळणार हे व्यवसायातील अतूट सत्य आहे. व्यवसायात जम बसेपर्यंत तुम्हाला तडजोड ही करावीच लागणार. आणि हे फक्त मुंबई-पुणे शहरांमध्येच नाही तर महाराष्ट्रातील गावा गावांमध्ये लोण पसरलेलं आहे. जणू काही ते मराठी तरुणांना हिणवत आहेत तुम्ही करत बसा नोकरी आम्ही तुमच्याच गावातून करतो छोटा मोठा व्यवसाय धंदा. कानामागून येऊन तिखट होण्याचा हा प्रकार कुठेतरी थांबला पाहिजे. मराठी तरुणांनी मनावर घेतलं तर चमत्कार होऊ शकतो. मराठी व्यवसायिकांनो मानसिकता बदला. ग्राहकांशी नाळ जुळू द्या. सुरुवातीला थोडासा त्रास होईल. एकदा का ग्राहक तुमच्याशी जोडला गेला हा हा म्हणता पैसा येत राहील. मराठी तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता छोटे-मोठे व्यवसाय केले पाहिजेत. काही काही व्यवसायात मराठी तरुण अगदीच नगण्य आहेत. केवळ नोकरीवर अवलंबून न राहता छोट्याशा एखाद्या व्यवसायाला सुरुवात तरी करा. नातेसंबंध जपा. म्हणतात ना तोंड गोड तर सगळं गोड. व्यवसायात गोड बोलूनच राहावं लागणार. माणसं जपा आधी माणुसकी नंतर पैसा. **



# ग्रंथालय चळवळ व सामाजिक विकास



सौ. ज्योती म्हात्रे

भारतामध्ये व महाराष्ट्रात ज्ञान प्रसारासाठी ग्रंथालय ही सर्वात महत्त्वाची संस्था आहे. १९ व्या शतकात ग्रामीण भागात वाचन संस्कृती पोहोचवण्यासाठी ग्रंथालय चळवळीला सुरुवात झाली. तुकाराम गाथा, शाहिरी वाङ्मय यांसारख्या परंपरेने वाचनाची प्रेरणा दिली. पुढे लोकहितवादी, ज्योतिबा फुले, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या विचारवंतांनी ग्रंथालयांचे महत्त्व अधोरेखित केले.

**सामाजिक विकासात ग्रंथालयाची भूमिका**

ग्रंथालयांमुळे ग्रामीण व शहरी भागात शिक्षणाचा प्रसार झाला. निरक्षरता कमी होऊन साक्षरतेचे प्रमाण वाढले. लोकशाही मूल्यांची जाणीव लोकांना झाली, संविधानातील हक्क व कर्तव्यांची माहिती सहज उपलब्ध झाली. सामाजिक सुधारणांना चालना मिळाली. स्त्री शिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन, जातिभेदविरोधी विचार लोकांपर्यंत पोहोचले. लोकसाहित्य, धार्मिक ग्रंथ, ऐतिहासिक कागदपत्रे यांचे जतन झाले. विज्ञान व तंत्रज्ञानाची ओळख मुलांना झाली आणि लेखनकलेला चालना मिळाली.

ग्रंथालयांमुळे समाजात ज्ञान, समता, प्रगती व जागरूकता निर्माण झाली. शिक्षण हा सामाजिक विकासाचा पाया आहे आणि शिक्षणाचा प्रसार करण्याचे सर्वात प्रभावी साधन म्हणजे ग्रंथालय होय. त्यामुळेच ''समाजाचा खरा विकास ग्रंथालयाशिवाय अशक्य'' हे विधान सत्य ठरते.

**ग्रंथालयाचे महत्त्व**

ग्रंथालय हे ज्ञान प्रसाराचे केंद्र आहे. शैक्षणिक, सामाजिक, वैज्ञानिक, ऐतिहासिक माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवते. लोकशाहीला आधार देते, सुधारणावादी विचारसरणी पसरवते, आर्थिक व तांत्रिक प्रगतीसाठी आवश्यक माहिती उपलब्ध करते. साहित्य, कला, इतिहास जतन करून पुढच्या पिढ्यांना वारसा देते. मुलांमध्ये मूल्यसंस्कार, शिस्त, विचारशक्ती व सर्जनशीलता वाढवते.

**गाव तेथे ग्रंथालय**

गावोगावी ग्रंथालय उभे राहिले तर खऱ्या अर्थाने ज्ञानक्रांती होईल. शेतकरी, तरुण, स्त्रिया, मुले सर्वांनाच वाचनाची संधी मिळेल. स्पर्धा परीक्षा, शेतीविषयक ज्ञान, स्वयं-सहाय्य गटांसाठी उपयुक्त माहिती उपलब्ध होईल. ग्रंथालय गावातील सामाजिक ऐक्य व संस्कृती जतन करणारे केंद्र ठरेल. ग्रामपंचायतीमार्फत वाचनालय उभारणे, वाचन प्रेरणा सप्ताह व वाचन स्पर्धा आयोजित करणे यासारखे उपक्रम आवश्यक आहेत.

**वृत्तपत्र कुटुंबातील घटक**

आधुनिक काळात वृत्तपत्र हे कुटुंबातील अविभाज्य घटक ठरते. राजकारण, अर्थकारण, विज्ञान, क्रीडा, कला आदी क्षेत्रांतील घडामोडी समजतात. मुलांची भाषाशैली सुधारते, सामाजिक जाणीवा वाढतात, मनोरंजन मिळते आणि लोकशाही मजबूत होते. सकाळी कुटुंब एकत्र बसून वृत्तपत्र वाचल्याने चर्चासंस्कृती वाढते.

**बालक व वृत्तपत्र वाचन**

बालपणीचे संस्कार आयुष्यभर टिकतात. वृत्तपत्र वाचनामुळे मुलांना देश-विदेशातील ज्ञान मिळते, शब्दसंपत्ती वाढते, जिज्ञासा व विचारशक्ती विकसित होते. संपादकीय लेख वाचल्याने स्वतंत्र मत तयार होते. व्यंगचित्रे, कोडी, बालकथा वाचून कल्पनाशक्ती वाढते. पालक व शिक्षकांनी मुलांना वृत्तपत्र वाचनासाठी प्रोत्साहित करणे आवश्यक आहे.

**कुटुंबसमाजदेश**

कुटुंब हे समाजाचे पहिले शाळा आहे. कुटुंब सुशिक्षित व संस्कारी असेल तरच समाज प्रगत होतो आणि समाज प्रगत झाल्यास देश समर्थ होतो. म्हणजेच ''सद्गुणी कुटुंब = प्रगत समाज = समर्थ देश'' हे समीकरण खरे ठरते.

**ग्रंथालय समाजाभिमुख व्हावे**

पूर्वी ग्रंथालये विद्यार्थ्यांच्या वाचनापुरती मर्यादित होती. आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ती समाजाभिमुख होण्याची गरज आहे. महिला, शेतकरी, कामगार, तरुण यांच्या समस्यांसाठी माहिती उपलब्ध करून देणे, डिजिटल पुस्तके व इंटरनेट सुविधा देणे, चर्चासत्रे व व्याख्याने आयोजित करणे, मोबाईल लायब्ररी सुरू करणे या उपाययोजना आवश्यक आहेत.

**वाचनभूक आणि ग्रंथालय**

जसे अन्न-पाणी जीवनासाठी आवश्यक आहे तसेच वाचन बौद्धिक विकासासाठी गरजेचे आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, समाजशास्त्र यावरील असंख्य पुस्तके ग्रंथालयात मिळतात. विचारविकास होतो, संशोधन व लिखाणाची प्रेरणा मिळते. सज्ञान माणसाचे खरे धन म्हणजे त्याचे ज्ञान, आणि ही संपत्ती वाढवणारे साधन म्हणजे ग्रंथालय.

**निष्कर्ष**

ग्रंथालय हे केवळ पुस्तकांचा साठा नसून ज्ञानाचे मंदिर आहे. ते व्यक्ती, कुटुंब, समाज आणि देश यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. म्हणूनच ''गाव तेथे ग्रंथालय आणि ग्रंथालय समाजाभिमुख'' हे सूत्र आजच्या युगात मानव विकासाचा पाया आहे. **

## नितांत वाचनीय आणि प्रेरक

# कार्यकर्ता


पुस्तक परीक्षण

प्रा. शाम जोगळेकर

मो. ९२७३३४३१७७

कार्यकर्ता - लोकसाधनेचं उत्तुंग स्वप्न साकार करणाऱ्या डॉ. राजा दांडेकर यांची आत्म कथा, हे लेखक सुमेध वडावाला (रिसबूड) यांचे पुस्तक, पुण्यातील उन्मेष प्रकाशनने देखण्या रूपात प्रकाशित केले आहे. सुरुवातीला राजा दांडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले आहे. आपली जडणघडण कशी झाली हे त्यांनी स्पष्ट केले आहे. ''लोकसाधनेच्या कार्यात एक साधक म्हणून कार्य करताना आता पंचेचाळीस वर्षे झाली आहेत. स्वमुक्तीपेक्षा सामूहिक लोकमुक्तीची साधना केली पाहिजे, म्हणून 'लोकसाधना' केली पाहिजे. मग 'लोकसाधना' हीच जीवनसाधना होते.'' असे त्यांनी शेवटी म्हटले आहे. शिक्षणामुळेच देशाचे पुनरुत्थान होऊ शकेल, या लोकमान्य टिळकांच्या वचनामुळे डॉ.राजा दांडेकर यांच्या जीवनाला प्रेरणा प्राप्त झाली. पुस्तकाचे रंगीत आणि समर्पक मुखपृष्ठ राजेंद्र गिरधारी यांचे आहे. हे पुस्तक सात विभागांत वाचकांसमोर उलगडते.

''लोकसाधनेचं स्वप्न'' या पहिल्या भागात एकूण दहा प्रकरणे आहेत. त्यामधून राजा दांडेकर यांच्या कुटुंबाविषयी समजते. रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली तालुक्यातील गुडघे गावात त्यांचे घर होते. गंगाधर रामचंद्र दांडेकर तथा आबा हे राजा यांचे वडील. १५ एप्रिल १९५५ रोजी राजा यांचा जन्म झाला. गावात शिक्षणाची सोय नसल्याने राजा आणि त्यांच्या भावंडांचे शिक्षण तालुक्यात वेगवेगळ्या ठिकाणी झाले. अनेक अडचणी सोसत राजाने आपले शिक्षण घेतले. त्यांचे अस्सल शेतकऱ्यांचे घर होते. त्यामुळे शेतीतील सर्व कामे करण्याची सवय राजा यांना बालपणापासूनच झाली. तेथील जीवन आणि काही रंजक गोष्टींची नोंद झाली आहे. शेतीतील आणि बागेतील कष्टप्रद कामांमुळे राजा यांची तब्येत उत्तम झाली. अकरावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर राजा यांनी डॉक्टर होण्याचे आपले ध्येय वडिलांना सांगितले. साडेसात वर्षांच्या आयुर्वेद अभ्यासक्रमासाठी त्यांनी पुण्याला जाण्याचे ठरविले. याउलट त्यांच्या वडिलांना, मोठ्या मुलाने नोकरी करून कुटुंबाची जबाबदारी स्वीकारावी असे वाटत होते. रा. स्व. संघातील पुण्याचे ज्येष्ठ कार्यकर्ते, अनंतराव देवकुळे यांच्या आश्वासनानुसार राजा यांनी पुण्याला पुढील शिक्षणासाठी प्रयाण केले. पुण्यातीलराजायांचेजीवन अत्यंत कष्टमय होते. अनेक अडचणी त्यांच्या शिक्षणामध्ये येत होत्या. आणीबाणीविरुद्ध केलेल्या निदर्शनांमुळे त्यांना आणि त्यांच्या भावंडांना तुरुंगवास सोसावा लागला. तेथील अनुभव सविस्तरपणे नोंदविले आहेत. राजा यांचे आयुर्वेद महाविद्यालयातील शिक्षण सुरू असतानाच, तेथील प्रतिकूल परिस्थिती आणि अभ्यासक्रम सुधारण्यासाठी विविध प्रयत्न करावे लागले. महाराष्ट्रातील विविध आयुर्वेद महाविद्यालयांची पाहणी करण्याची संधी राजा यांना लाभली. नागपूरच्या संघ शिबिरानंतर राजा यांनी बाबा आमटे यांची आनंदवनमध्ये भेट घेतली. बाबा आमटे यांनी राजा यांचे वैद्यकीय शिक्षण पूर्ण करण्याची सर्व जबाबदारी घेण्याची तयारी दर्शवली. परंतु त्यानंतर आनंदवनमध्ये काम करण्याचे राजा यांनी अमान्य करून, कोकणवासी बांधवांच्या मनाला महारोगाने ग्रासले असल्याने, आपण कोकणातच भावी काळात कार्य करणार असल्याचे राजा यांनी बाबांना सांगितले. राजा यांच्या संकल्पाचे त्यांनी कौतुक केले. ''संकल्पाचं सतत स्मरण, हाच जप!'' असा बाबा आमटे यांनी २०.६.१९८० रोजी, राजा यांना लिखित संदेश दिला.





कॉलेज, अभ्यास आणि शुश्रुषालये यामध्ये केलेल्या अविरत कष्टामुळे राजा यांचा वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण झाला. पूर्व परिचयातून प्रा.रेणू केसकर यांच्याशी राजा यांचा विवाह (२५.१२.१९८२) झाला. विवाहापूर्वी राजा यांनी रेणू यांना भावी काळात ग्रामीण भागात राहून शिक्षण प्रसाराचे कार्य करणार असल्याचे सांगितले होते. चिखलगाव येथील शैक्षणिक कार्यासाठी, लोकमान्य पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट म्हणजेच लोकसाधनाची निर्मिती केली. रेणू यांनी त्यासाठी बी.एड.केले. डॉ.राजा यांनी आपला वैद्यकीय व्यवसायही ग्रामीण भागात सुरू केला. त्याविषयीचे विविध अनुभव नोंदविले आहेत. जुलै,१९८४ मध्ये, शासकीय परवानगी प्राप्त झाल्यावर आठवीचा वर्ग विनाअनुदान तत्त्वावर, १ ऑगस्ट १९८४ रोजी, लो. टिळकांच्या पुण्यतिथीच्या मुहूर्तावर सहा मुलांसह सुरू झाला. अभावग्रस्त असणाऱ्या या मुलांना विविध गोष्टी दिल्या गेल्या. रेणू दांडेकर आणि अन्य एक शिक्षक यांच्या मदतीने शाळा सुरू झाली. कालांतराने शाळेतील मुलांची संख्या वाढू लागली. नववीचा वर्ग सुरू झाल्यावर अन्य शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. मुंबईतील श्रद्धानंद आश्रमाचे एक ट्रस्टी दादासाहेब ताटके यांच्या प्रयत्नांमुळे डेन्मार्कच्या 'तेरे देस होम्स' या स्वयंसेवी संस्थेने, तेरा लाख रुपयांची देणगी दिली. त्यामुळे चिखलगाव मधील शाळेच्या इमारतीचे बांधकाम होण्यास मदत झाली.

'लोकसाधना ट्रस्ट' तर्फे दापोली तालुक्यातील, ४६ खेड्यांत, शिक्षण, आरोग्य, कृषी, महिला सक्षमीकरण, ग्रामविकसन या पाच क्षेत्रांत काम करण्यास सुरुवात झाली. त्या सर्वांचा शिक्षण हा पाया होता. त्या दृष्टीने विविध व्यक्तींनी आणि संस्थांनी कशी आर्थिक मदत केली, याविषयी सविस्तर सांगितले आहे. त्यामधूनच नवनवीन उपक्रम संस्थेला सुरू करता आले. माध्यमिक शाळेच्या स्थापनेपासून सर्वाधिक काळ, म्हणजे ३२ वर्षे मुख्याध्यापिका लाभलेल्या रेणू दांडेकर यांनी शाळा नाना प्रयोगांनी गजबजवून टाकली, नावारूपाला आणली. तेथील शिक्षणकार्यपद्धती पाहायला बाहेरगावचे शिक्षक, संस्थाचालक, शिक्षणप्रेमी नागरिक येऊ लागले. सुरुवातीची सात वर्षे रेणू यांनी आपली जबाबदारी विनावेतन पार पाडली होती. पद्मश्री भंवरलाल जैन यांच्या आग्रहामुळे आणि आर्थिक मदतीमुळे २००८ मध्ये लोकसाधनाने डी.एड. कॉलेज सुरू करून, आदर्श पद्धतीने काही काळ चालविले. ते सुरू करताना आलेले विशेषतः दिल्लीतील अनुभव नितांत वाचनीय आणि विलक्षण स्वरूपाचे आहेत.

'लोकसाधना' चे काम सुरू झाल्यावर देशविदेशामध्ये, राजा यांनी नियोजनबद्ध प्रवास केला. त्यामधून त्यांना विविध अनुभव प्राप्त झाले. त्यामुळे शाळा आणि तेथील अन्य संस्थांचे कार्य सुधारण्यास मदत झाली. हे सविस्तर अनुभव नितांत वाचनीय आहेत. कृषी क्षेत्रातील विविध प्रयोगांद्वारे राजा यांनी, स्व-उदाहरणाने गावकऱ्यांसमोर आदर्श निर्माण केला. कोकण परिसरातील कातळयुक्त जमीन, जी पूर्वी वापरली जात नव्हती, ती हिरवीगार, उत्पन्न देणारी अशी संपन्न केली. सर्व प्रकारच्या कृषी उत्पादनात वाढ झाली. महिला सक्षमीकरण करण्याच्या प्रयत्नातून गावातील व्यसनाधीनता कमी होण्यास मदत झाली. सुरुवातीच्या काळात राजा दांडेकर यांना गावकऱ्यांचे सहकार्य मिळाले नाही. संस्थेवर गावकऱ्यांनी बहिष्कार टाकला होता. परंतु जेव्हा गावातील मुले शिकून स्वतःच्या पायावर उभी राहिली, गावातच राहून चांगले उत्पन्न मिळवू लागली, तेव्हा गावकऱ्यांचा या विविध प्रकल्पांना होणारा विरोध मावळला आणि सर्वांचे सहकार्य लाभले. या प्रयत्नांमध्ये राजा दांडेकर आणि त्यांच्या समग्र परिवाराला अनेक बरेवाईट अनुभव आले. त्यांचाही उल्लेख पुस्तकात आहे. वयाच्या सत्तरीत प्रवेश करताना डॉ. राजा दांडेकर यांनी संस्थेतील सर्व अधिकारपदे सोडण्याचे ठरवले आणि केवळ कार्यकर्ता म्हणून काम करण्याचे योजले आहे. राजा यांनी आपल्या आईवडिलांविषयी आणि आपल्या परिवाराविषयी सविस्तरपणे लिहिले आहे. पुस्तकातील २८ पृष्ठांच्या कृष्णधवल आणि रंगीत छायाचित्रांतून संस्थेच्या विकासाचे विविध टप्पे उलगडतात. तसेच कोकणातील ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासाच्या या कार्याला मदत करणाऱ्या विविध महान व्यक्तींचे, त्यांच्या संदेशांसहदर्शनही होते. दांडेकर परिवाराचीही सचित्र ओळख होते. डॉ. राजा देशपांडे यांच्या जीवनकार्याची या पुस्तकाद्वारे लेखक सुमेध वडावाला (रिसबूड) यांनी आपल्या लेखन कौशल्याद्वारे उत्तम ओळख करून दिली आहे. सुमेध यांच्या प्रकाशित पुस्तकांची आणि प्राप्त पुरस्कारांची माहिती शेवटी दिली आहे. या पुस्तकामुळे अनेक मराठी वाचकांना, सर्वांगीण ग्रामीण विकासाच्या या कार्याची प्रत्यक्ष ओळख करून घेण्याची प्रेरणा निर्माण होईल. तर काहींना आपल्या भागात सर्वांगीण ग्रामीण विकास साधण्याची प्रेरणाही प्राप्त होऊ शकेल, याची खात्री वाटते. **

**पुस्तकाचे नाव : कार्यकर्ता, डॉ. राजा दांडेकर यांची आत्मकथा, लेखक : सुमेध वडावाला (रिसबूड),**
**प्रकाशक : उन्मेष प्रकाशन, पुणे-३०**
**पहिली आवृत्ती : १ जून २०२५**
**पृष्ठे : ३५०, मूल्य : रू. ५००/-**

# सामाजिक चिंतनाचा विषय

**लिंग गुणोत्तरात घट झाल्यामुळे महिलांवरील बलात्कार आणि असभ्य वर्तनात झालेली वाढ विशेषत: उच्च लिंग पूर्वाग्रह असलेल्या भागात दिसून येत आहे. महिला सक्षमीकरणाविरुद्ध पुरुषांच्या प्रतिक्रियेमुळे अशा गुन्ह्यांमध्ये वाढ झाली असून जागतिक बँकेने अशा हिंसाचाराला जागतिक महामारी म्हणून संबोधले आहे. भारतात महिला आणि मुलींवरील सततचा हिंसाचार हा सामाजिक आणि धोरणात्मक चिंतेचा विषय बनत आहे.**



प्रा. मुक्ता पुरंदरे

कोलकाता असो की पुणे; महिलांवरील अत्याचारांच्या घटनेने समाजमन आधी प्रक्षुब्ध होते आणि नंतर शांत होते. काही दिवस गेले की पुन्हा हिंसाचाराच्या घटना घडतात. त्यातील काही घटना बनावही असू शकतात; परंतु जग २१ व्या शतकात येऊन २५ वर्षे झाली असली तरी भारतीय पुरुषप्रधान संस्कृती आणि त्याचा समाजमनावरचा पगडा अजूनही कमी झालेला नाही. एकीकडे महिला शिकल्या आहेत. त्या कोणतीही आव्हाने पेलण्यास तयार झाल्या आहेत. संधी मिळाली की त्या सोने करतात. दुसरीकडे महिलांचा होत असलेला उत्कर्ष पुरुषांच्या प्रगतीत गतिरोधक निर्माण करतो, अशी मानसिकता दुर्दैवाने आणखी घट्ट रुजते आहे. त्यातून निर्माण होणाऱ्या असुरक्षित भावनेमुळे महिलांचा छळ करण्याचे प्रकार वाढत चालले आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये महिलांवरील हिंसाचारात अभूतपूर्व वाढ झाली आहे. त्याहूनही चिंताजनक बाब म्हणजे शाळा आणि महाविद्यालयीन परिसर किंवा कामाच्या ठिकाणी गुन्हे घडत आहेत. या जागा सहसा सुरक्षित आश्रयस्थान मानल्या जातात. अलिकडेच बालासोरमधील फकीर मोहन स्वायत्त महाविद्यालयातील वीस वर्षीय विद्यार्थिनीने आत्मदहनाच्या प्रयत्नात ९० टक्के भाजून आत्महत्या केली. एका वरिष्ठ शिक्षिकेविरुद्ध लैंगिक छळाच्या वारंवार तक्रारी केल्यानंतर बी.एड.च्या विद्यार्थिनीने मुख्याध्यापकांच्या कार्यालयाबाहेर हे टोकाचे पाऊल उचलले होते. आरोपी शिक्षक समीर साहू आणि प्राचार्य दिलीप घोष यांना अटक करण्यात आली; परंतु या मुलीच्या तक्रारी वेळेवर सोडवल्या गेल्या असत्या, तर एक मौल्यवान जीव गेला नसता.

ही मुलगी न्यायासाठी अनेक ठिकाणी फिरत राहिली, मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातही गेली; पण तिच्या गंभीर तक्रारीकडे कोणीही लक्ष दिले नाही. पश्चिम बंगालमध्ये गेल्या वर्षी आर. जी. कर मेडिकल हॉस्पिटलमधील पदव्युत्तर विद्यार्थिनीच्या क्रूर हत्येला एक वर्ष उलटूनही या जूनमध्ये कॅम्पसमध्ये एका लॉ कॉलेजच्या विद्यार्थिनीवर सामूहिक बलात्कार करण्यात आला. कर्नाटकमधील मंगळुरूमध्ये एका विद्यार्थिनीवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली दोन व्याख्यात्यांना अटक करण्यात आली. दिल्लीमध्ये नऊ वर्षांच्या मुलीवरील बलात्कार आणि हत्येमुळे कायदा आणि सुव्यवस्था ढासळल्याबद्दल विरोधकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. २०१२ मध्ये दिल्लीमध्ये निर्भयावर झालेला बलात्कार आणि हत्येनंतर जमिनीवर फारसे काही बदल झालेले नाहीत. ओडिशाच्या विद्यार्थिनीच्या दुर्दशेने कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ कायदा, २०१३ अंतर्गत अनिवार्य केलेल्या अंतर्गत तक्रार समित्यांकडे लक्ष वेधले आहे. ओडिशा सरकारने सर्व महाविद्यालयांना २४ तासांच्या आत समित्या स्थापन करण्यास सांगितले होते. असे होऊन आणि अनेक प्रतिबंधक उपाय योजले जाऊनही अत्याचारांची घृणास्पद मालिका संपत नाही. 'नॅशनल क्राइम रेकॉर्ड्स ब्यूरो (एनसीआरबी)चा २०२३ चा वार्षिक भारतातील गुन्हे अहवाल अद्याप प्रसिद्ध झालेला नाही. २०२२ च्या उपलब्ध आकडेवारीनुसार महिलांविषयक एकूण चार लाख ४५ हजार २५६ गुन्हे नोंदवले गेले. २०२१ च्या तुलनेत त्यात चार टक्के वाढ दिसते. महिलांविरुद्धचे बहुतेक गुन्हे (३१.४ टक्के) पती किंवा नातेवाइकांकडून केले गेले आणि ते क्रूरतेच्या कलमाअंतर्गत नोंदवले गेले. महिलांच्या विनयभंगाच्या उद्देशाने महिलांवर होणारे हल्ले एकूण गुन्ह्यांपैकी १८.७ टक्के होते तर बलात्कारांचे प्रमाण ७.१ टक्के होते. अनेक गुन्हे नोंदवले जात नाहीत, हे इथे लक्षात घेण्यासारखे आहे. या पार्श्वभूमीवर लैंगिक हिंसाचार आणि लिंगभेद यावर संवाद आवश्यक आहे आणि तो लवकरच सुरू झाला पाहिजे. काही दिवसांनी गुन्ह्याविरुद्ध न्यायाची मागणी कमी होता कामा नये. बिहार, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र आणि केरळ या राज्यांमध्ये महिलांवरील गुन्ह्यांमध्ये झपाट्याने वाढ झाली आहे. संसदेत भारतातील महिलांवरील गुन्ह्यांबाबत एक प्रश्न विचारण्यात आला होता. त्याच्या उत्तरात पाच वर्षांचे आकडे सादर करण्यात आले. २०१८ ते २०२२ दरम्यानचे हे आकडे दर्शवतात की २०१८ मध्ये महिलांवरील अत्याचाराचे तीन लाखांहून अधिक गुन्हे नोंदवले गेले, तर २०२२ मध्ये चार लाखांहून अधिक गुन्हे नोंदवले गेले. देशभरात महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे.

२०१२ चा निर्भया खटला संपल्यानंतर आणि आरोपींना शिक्षा झाल्यानंतर आता निर्भया होणार नाही अशी आशा होती; परंतु त्या प्रकरणानंतरही अशी अनेक भयानक प्रकरणे दररोज समोर येत आहेत. कोलकाता विधी महाविद्यालयातील एका मुलीवर बलात्कार करून हत्या करण्यात आल्यानंतर संसदेत उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नावर देण्यात आलेल्या उत्तरात २०२२ मध्ये देशभरात महिलांवरील गुन्ह्यांचे चार लाखांहून अधिक गुन्हे दाखल झाले आहेत, हे स्पष्ट झाले. सरकारने यासंदर्भात पाच वर्षांचे आकडे सादर केले. या आकड्यांवरून स्पष्ट होते की महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१.१ कोटी होती. त्यात महिलांचे प्रमाण ४८.५ टक्के होते. भारतातील प्रत्येक क्षेत्रात आपले स्थान निर्माण करण्यासाठी महिलांनी दीर्घ लढाई लढली. त्याच वेळी त्या अजूनही रात्रीच्या अंधारात सुरक्षित रस्त्यांवर चालण्याची लढाई लढत आहेत. सार्वजनिक ठिकाणी सुरक्षित वाटण्यासाठी त्या लढत असलेली लढाई अजूनही सुरू आहे. २०२२ मध्ये उत्तर प्रदेशमध्ये सर्वाधिक गुन्हे नोंदवले गेले आहेत.देशातील महिलांवरील गुन्हे रोखण्यासाठी उच्च-जोखीम असलेल्या क्षेत्रांवर लक्ष ठेवण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित चेहऱ्यावरील ओळख प्रणाली, स्मार्ट प्रकाश व्यवस्था आणि ड्रोन वापरण्यात येणार आहेत. देशातील महिलांवरील वाढत्या गुन्ह्यांबद्दल सर्वोच्च न्यायालयाच्या महिला वकील संघटनेने दाखल केलेल्या जनहित याचिकेवर मंत्रालयाने दिलेल्या उत्तरात ही माहिती देण्यात आली. गृह मंत्रालयाने म्हटले आहे की दिल्ली, मुंबई आणि इतर शहरांमधील सात रेल्वे स्थानके लवकरच कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालींनी सुसज्ज केली जातील. उच्च-जोखीम असलेल्या क्षेत्रांवर लक्ष ठेवण्यासाठी स्वयंचलित परवाना प्लेट ओळख, स्मार्ट लाइटिंग सिस्टीम आणि ड्रोन यासारख्या इतर उपाययोजनादेखील अंमलात आणल्या जातील. मंत्रालयाने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की राष्ट्रीय डेटा शेअरिंग अँड एक्सचेंज प्लॅटफॉर्ममध्ये बलात्कार, पाठलाग आणि बाल शोषण यासारख्या विविध लैंगिक गुन्ह्यांमध्ये सहभागी असलेल्या व्यक्तींची नावे, पत्ते, छायाचित्रे आणि फिंगरप्रिंट तपशीलांसह संवेदनशील माहिती आहे. सध्या या डेटाबेसमध्ये २०.२ लाख नोंदी आहेत, ज्या देशभरातील सर्व पोलिस ठाणी आणि कायदा अंमलबजावणी संस्था इंटर-ऑपरेबल क्रिमिनल जस्टिस सिस्टीम डेटाबेसद्वारे वापरल्या जाऊ शकतात.

तंत्रज्ञानाच्या मदतीने पोलिस, न्यायालये, तुरुंग, न्यायवैद्यक प्रयोगशाळा आणि खटले एकत्रित करण्याच्या उद्देशाने राबवण्यात येत असलेला हा एक उपक्रम आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या महिला वकील संघटनेने युक्तिवाद केला की महिलांवरील गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी पुढील उपाययोजनांची आवश्यकता आहे. भारताच्या राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्यूरोच्या आकडेवारीवरून दिसून आले आहे की महिलांवरील गुन्ह्यांमध्ये वाढ झाली आहे. २०१८ मध्ये ५८ लाख असलेला हा आकडा २०२२ मध्ये ६६ लाखांवर पोहोचला. उत्तर प्रदेश ६५,७४३, महाराष्ट्र ४५,३३१, राजस्थान ४५,०५८, मध्य प्रदेश ३२,७६५, पश्चिम बंगाल ३४,७३८, ओडिशा २३,६४८, तेलंगणा २२,०६६, कर्नाटक १७,८१३, हरियाणा १६,७४३, आंध्र प्रदेश २५,५०३ अशी सर्वाधिक गुन्हे दाखल झालेल्या राज्यांची संख्या आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये महिलांवरील गुन्ह्यांमध्ये महाराष्ट्र दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकावर आहे. २०१८ मध्ये देशभरातील महिलांवरील गुन्ह्यांमध्ये ते दुसऱ्या क्रमांकावर होते. २०१९ मध्ये ते तिसऱ्या क्रमांकावर होते. २०२० मध्ये ते आघाडीच्या तीन राज्यांमध्ये नव्हते. अनेकांची कधीही गुन्हा नोंदवण्याची हिंमत होत नाही. हे आकडे आपल्यासमोर आरसा धरतात आणि सांगतात की महिला सक्षमीकरणासाठी अजूनही बराच लढा बाकी आहे. **

# भारताचा ओमानवर निसटता विजय

## ● बळी मिळविण्यासाठी सुर्या बिग्रेडची दमछाक



| दुबई | वृत्तसंस्था |

**भारतीय संघाने आशिया चषक २०२५ स्पर्धेत विजयाची हॅटट्रिक पूर्ण केली. सूर्यकुमार यादवच्या संघाने 'अ' गटातील शेवटच्या साखळी सामन्यात ओमानचा पराभव केला. यावेळी ओमानकडून कडवी टक्कर पाहायला मिळाली. २००-२५० धावांचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीय संघाला साखळी फेरीतील अखेरच्या सामन्यात ओमानने १८८ धावांवर रोखले. मात्र, ओमानने शेवटच्या षटकापर्यंत फलंदाजी केली आणि फक्त २१ धावांनी पराभव स्विकारला. या स्पर्धेतील भारताचा हा सलग तिसरा विजय ठरला आहे. आता अंतिम ४ च्या लढतीत भारताला रविवारी (दि.२१) पाकिस्तानचा सामना करायचा आहे.**

ओमानविरुद्धच्या सामन्यात भारतीय संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. भारताकडून अभिषेक शर्मा आणि शुबमन गिलने डावाची सुरुवात केली; परंतु, गिल फक्त ५ धावा करून बाद झाला. त्यानंतर संजू सॅमसनने संयमी खेळ करताना ५६ धावा केल्या. अभिषेक शर्माने ३८ धावा करताना संजूसह ६६ धावा जोडल्या. त्यानंतर हार्दिक पंड्या देखील (१) स्वस्त्यात माघारी परतला. अक्षर पटेल (२६) व तिलक वर्मा (२९) यांनी चांगला खेळ केला. परंतु, त्यांना मोठ्या धावसंख्येत रूपांतरित करण्यात अपयश आले. त्यांच्यानंतर शीवम दुबे (५), हर्षीत राणा (१३), अर्शदिप सिंह (१) व कुलदीप यादव (१) हे देखील मोठी धावसंख्या उभारण्यात अपयशी ठरले. त्यामुळे २००-२५० धावांचे स्वप्न पाहणाऱ्या भारतीय संघाला ओमानने ८ बाद १८८ धावांवर रोखले. यावेळी ओमानचे गोलंदाज शाह फैसल, जितेन रामानंदी आणि आमिर कलीम यांनी प्रत्येकी २ बळी घेतले. दरम्यान, भारतीय संघाचा कर्णधार सुर्यकुमार यादव फलंदाजीसाठी न आल्याने सर्वांना आश्चर्य वाटले.

प्रत्युत्तरात ओमानचे सलामीवीर जतिंदर सिंग व आमीर कलीम यांनी चांगला खेळ दाखवला. मात्र, जतिंदर ३२ धावांवर त्रिफळाचीत झाला. त्यानंतर कलीमने ३८ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. ओमानला ३० चेंडूंत ७३ धावा धावांची गरज असताना हार्दिक पंड्याने सीमारेषेवर अविश्वसनीय झेल घेतला आणि कलीम ६४ धावांवर माघारी परतला. १९व्या षटकात हम्मदने अर्धशतक पूर्ण केले आणि ५१ धावांवर झेलबाद झाला. शेवटच्या शतकात ओमानने आणखी एक गडी गमावला. त्यामुळे ओमानला ४ बाद १६७ धावांवर समाधान मानावे लागले.

### ग्रुप स्टेजमध्ये दबदबा

आशिया चषकातील १२व्या सामन्यामध्ये भारताने 'अ' गटात ओमानला पराभूत करून सलग तीन सामने जिंकले. त्यामुळे भारताने ग्रुप स्टेजमध्ये पहिल्या स्थानावर पोहोचत आपला दबदबा दाखवला आहे. 'अ' गटातील गुणतालिकेत भारताने ६ गुण मिळवले असून संपूर्ण स्पर्धेत सर्वोत्तम ठरला आहे. तसेच, पाकिस्तान संघ ४ गुणांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर युएई दोन गुणांसह तिसऱ्या क्रमांकावर असून ओमान चौथ्या क्रमांकावर राहिला आहे.

### अर्शदीप सिंहचा भीमपराक्रम

या सामन्यात एक बळी घेऊन अर्शदीप सिंहने एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. अर्शदीप सिंहने ओमानविरुद्धच्या सामन्याच्या २०व्या षटकात विनायक शुक्लाचा बळी घेतला आणि टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये १०० बळी पूर्ण केले. टी-२० क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा तो पहिला भारतीय गोलंदाज ठरला आहे. अर्शदीप सिंहने २०२२ मध्ये भारतीय संघासाठी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण केले आणि तेव्हापासून तो भारतीय गोलंदाजी आक्रमणातील एक महत्त्वाचा खेळाडू आहे. त्याची सर्वोत्तम कामगिरी ९ धावांत चार बळी अशी होती.

## निवडक



### भारतीय महिला गुलाबी जर्सीत

**दिल्ली :** भारतीय महिला संघ शनिवारी (दि.२०) रोजी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या शेवटच्या एकदिवसीय सामन्यासाठी मैदानात उतरली होती. तत्पूर्वी, बीसीसीआयने तिसऱ्या एकदिवसीय सामन्यापूर्वी एक खास व्हिडिओ शेअर केला आहे, ज्यामध्ये भारतीय महिला संघाच्या पारंपारिक निळ्या जर्सीऐवजी गुलाबी जर्सी घालण्यामागील कारण उघड केले आहे. भारतीय महिला संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध गुलाबी जर्सी घालण्यामागील कारण महत्त्वाचे आहे. भारतीय संघाचे उद्दिष्ट स्तनाच्या कर्करोगाबद्दल जागरूकता निर्माण करणे आहे. बीसीसीआयने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये, कर्णधार हरमनप्रीत कौर आणि इतर अनेक खेळाडू गुलाबी जर्सी घालताना दिसत आहेत. व्हिडिओसोबतच्या कॅप्शनमध्ये बीसीसीआयने लिहिले आहे की, स्तनाच्या कर्करोगाविषयी जागरूकता वाढविण्यासाठी, भारतीय संघ तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात एक खास गुलाबी जर्सी घालणार आहे.



### हिरानंदानी स्कूलचा जिल्ह्यात डंका

**रसायनी :** रायगड जिल्हास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धा अलिबाग येथील जिल्हा क्रीडा संकुलात पार पडल्या. या स्पर्धेत हिरानंदानी ट्रस्ट स्कूलच्या १४ व १७ वर्षांखालील वयोगटातील मुलांनी शानदार कामगिरी केली. त्यांनी आपल्या कौरूल्याने विजेतेपद पटकावले आहे. तसेच, या दोन्ही संघांनी दमदार कामगिरी करून मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे. या विद्यार्थ्यांना शारीरिक शिक्षणाचे शिक्षक प्रणव लबडे यांच्या मार्गदर्शन लाभत आहे. विद्यार्थ्यांनी विजेतेपद पटकावल्यामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. शाळेच्या प्राचार्या रूपा चौधरी यांनी खेळाडूंचे कौतुक केले.




### शिवाजी पार्क जिमखान्याचा कायापालट

**मुंबई :** गेल्या दीड वर्षापासून पुनर्बांधणीच्या कामामुळे बंद असलेला दादर येथील शिवाजी पार्क जिमखाना पुन्हा सर्वांच्या भेटीला येणार आहे. या जिमखान्याला हेरिटेज लूक देण्यात आले असून त्याचे घटस्थापनेच्या मुहूर्तावर सोमवारी (दि.२२) लोकार्पण होणार आहे. १९०९ साली हा जिमखाना सुरू झाला होता. त्यावेळेस त्याचे नाव 'दादर हिंदू जिमखाना' असे होते. पुढे 'माहीम पार्क'चे नाव शिवाजी पार्क झाल्यानंतर या जिमखान्याचे नाव 'शिवाजी पार्क जिमखाना' झाले. या जिमखान्याने अनेक खेळाडू घडताना पाहिले. विजय मांजरेकर, सुभाष गुप्ते, अजित वाडेकर, संदीप पाटील तसेच अनेक खेळाडूंना जवळून पहिले. शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्षाच्या उंबरठ्यावर असलेल्या या जिमखान्याची पुनर्बांधणी करताना नवीन पिढीच्या अपेक्षेला साजेसे जिमखान्याचे रुपडे आणि सुखसोयी असाव्यात यावर भर देण्यात आला आहे. डिजिटल प्रवेश प्रणाली, अत्याधुनिक जिम, स्मार्ट सेफ्टी मॉनिटरिंग, नवे स्पोर्ट्स इन्फ्रास्ट्रक्चर आणि आकर्षण इंटीरिअर करण्यात आले आहे. जिमखान्याचा चेहरामोहरा बदलला तरी आत्मा तोच आहे, असे जिमखान्याचे अध्यक्ष प्रवीण आमरे यांनी सांगितले.



### जियाची अफलातून कामगिरी

**मुंबई :** डेहराडून येथे पार पडलेल्या आशियाई खुल्या शॉर्ट ट्रक स्पीड स्केटिंग चषक स्पर्धेत गती, सहनशक्ती आणि रणनीतीचा थरार अनुभवायला मिळाला. महाराष्ट्राच्या ११ वर्षीय जिया शेट्टीने अफलातून स्केटिंग करताना दोन सुवर्णपदकांसह एक रौप्य आणि एक कांस्य जिंकत चौकार ठोकला आहे. या स्पर्धेत जपान, थायलंड, चिन, तैपेई, व्हिएतनाम, सिंगापूर आणि फिलिपिन्ससह नऊ देशांतील खेळाडूंनी या ऑलिम्पिक हिवाळी क्रीडा स्पर्धेत भाग घेतला होता. यावेळी जियाने ३३३ मीटर व ५०० मीटर स्पर्धेतील शर्यतीत सुवर्णपदकांना गवसणी घातली. तर, ७७७ मीटर शर्यतीत तिने रौप्य कामगिरीही केली. तसेच, मिश्र रिलेमध्ये तिने कांस्यपदकही जिंकले. या पदकांच्या चौकारासह जिया भारतासाठी सर्वोच्च पदक विजेती खेळाडू ठरली. तिच्या या यशाने ती आशियातील सर्वाधिक प्रगतिकारक युवा खेळाडू ठरली आहे. जियासह कमलाकर स्वर यानेही दोन सुवर्ण, वर्धन लड्डाने दोन रौप्य तर अन्वयी देशपांडेने एक कांस्यपदक मिळवले आहे.

## कळंबोलीचे कुस्ती स्पर्धेत वर्चस्व

| पनवेल | प्रतिनिधी |



क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा नावडे येथील प.जो. म्हात्रे विद्यालयात पार पडल्या.

स्पर्धेत एकूण २१५ खेळाडूंनी सहभाग घेतला होता. या कुस्ती स्पर्धेत कळंबोलीतील पोलीस मुख्यालय कुस्ती संकुलातील कुस्तीपटूंनी १६ सुवर्ण, ४ रौप्य व १ कांस्य अशी एकूण २१ पदकं पटकावली आहेत. त्यात खुल्या गटात अर्णव शेजुळ (३५ किलो), सोहम ढगे (३८ किलो), साहिल घुगे (४१ किलो), अनिरुद्ध बंडगर (४८ किलो), स्वराज पाटील (५२ किलो), यश घुगे (६२ किलो), वेद तांबे (५७ किलो), वेदांत येळकर (६८ किलो), स्वप्निल लावंड (७५ किलो) यांनी सुवर्णपदक पटकावले असून अनिश पाटील (३५ किलो) व पार्थ गुंड (५२ किलो) यांनी रौप्यपदक पटकावले आहे. तसेच, १७ वर्षांखालली गटात शिवम सत्रे (४८ किलो), मानव यादव (५१ किलो), सिद्धार्थ भोपी (५५ किलो), वेदांत पाटील (६० किलो), निखिल यादव (६५ किलो), ओम शिंदे (७१ किलो) व संस्कार शिंदे (८० किलो) यांनी सुवर्णपदक पटकावले आहे.

तसेच, आदर्श नाळे (५५ किलो) व अवधूत पाटील (६५ किलो) यांनी रौप्यपदक पटकावले असून हर्षल नाईक (४५ किलो) व संस्कार कदम (८० किलो) यांनी कांस्यपदक पटकावले आहे.

यावेळी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उपायुक्त संजयकुमार पाटील, राखीव पोलीस निरीक्षक शांताराम वाघमोडे व क्रीडा प्रमुख तथा प्रशिक्षक संपत्ती येळकर यांनी कुस्तीगिरांचे कौतुक केले पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### कस्तुरी दिवेकरचे मैदानी यश

**माणगाव :** तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा माणगाव येथील क्रीडा संकुल खर्डी येथे संपन्न झाल्या. या मैदानी स्पर्धेत अशोक दादा साबळे जुनिअर कॉलेजची विद्यार्थिनी कस्तुरी दिवेकर हिने १९ वर्षाखालील गटात २०० मीटर धावणे व लांब उडीत माणगाव तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे. तिची निवड पुढे होण्याऱ्या जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी झालेली आहे. माणगावचे माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, काशीराम पवार, ज्येष्ठ पत्रकार अरुण पवार,गणेश भोस्तेकर,दत्ता शिंदे, मारुती मालोरे, दिनेश पवार, रवींद्र पारखे, वैभव पवार, भगवान पवार, बाळा पवार, शशिकांत पवार महेश पवार आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. प्रशिक्षक रावळे सरांनी अथक परिश्रम घेतले.



## सात्विक-चिरागचा विजयी धडाका

| नवी दिल्ली| वृत्तसंस्था |

भारताचा स्टार बॅडमिंटनपटू सात्विकसाईराज रांकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या जोडीने 'चायना मास्टर्स सुपर ७५०' या बॅडमिंटन स्पर्धेत विजयाचा धडाका कायम राखला आहे. पुरुष दुहेरी प्रकारात सात्विक आणि चिराग या जोडीने चीनच्या रेन झियांग यू आणि शिया हाओनन या जोडीचा २१-१४, २१-१४ असा पराभव करत स्पर्धेच्या उपांत्य फेरीत धडक मारली आहे. पॅरिसमधील जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत अलीकडेच दुसरे कांस्यपदक जिंकणारे सात्विक आणि चिराग जोडीला हाँगकाँग ओपनमध्ये उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले होते. सात्विक आणि चिराग या जोडीचा उपांत्य फेरीतील सामना हा दुसऱ्या क्रमांकाचे मानांकित मलेशियाचे आरोन चिया आणि सोह वूई यिक या जोडीशी होऊ शकतो. यापूर्वी, हिंदुस्थानची स्टार शटलर पी.व्ही. सिंधूची जागतिक नंबर वन आन से यंगविरुद्ध निराशाजनक कामगिरी कायम राहिली.

## पंड्यासोबत खेळणाऱ्याला अटक

| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |



हार्दिक व कृणाल पंड्या यांच्यासोबत खेळणाऱ्या बडोदा संघाचा माजी मध्यमगती गोलंदाज ऋषी आरोठे याला हैदराबादमध्ये अटक करण्यात आली आहे. आरोठेसह आणखी दोघांना ३२ लाखांच्या घोटाळ्याप्रकरणी अटक झालेली आहे. आरोठेला दुसऱ्यांदा अशा गुन्ह्याखाली अटक झाली आहे. स्टॉक मार्केटमध्ये गुंतवणूकीच्या संदर्भातील हा घोटाळा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोठेसह सायबर क्राईम पोलिसांनी वोडोदराच्या इनामदार विनायक राजेंदर आणि अका निखिल यांना अटक केली आहे. त्यांनी त्यांच्या साथीदारांच्या मदतीने सोशल मीडियावर नामांकित शेअर दलाली कंपन्यांच्या नावाने खोट्या जाहिराती दिल्या होत्या. या जाहिरातींवर क्लिक करणाऱ्या लोकांना व्हॉट्सअॅप ग्रुपमध्ये सहभागी करून बनावट ट्रेडिंग अॅप डाउनलोड करण्याचे निर्देश दिले गेले. त्या अॅपच्या डॅशबोर्डवर प्रचंड नफा दाखवला जात होता. मात्र, प्रत्यक्षात ऋषी आणि निखिल यांनी गुंतवणूकदारांकडून जमा झालेली रक्कम विविध बँक खात्यांमधून वळवून स्वतःकडे घेतली होती. जानेवारी महिन्यात हैदराबादमधील एका व्यक्तीला या

### ध्रुवी खाडेचा सुवर्ण जलवा

**माणगाव :** जिल्हास्तरीय शालेय जलतरण स्पर्धा रायगड जिल्ह्यातील पेण येथील मामा वासकर जलतरण तलाव येथे पार पडल्या. यावेळी माणगावच्या रणरागिनी ध्रुवी खाडे व अर्णव खाडे या दोन बहिण-भावांनी जलतरण स्पर्धेत यश मिळवले आहे. ध्रुवी खाडे हिने ५० मीटर तसेच २०० मीटर फ्रिस्टाईल स्विमिंगमध्ये सुवर्णपदक पटकावले आहे. तर, १०० मीटर फ्रिस्टाईल स्पर्धेत रौप्यपदक मिळवून त्रिवेणी यश संपादन केले. त्याचप्रमाणे अर्णव खाडे याने १४ वर्षांखालील मुलांच्या गटात उत्कृष्ट कामगिरी करत ५० मीटर फ्रिस्टाईलमध्ये कांस्य व २०० मीटर फ्रिस्टाईलमध्ये रौप्यपदक मिळवत माणगाव तालुक्याची मान उंचावली आहे.

## महाराष्ट्र ऑलिंपिकच्या विरोधात उपोषण

| उरण | प्रतिनिधी |

महाराष्ट्र ऑलिंपिक असो. ला जवळपास ५० राज्य खेळ संघटना संलग्न आहेत. मात्र, त्यातील नेमक्याच खेळ संघटनांना महाराष्ट्र ऑलिंपिकच्या होणाऱ्या निवडणुकीला मतदानाचा अधिकार देण्यात आला असून बाकीच्या संघटनांना डावलण्यात आले आहे. त्यामुळे या संघटनांनी एकत्र येत मंगळवारी (दि.२३) उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. यावेळी खेळ संघटनांचे पदाधिकारी व राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू साखळी उपोषण करणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे कार्याध्यक्ष संदीप भोंडवे यांनी दिली आहे.

यावेळी बोलताना भोंडवे म्हाणाले की, महाराष्ट्र ऑलिंपिक असो.चे सरचिटणिस नामदेव शिरगावकर यांनी १५ सप्टेंबर रोजी परिपत्रक काढून २ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या महाराष्ट्र ऑलिंपिक असो.च्या पंचवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. तसेच, या परिपत्रकासोबत निवडणुकीच्या मतदानाला पात्र २२ खेळ संघटनाची यादी जाहीर केली. या अगोदर झालेल्या महाराष्ट्र ऑलिंपिक असो.च्या निवडणुकीत २७ खेळ संघटनांना मतदानाचे अधिकार देण्यात आलेले होते. तर, आता होणाऱ्या निवडणुकीत कुस्ती, कबड्डी, बॉक्सिंग, स्विमिंग व हॅण्डबॉल या पाच खेळांना वगळून फक्त २२ राज्य खेळ संघटनांना मतदानाचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र ऑलिंपिक असो.चे सरचिटणीस नामदेव शिरगावकर यांनी संघटनेवर स्वतःचे वर्चस्व राहावे म्हणून जाणूनबुजून अनेक अधिकृत खेळ संघटनांना डावलल्याने महाराष्ट्रातील खेळांचे प्रचंड नुकसान होण्याची शक्यता आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे.

## उपांत्य फेरीत चार संघाची निवड | सागरी सुरक्षा चषकाचा मानकरी आज ठरणार

# रायगड पोलिसांचा आगळा-वेगळा उपक्रम

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |



जिल्ह्यात पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या संकल्पनेतून सागरी सुरक्षा चषक कबड्डी साखळी स्पर्धा सुरु करण्यात आली आहे. या स्पर्धेचा उपउपांत्य फेरीचा सामना शनिवारी (दि.२०) अलिबाग समुद्रकिनारी पार पडला. या स्पर्धेचे उद्घाटन पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या उपस्थित झाले. या स्पर्धेत नागोठणे, पोयनाड, मुरूड व रोहा हे चार संघ विजयी ठरले असून त्यांची उपांत्य फेरीत निवड झाली आहे. या संघांचा उपांत्य आणि अंतिम फेरीचा सामना रविवारी (दि.२१) सायंकाळी अलिबाग समुद्रकिनारी होणार आहे.

जिल्ह्यात सागरी सुरक्षा दल, मच्छीमार व पोलीस यांच्यामध्ये समन्वय वृद्धींगत करण्यासाठी पहिल्यांदाच हा उपक्रम राबविण्यात आला. शनिवारी अलिबाग समुद्रकिनारी घेण्यात आलेल्या उपउपांत्य फेरीचा सामना नागोठणे, पेण, पोयनाड, मांडवा सागरी, रोहा, दिघी सागरी, मुरूड व म्हसळा या आठ संघात झाला. यावेळी उपउपांत्य फेरीतील पहिला सामना नागोठणे फायटर्स बुल्स आणि पेण या संघात झाला. नागोठणे संघाने (४२-३७) ५ गुणांनी आघाडी घेत विजय मिळविला. त्यानंतर पोयनाड विरुद्ध मांडवा सागरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संघामध्ये दुसरी उपउपांत्य फेरी सुरु झाली. त्यात पोयनाड (२४-१६) संघाने ८ गुण मिळवून विजय मिळविला. तिसरी उपउपांत्य फेरीचा सामना मुरूड पद्मदुर्ग आणि म्हसळा महाशक्ती या संघात झाला. मुरूड संघाने (४२-२१) विजय आपल्याकडे खेचला. त्यानंतर चौथा उपउपांत्य फेरीचा सामना रोहा फायटर्स विरुद्ध म्हसळा महाशक्ती या संघात झाला. रोहा संघाने सुरुवातीपासूनच आघाडी घेत (२९-१०) १९ गुणांनी विजय मिळविला.

### विजेत्यांवर बक्षिसांचा वर्षाव

रविवारी सायंकाळी अलिबाग समुद्रकिनारी चार संघात उपांत्य फेरीचे सामने होणार आहेत. त्यानंतर अंतिम सामना होणार आहे. अंतिम विजेत्या संघाला रोख ५१ हजार रुपये, द्वितीय क्रमांकाला ३१ हजार रुपये व तृतीय क्रमांकाला रोख २१ हजार रुपये व चषक देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच, उत्कृष्ट चढाई, उत्कृष्ट पक्कड आणि मालिकाविराला चषक देऊन सन्मानित केले जाणार असल्याची माहिती सागरी सुरक्षा शाखेकडून देण्यात आली.

कु. आरुष रोशन म्हात्रे
दिनांक २१-०९-२०२४
मु. श्रीगांव, पो.पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड
पहिल्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा

शुभेच्छुक
म्हात्रे परिवार

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)